THE

DAY OF ATONEMENT.

VOL. I

תפלה
ליום כפור

חלק .א.

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

भाग पहिला.

THE

PRAYERS

OF THE

DAY OF ATONEMENT.

TRANSLATED

FROM HEBREW INTO MARATHI

BY

Joseph Ezekiel Rajpurker

TEACHER IN DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION

AND

SECRETARY TO THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

PUBLISHED BY THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

VOL. I.

BOMBAY:

PRINTED AT THE "ORIENTAL PRESS."

1867–5627,

Price 1¼ *Rupee.*

תפלה ליום כפור
חלק ·א·

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

भाग पहिला

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

योसेफ येहेजकेल राजपुरकर
दावीद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक
व
इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीचे चिटणीस

यांणीं

भाषांतर केलें

तें

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीने

लोकोपयोगाकरितां

मुंबईमध्यें

"ओरिएन्टल" छापखान्यांत छापविलें.

इ. स. १८६७ इस्राएली ५६२७

किम्मत १। सवा रुपया.

प्रस्तावना.

तिशरी ह्मणजे अश्विन महिन्याच्या दशमीस प्रायश्चित्ताचा दिवस येतो. या दिवसास प्रायश्चित्ताचा दिवस हें नांव पडण्याचें कारण असें कीं, त्या दिवशीं ईश्वर आपल्या परम दयेने आपले प्रिय लोक इस्राएल यांच्या पापाचें प्रायश्चित्त करून क्षमा करितो. पवित्र मंदिराच्या वेळीं या दिवशीं ईश्वराने केलेल्या क्षमेचें प्रमाण प्रत्यक्ष दिसून येत असे. परंतु जरी आतां त्याप्रमाणें प्रमाण दिसून येत नाहीं, तरी कोणी निराश होऊं नये. कारण अपराध क्षमा करणें हा त्याच्या तेरा गुणांतून एक मुख्य गुण असून, आपणाकडून प्रतिदिवशीं होणाऱ्या हजारों दोषांचें योग्य शासन तो न करितां, सर्वकाळ आपली दया राखितो. तर जे पूर्ण पश्चात्तापाने त्यास शरण जातात, त्यांस निःसंशय क्षमा होते. हें प्रायश्चित्त सर्वांस साध्य व्हावें, ह्मणून या दिवसापूर्वी चाळीस दिवसपर्यंत मोठ्या पहांटेस उठून आपल्या पापांची क्षमा मागावी, आणि उपास करावे, असा ज्ञानी लोकानी व ईश्वरभक्तानी नियम लावून दिला आहे. या दिवसाचें माहात्म्य सर्व सणांपेक्षां व शाब्बाथ जो सर्वांपेक्षां मोठा त्यापेक्षांहि मोठें आहे; ह्मणून त्यास महादिवस आणि शाब्बाथांचा शाब्बाथ असीं हे नांवें दिल्हीं आहेत.

या दिवशीं पापाची क्षमा मागणें, ती मोठ्या विचाराने व भय धरून मागितली पाहिजे. कारण मानवी राजा अथवा न्यायाधीश यापुढें कांहीं न्यायाकरितां किंवा अर्ज करण्याकरितां जाणें असल्यास, त्याविषयीं पूर्वीं ध्यान करून त्यासंबंधी सर्व गोष्टी समजून घ्याव्या लागतात. असें असतां सर्व जगताचा राजा आणि न्यायाधीश यापुढें जाऊन काय मागावें व तें कसें मागावें, याविषयीं फार सावध असलें पाहिजे. यासाठीं आमचे प्रिय बंधुजन या दिवशीं ईश्वराजवळ जी विनंती करितात ती त्यांस समजावी, ह्मणून हें

त्या दिवसाच्या प्रार्थनेचें भाषांतर त्यांस नजर केलें आहे. यद्यपि आमची त्यांस असी सूचना आहे कीं, ही प्रार्थना मूळ भाषेंत जसी मधुर वाटती, त्याप्रमाणें तिचें भाषांतर मधुर वाटत नाहीं. तर त्यानी आपल्या पवित्र भाषेचा अभ्यास केला असतां, ते मोठ्या प्रेमाने व एकाग्रचित्ताने प्रार्थना करितील; आणि ती देवापुढें लवकर मान्य केली जाऊन सर्व पापांची क्षमा होईल.

या ग्रंथांतील संक्षिप्त शब्द.

א״א = אלהינו ואלהי אבותינו
व. प्र. प्रा. = वर्षप्रतिपदेची प्रार्थना.
पा· क्ष. प्रा. = पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना.
दो. वे. = दोन वेळा.
शा. अ. = शाब्बाथ असल्यास
अ. ओ. = अध्याय ओवी.
इ. = इब्री.

תפלה

ליום כפור

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

ערבית

संध्याकाळची प्रार्थना.

शाब्बाथ असल्यास एथून आरंभ करावा.

מזמור שיר ליום השבת गीत ९२.

" מלך גीत ९३.

पुढील गीतें बोलल्या अगोदर प्रत्येकानें हें गीत बोलावें.

לך אלי תשוקתי हे माझ्या देवा, माझी इच्छा तुजकडे, आणि माझी आवड व प्रीति तुजवर आहे. माझें मन व गुर्दकमळें तुझीं आहेत; माझा जीव व आत्माहि तुझा आहे. माझे हात पाय तुझे आहेत; आणि माझी रचनाहि तुझीच आहे. माझीं हाडें व माझें रक्त आणि कातड्यासहित माझें शरीर तुझें आहे. माझे डोळे, चिंतन, चेहेरा व आकार तुझेच आहेत. माझा जीव तुझा व माझें बळ तुझें; आणि माझा भरंवसा व माझी आशा तुजवरच आहे. मी आपलें मन रक्त व चरबी यांचा होम कोंकराच्या होमाप्रमाणें तुला करितों. ज्यासारिखा दुसरा नाहीं असा जो माझा एकुलता जीव तोहि तुझा; तो माझा एकुलता तुला स्तवितो. राज्य तुझें, ऐश्वर्य तुझें, आणि स्तुति तुलाच शोभते. संकटसमयीं तुझेंच सहाय, ह्मणून माझ्या संकटीं मला सहाय हो. ज्या वेळीं मी रोगी

होतों तेव्हां व दुःखांत असतों तेव्हां, जसी प्रसवणारी तसी मी तुझी वाट पाहतों. माझी आशा तुजवर आहे, मजवरील घाय, क्लेश व फटके बरे कर. मी तुजकडे शोक करितों, आणि तूं माझा अंधार प्रकाशित करीस तोंपर्यंत मी मुका राहाणार नाहीं. तूं माझें आशापात्र, आणि तुजवरच माझा भरंवसा आहे; आणि जो माझें सामर्थ्य तो तूंच. तुजकडे मी ओरडतों, आणि मी आपल्या मातीस पुनः मिळें तोंपर्यंत मी तुलाच लगटून राहीन. मी जीवंत असतां व मरणानंतरहि तुझाच आहें. मी तुला स्तवितों आणि आपणावर आपलीं पापें व दुष्टाई प्रकरितों. परंतु तारण तुजकडून होतें, म्हणून माझी दुष्टाई, माझें उलंघन व माझा अतिक्रम क्षमा कर. तुजपुढें मी नमन करितों आणि आपले तळहात पसरितों; आतां तूं माझी विनंती ऐक. चेंचरलेल्या मनानें ध्यान करून दुःखांत मी तुजकडे रडतों. दया व माया तुलाच येती, माझ्या सर्व कष्टांवर तूं दया कर. आणि माझ्या पापाचा दंड सोसण्यापेक्षां अधिक झाला आहे, आणि अपवाद (मजवर) प्रबल झाला आहे. यास्तव माझे क्लेश वाढले, परंतु जसें म्या पेरलें तसें म्या कापलें; आणि जर तूं माझ्या दुष्टाईप्रमाणें माझा न्याय करशील, तर मला हाय-हाय, मला हायहाय! दुष्ट वासना मला सतत त्रास देणारी आहे; जसा केवळ मजपुढें सैतानच आहें; तिने माझ्या नाशाकरितां मला मसलत देऊन भुलविलें. मजवरील बलात्कार व माझी कुरकूर तिजवरच असो, आणि तिच्या शिवाय दुसऱ्या कोणावर नसो. आणि माझ्या बिछान्यावर ज्या वेळीं मी आपले अन्याय स्मरतों, तेव्हां मी फार भयभीत होतों व कांपतों; आणि माझा खेद फारच वाढतो, माझें विपरीतपण जेव्हां मला आठवतें, तेव्हां मी घाबरतों. मी तुजपुढें नागवा* उभा आहें; तर मी काय उत्तर देऊं? ज्या गोष्टी म्या नाकारिल्या त्या ज्या दिवशीं मजविषयीं साक्ष देतील, तेव्हां रीतीप्रमाणें मला फल प्राप्त होईल. जेव्हां मजवरील (पापाचें कर्ज)

* एथें नागवा या शब्दाचा अर्थ पुण्यविरहित असा होतो.

फेडण्याचे दिवस येतील, जेव्हां झडतीचा वेळ जवळ येईल, आणि जेव्हां तुझा निरोप माझ्या ऐकण्यांत येईल; तेव्हां मला भय प्राप्त होऊन माझ्या अंगास पाणी सुटेल. तुजपुढें कोण उभा राहूं शकेल? आणि माझ्याबद्दल (तुजसमोर) कोण येईल? मी तुला काय झडती देऊं? आणि माझ्या दुर्मतीपासून मी यथार्थ कसा ठरेन? मी अतिक्रम केले, दबा धरिला; मी विश्वासघात केला व (तुझीं वचनें) धिक्कारिलीं. मी लुटलें व चोरलें, वाईट केलें व दुष्टाई केली. मी हट्ट केला व जुलूमहि केला, पाप केलें व पाप करविलें. तुजकडून वळलों, (वाईट) योजना केल्या, खोटें बोललों व अपवाद केला. मी थट्टा करविली व स्वतांहि थट्टा केली. मी बंडावा केला व भ्रष्ट झालों. मी अपवाद केला व व्यभिचार केला, कुटिलपणाने वर्तलों व खोटें रचिलें. दोष केले व दोष करविले, उलंघनें केलीं व खोडी केल्या. पाठलाग केला व दुःख दिल्हें, शाप दिल्हा व आपले मार्ग निचावले. दुराचार केले व नासिलें, ओंगळ केलें व बहकलों. तुझ्या मार्गापासून वळलों व माझ्या लज्जेने मला झांकलें आहे. दुष्टाई करण्याकरितां मी आपणास उंचाविलें, आणि आपल्या दुष्टाई करण्यांत धैर्य धरिलें, ठकविलें व विपरीत केलें व पीडिलें व ठेंचिलें. मी आपल्या आरंभीं पाप केलें आणि आपल्या शेवटींहि दुष्टाई केली; मी आपल्या बालपणांत अतिक्रम केले व आपल्या वृद्धपणांत विश्वासघात केला. तुझ्या शास्त्राचा धिक्कार करून मी आपलें स्वतांचें शास्त्र आपणाकरितां निवडून घेतलें; आणि तुझ्या इच्छेप्रमाणें वर्तणें सोडून आपल्या वांछांप्रमाणें वर्तलों. मी आपल्या दुष्ट वासनेची इच्छा पूर्ण केली, परंतु आपला शेवट समजून घेतला नाहीं. आणि आपल्या दुष्टाईंत व अपराधांत अधिक अधिक पाप वाढविलें. यास्तव माझ्या लज्जेने माझें तोंड झांकलें व मी निंदाहि पावलों; परंतु मला तुजवांचून कोणाचाहि आश्रय नाहीं; मला तुजकडूनच क्षमा होईल. तुजशिवाय माफी करणारा कोणी नाहीं, तुजकडूनच माफी होते. जर तूं आपल्या दासास न्यायांत आणशील, तर माझें सामर्थ्य काय! मी काय ! माझें जिणें काय !

आणि माझें सामर्थ्य काय ! व माझें बळ काय ! जसें धसकट इकडे तिकडे उडविलें जातें, तसें तें उडविलें जाईल. तर मी आपली चूक कशी आठवूं ! मी मुका झालों व निंदा पावलों, आणि माझ्या निंदेनें मला झांकलें. माझ्या मागण्या पूर्ण व्हाव्या म्हणून मी सर्वदां तुझी प्रसन्नता मागतों; मला माझ्या अन्यायांपासून व पापापासून स्वच्छ धू; माझ्या अतिशय कष्टाकडे व माझ्या दास्यत्वांतील दारिद्राकडे पाहा. माझ्या उसास्यापासून व ओरडण्यापासून तूं आपला कान लपवूं नको. माझें बरें व्हावें म्हणून तूं आपल्या सेवकाला (मला) हडप दे; आणि माझ्या संकटास म्हण कीं, आतां पुरे. माझ्या मरणाच्या दिवसापूर्वी तूं आपलें तारण मला दाखीव; ज्या दिवसीं मी आपल्या फासांत गुंतला जाईन तेव्हां तूं माझें खचण्यास आश्रय दे. माझ्या वांचण्याचा मला कंटाळा येईपर्यंत माझा जीव विषानें भाला; यास्तव माझें बरें होण्याची खूण मला दे; आणि आतां माझ्या सहायाकरितां ऊठ. माझ्या वतनाचा वांटा, माझें स्तुतिपात्र, माझें कल्याण करणारा, माझाच मोठेपणा, माझें स्तवन, आणि माझा सर्व आनंद व हर्ष तूंच नाहींस काय? माझ्या मनाचा उल्हास, माझ्या डोळ्याचा प्रकाश, माझा आश्रय, माझा प्रेम, आराम व हर्ष माझें सांत्वन व माझें-क्षेमहि तूंच आहेस. तूं आपली सेवा मला समजीव म्हणजे मी तुझी च सेवा करीन, मला तूं फिरीव म्हणजे मी फिरेन; मग माझ्या पश्चात्तापास* तूं प्रसन्न हो. तूं आपले मार्ग मला शिकीव आणि माझीं पावलें नीटाव; माझी प्रार्थना ऐक व माझे काकुलतीस उत्तर दे. मी आपल्या सर्व मनानें तुला शोधिलें; हे अनंता, माझ्या प्रार्थनेस † उत्तर दे. मी आपलीं अश्रुं तुला वाहतों, म्हणून माझ्या अश्रूंनीं माझीं पापें पुसून टाक. माझा जीव म्हणतो कीं, परमेश्वर माझा वांटा व माझें वेतन आहे. ज्या दिवसीं मी (आपल्या लोकांस) जाऊन मिळेन तेव्हां तूं आपले दयेंकरून

* या शब्दाचा अर्थ "माझें उत्तर" असाहि होतो.

† या शब्दाचा खरा अर्थ व्याख्यान असा होतो.

माझे अपराध पुसून टाक. ज्या दिवसीं मी तुजपुढें चालेन तेव्हां तूं माझ्या चालण्यास प्रसन्न हो; आणि तुझी इच्छा पूर्ण करणाऱ्यांबरोबर माझ्या कृत्यांचें वेतन मला दे. आणि तुझे दयेचे दूत पाठवून ते मजपुढें येवोत, आणि जेव्हां मी येईन तेव्हां ते एका वाणीने ह्मणोत कीं, तूं सुखरूपपणें ये. तुझ्या एदेन बागेंत ते मला नेवोत; आणि तेथें माझें राहणें होवो, ह्मणजे मी तुझ्या प्रकाशांत आनंद करीन, आणि गौरवाने माझें सांत्वन होईल. तुजपुढें राखून ठेवलेला उजेड मजकरितां झांकण व मंडप होवो, आणि तुझ्या पंखांच्या छायेखालीं मला आश्रय दे.

שְׁמַע קוֹלִי हे वाणी ऐकणाऱ्या आणि प्रार्थना मान्य करणाऱ्या देवा, माझी वाणी एके. हे अंत नाहीं अशीं मोठालीं आश्चर्यकारक व भयंकर कृत्यें करणाऱ्या, हे बुद्धिवंता, सर्वकाळ अचळ आणि सर्व सामर्थ्यां पेक्षां अधिक सामर्थ्यवान असणाऱ्या, हे दयावंता, कृपावंता, चांगल्या, यथार्थ व पुष्कळ क्षमा करणाऱ्या, हे आब्राहाम इसहाक व इस्राएल यांस त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याकरितां उत्तर देणाऱ्या, हे योसेफास बंदिशाळेंत उत्तर देणाऱ्या, आणि त्यास खांचेंतून उंच पदास चढविणाऱ्या, मिसरांत आपल्या लोकांस उत्तर देऊन त्यांस बेड्यांतून सोडवून मुक्त करणाऱ्या, त्यांस समुद्रांत उत्तर देऊन पार करणाऱ्या, आणि त्यांच्या वैऱ्यांस खोलपणांत बुडविणाऱ्या, हे सीनाय पर्वतावर मोशेयास उत्तर देणाऱ्या, आणि आपल्या चांगुलपणाकडून सुटकेचें शुभवर्तमान त्यास कळविणाऱ्या. * हे आहारोनास धूप दाखवितांना आणि पिनहासास योग्य कृत्य † करितांना उत्तर देणाऱ्या, हे येहोशुआस आणि एलीस उत्तर देणाऱ्या, आणि हान्ना शब्देंकरून काकळूत करीत असतां तिलाहि उत्तर देणाऱ्या, हे शमुएलास तारणाकडून उत्तर

---

* टीका १

† जेव्हां इस्राएलांनी शिट्टीमांत मोआबी कन्यांसीं व्यभिचार केला तेव्हां पिनहासाने एका इस्राएली माणसास व एका मोआबी स्त्रीस भाल्याने भोंसकिलें, हें त्याणें योग्य कृत्य केलें, आणि त्यामुळें इस्राएलांवरील पटकी बंद झाली.

देणाऱ्या, आणि प्रसवणारीस तिच्या वेदनांत उत्तर देणाऱ्या, हे पुष्कळ शांततेकडून, शेलोमोस उत्तर देणाऱ्या, आणि दावीद, ज्याने तुला चढण्याचीं गीतें गाइलीं त्यासही, हे येलीयास कार्मेल डोंगरावर जेव्हां (आकाशांतून) अग्नीने उतरून भक्ष खाल्ला* तेव्हां उत्तर देणाऱ्या, हे येलीशास तारणाकडून आणि हिजकीयास आरोग्यतेकडून उत्तर देणाऱ्या, हे योनास समुद्रामध्यें उत्तर देऊन अंधारांतून त्यांस उजेडांत आणणाऱ्या, हे हानानया, आजारया व मीशाएल यांस चमत्काराने सोडवून उत्तर देणाऱ्या, हे दानिएल ज्यास तुझ्या दूताने सिंहापासून सोडविलें त्यास दयेंकरून उत्तर देणाऱ्या, हे मोरदेखाय व एस्तेर यांच्या दुःखास पालटून हर्ष करून त्यांस उत्तर देणाऱ्या, हे सहायाकडून एझरास आणि हाशमानीम कुटुंबास † लढाईंत उत्तर देणाऱ्या, हे होनी ‡ ज्याने तुझ्या मोठ्या आश्चर्यकारक नामाची शपथ वाहिली, त्यास कुंडलींत उत्तर देणाऱ्या, हे (तुझ्या) मंडळींत पिढोपिढीं झालेल्या सात्विकांस व सरळांस उत्तर देणाऱ्या, हे वादळांत समुद्रांतील तारवांस उत्तर देणाऱ्या, आणि हे रोग्यास त्याच्या दुःखांत उत्तर देणाऱ्या, हे अरण्यांत चालणाऱ्यांस उत्तर देणाऱ्या, आणि हे बेड्यांनीं लादलेल्यांस उत्तर देणाऱ्या, हे सर्व जे तुजपुढें ओरडतात व हाक मारितात त्यांस, आणि जे तुजपुढें प्रार्थना करायास येतात त्यांस उत्तर देणाऱ्या, (माझी वाणी ऐक.)

עני עני अति नीच झालेला जो गरीब त्यास उत्तर दे; आणि हे प्रार्थना मान्य करणाऱ्या, त्याचीं पापें क्षमा कर. आणि आपल्या दयेने त्याच्या (आयुष्याचीं) वर्षें वाढीव, आणि त्याच्या सर्व मागण्या पूर्ण होण्यास आज्ञा कर. त्याच्या सर्व प्रार्थ-

---

* राजे. १८, १७-४०.

† दुसऱ्या पवित्र मंदिरांतील मतातया मुख्य आचार्य याच्या कुटुंबास हासमोनीम कुटुंब असें म्हटलें आहे व० प्र० प्रा० टीक७ पाहा.

‡ ह्याविषयीं पा० क्ष० प्रा० पृष्ठ ३८ याखालीं केलेली टीका पाहावी. योसिफस इतिहासकर्त्ताहि याविषयीं प्रमाण देतो.

ना तुजपुढें (दाखविलेल्या) धूपासारिख्या आणि तुजपुढें केलेल्या अर्पणासारिख्या व होमासारिख्या मोज. हे देवा, प्रार्थना मान्य करणाऱ्या आणि वाणी ऐकणाऱ्या, माझी वाणी ऐक.

मग शास्त्र काढते वेळीं हें मोठ्याने बोलतात.

כהניך ילבשו צדק तुझ्या याजकानी नीतिमत्व पांघरावें, आणि तुझ्या भक्तानी हर्षशब्द करावा. तूं आपला सेवक दावीद यामुळें आपल्या अभिषिकाचें तोंड विन्मुख करूं नको.

ברוך המקום व. प्र. प्रा. पृष्ठ ८७.

רוממו " व. प्र. प्रा. पृष्ठ ८७.

मंडळींत जो वृद्ध असून ज्ञानी व ईश्वरभय धरणारा असेल त्याने हें बोलावें.

בישיבה של מעלה वरील (आकाशांतील) न्यायसभेंत व खालच्या (पृथ्वीवरील) न्यायसभेंत, सर्वव्यापक जो धन्य देव त्याच्या हुकुमावरून व या पवित्र मंडळीच्या हुकुमावरून, आह्मास आज्ञाभंग करणाऱ्यांबरोबरहि प्रार्थना करावयास योग्य आहे.

כל נדרי जे सर्व नवस आह्मी केले असतील, नवस करून जीं बंधनें पत्करिलीं असतील, ज्या शपथा वाहिल्या असतील, ज्यांस अपांक्त केलें असेल, ज्यांस धर्मबाह्य* केलें असेल, जे कोनाम, कोनाह व कोनास † केले असतील, ह्मणजे गेल्या प्रायश्चित्ताच्या दिवसापासून हा प्रायश्चित्ताचा दिवस जो आह्मावर शांतीने आला आहे एथपर्यंत; आणि या प्रायश्चित्ताच्या दिवसापासून पुढील प्रायश्चित्ताचा दिवस आह्मावर शांतीने येईपर्यंत (जे करूं;) ते नवस, नवस नसोत; त्या शपथा, शपथा नसोत; तें अपांक्त करणें, अपांक्त करणें नसो; तें धर्मबाह्य करणें, धर्मबाह्य करणें नसो; आणि तें नवस क-

* टीका २. † टीका ३.

रून बंधन पत्कारिणें, नवस करून बंधन पत्कारिणें नसो; त्या सर्वांविषयीं आह्मी पश्चात्ताप करितों. आणि (ईश्वराची) असी प्रसन्नता होवो कीं, ते सर्व बंद व रद्द होवोत, ते मंजूर व स्थापित न होवोत. असी इस्राएलाच्या संतानांच्या सर्व समुदायाला व त्यांमध्यें राहाणाऱ्या विदेश्याला, त्याची क्षमा होवो; कारण कीं सर्व लोकांकडून तें चुकून झालें होतें. (हें तीन वेळ बोलावें.)

בִּרְשׁוּת מוֹרַי וְרַבּוֹתַי माझे गुरु व स्वामी यांच्या आज्ञेवरून (मी ही स्तुति करितों.)

בָּרוּךְ אַתָּה יְיָ हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मास या वेळेपर्यंत जीवंत राखणाऱ्या, रक्षिणाऱ्या व पोंहोंचविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

תְּשׁוּעָה חֲנוּן राजास आशीर्वाद व. प्र. प्रा. पृष्ठ ९२.

מִי שֶׁבֵּרַךְ मंडळीस आशीर्वाद व. प्र. प्रा. पृष्ठ ९३.

शास्त्र काढणें विकत घेणाऱ्या नवऱ्यांस आशीर्वाद.

מִי שֶׁבֵּרַךְ ज्याने आमचे पूर्वज आब्राहाम, इसहाक, याकोब, मोशे, आहारोन, दावीद आणि शेलोमो यांस आशीर्वाद दिल्हा तोच, कीर्तिमान नवरा, गौरवयुक्त, महत्त्ववान, व प्रतिष्ठित स्वामी (अमुक,) (पुरी होणारी शास्त्राची प्रत घेणारास) जो आमच्या देवाचें शास्त्र पुरें करण्यास निवडिलेला आहे, (आरंभिली जाणारी शास्त्राची प्रत घेणारास) जो आमच्या देवाचे शास्त्रास आरंभ करण्यास निवडिलेला आहे त्यास, राजांचा राजा रक्षो व जिवंत राखो, आणि सर्व संकटें व भय यांपासून सोडवो, आणि देव त्यास चांगल्या जीविनाच्या पुस्तकांत लिहो, असी त्याची प्रसन्नता होवो, आणि आपण तथास्तु ह्मणूं.

शास्त्र ठेवते वेळीं हें बोलावें.

יִמְלֹךְ יְיָ לְעוֹלָם परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो; हे सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे, तुह्मी परमेश्वराला स्तवा.

מִזְמוֹר לְדָוִד הָבוּ לַיי गीत २९.
שׁוּבָה לְמְעוֹנָךְ व. प्र. प्रा. पृष्ठ १०३.

शास्त्र ठेविल्यावर हाज्जानाने एऊन आरंभ करावा.

שְׁפַל רוּחַ मी नम्र आत्म्याचा होऊन व आपले गुढघे व बांधा लववून आणि आपधाकून भयाने तुजपुढें येतों. मी आपल्या दृष्टींत आपणास तुजपुढें भूमीवरील लाहान किंवा असें मानितों. ज्याच्या महत्त्वास अंत नाहीं असा जो विश्वंभर, त्या तुझी स्तुति मजसारिखा कशाने करील. तुझ्या गौरवाचें (वर्णन करायास) आकाशांतील दूतहि शकत नाहींत, तर मी एकटा किती करूं शकेन. तूं चांगलें करितोस व पुष्कळ दया राखितोस याकरितां सर्व प्राणिमात्र तुला थोर मानून स्तवितील.

יִתְגַּדַּל וְיִתְקַדַּשׁ जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणें केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचावलें आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत आणि सर्व इस्राएलांच्या घराण्यांच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन, त्याचें तारण उगवो आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु; त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति, व जी सिद्धि जगांत गाजविली जाते, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त उंचावलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु ह्मणा.

וְהוּא רַחוּם तो ममताळू आहे यास्तव, तो अन्यायाची क्षमा करितो, नाश करीत नाहीं; तो बहुतवेळ आपला राग टाळितो, आणि आपला सर्व संताप चेतवीत नाहीं; हे परमेश्वरा, तारण कर, आह्मी हांक मारितों, त्या दिवशीं राजाने आह्मास उत्तर द्यावें.

" ברכו את " सुवंदित परमेश्वराला तुम्ही धन्य ह्मणा.

हाज्जान वरील वाक्य बोलत असतां मंडळीने हें हळू बोलावें.

ישתבח ויתפאר राजा, राजांच्या राजा आणि पवित्र व धन्य जो, त्याचें नाम स्तविलें आणि गौरविलें जावो. पहिला तोच व शेवटालाहि तोच आणि त्यावांचून कोणी देव नाहीं. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नाम सुवंदित व सर्व स्तुति व प्रशंसेपेक्षां अधिक उंचावलेलें असो.

मग मंडळीनें मोठयानें हें ह्मणावें.

ברוך " המבורך सुवंदित परमेश्वर सदासर्वकाळ धन्य असो.

" ברוך אתה हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आपल्या शब्देंकरून संध्याकाळ करणाऱ्या, ज्ञानानें (आकाशाचीं) द्वारें उघडणाऱ्या, बुद्धीनें ऋतूंस पालटणाऱ्या, वेळ फिरविणाऱ्या, आपल्या इच्छेप्रमाणें ताऱ्यांस आकाशामध्यें त्यांच्या मार्गानें चालविणाऱ्या, दिवस व रात्र उत्पन्न करणाऱ्या, काळोखापुढून उजेड आणि उजेडापुढून काळोख हटविणाऱ्या, दिवस घालवून रात्र आणणाऱ्या, आणि दिवस व रात्र यांमध्यें भेद राखणाऱ्या, तूं धन्य आहेस. ज्याचें नाम सैन्याचा परमेश्वर तो तूंच. हे परमेश्वरा, संध्याकाळ करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אהבת עולם त्वां आपला लोक इस्राएल याच्या घराण्यावर अखंड ममतेनें दया केली आहेस. त्वां आह्मास शास्त्र,विधि, नियम व न्याय शिकविले आहेस. यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, निजतांना व उठतांना आह्मी तुझ्या नियमाचें ध्यान करूं. आणि तुझ्या शास्त्रांतील, विधींतील आणि नियमांतील बोधक गोष्टींविषयीं सर्वकाळ आनंद व उल्हास मानूं; कारण त्या आमचें जीवन व आमच्या आयुष्याचें दीर्घत्व आहेत; त्यांविषयीं रात्रंदिवस आह्मी

मनन करूं. आणि तूं आपली दया व कृपा आह्मावरून कधींहि काढूं नको. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांवर प्रीति करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

שמע ישראל हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे; परमेश्वर एकच आहे.

हें वाक्यहि मोठयाने बोलावें.

ברוך שם त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो.

" ואהבת את तर तूं आपल्या सर्व अंतःकरणाने व आपल्या सर्व जिवाने व आपल्या सर्व शक्तीने आपला देव परमेश्वर यावर प्रीति कर. आणि मी आज तुला ज्या गोष्टी आज्ञेने सांगतों, त्या तुझ्या हृदयांत असाव्या. आणि तूं आपल्या लेंकरांजवळ ह्या पुनःपुनः सांग; आणि आपल्या घरीं बसतांना आणि वाटेवर चालतांना, आणि निजतांना आणि उठतांना यांविषयीं बोलत जा. आणि तूं ह्या आपल्या हातासीं खुणेसाठीं बांध, आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं कपाळभूषण अशा असूं दे. आणि आपल्या घरांच्या दारांच्या बाह्यांवर व आपल्या दरवाज्यावर त्या लिहीं.

והיה אם שמוע आणि ज्या आज्ञा मी आज तुह्मास लावून देतों, त्या जर तुह्मी ऐकालच ऐकाल, ह्मणजे आपल्या सर्व हृदयाने व आपल्या सर्व जिवाने आपला देव परमेश्वर यावर प्रीति कराल, आणि त्याची सेवा कराल; तर असें होईल कीं, मी यथाकाळीं तुमच्या देशाचा पाऊस पहिली व मागली वृष्टि पाडीन; अशाने तूं आपलें धान्य व आपला ताजा द्राक्षारस व आपलें तेल यांचा संग्रह करसील. आणि मी तुझ्या पशूसाठीं तुझ्या कुरणांत गवत वाढवून देईन; असा तूं खाऊन तृप्त होसील. तुह्मी आपणाविषयीं सांभाळा, नाहीं तर तुमचें हृदय फसेल; आणि तुह्मी वळून

दुसऱ्या देवांची सेवा कराल व त्यांचें भजन कराल. मग परमेश्वर तुह्मावर रागें भरेल. आणि तो आकाशाला असें बंद करील कीं, पाऊस होणार नाहीं, भूमीहि आपलें उत्पन्न देणार नाहीं; आणि जो चांगला देश परमेश्वर तुह्मास देतो, त्यांतून तुह्मी लवकर नाहींसे व्हाल. तर तुह्मी ह्या गोष्टी आपल्या हृदयांत व आपल्या जिवांत ठेवा, आणि आपल्या हातासीं खुणेसाठीं त्या बांधा आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं कपाळभूषण अशा असूं द्या. आणि तुह्मी आपल्या लेंकरांस त्या शिकवा; ह्मणजे जेव्हां तूं आपल्या घरीं बसतोस, आणि जेव्हां वाटेने चालतोस आणि जेव्हां निजतोस, आणि जेव्हां उठतोस, तेव्हां त्यांविषयीं बोलत जा. आणि आपल्या घरांच्या दारांच्या बाह्यांवर व आपल्या दरवाज्यावर त्या लिहीं. ह्मणजे जी भूमि परमेश्वराने तुमच्या पूर्वजांजवळ शपथ वाहून त्यांस देऊं केली, तिजवर तुमचे दिवस व तुमच्या लेंकरांचे दिवस पुष्कळ होतील; जसे पृथ्वीवर आकाशाचे दिवस तसे.

" ויאמר " आणि परमेश्वराने मोश्याला असें सांगितलें कीं, तूं इस्राएलाच्या संतानांजवळ बोलून त्यांस सांग कीं, त्यानी आपल्या पिढीपरंपरा आपल्यासाठीं आपल्या वस्त्रांच्या कांठांस झालर लावावी, आणि कांठाच्या झालरीस निळा नाडा लावावा. ती झालर तर तुह्मास अशी व्हावी कीं, तुह्मी ती पाहून परमेश्वराच्या सर्व आज्ञा आठवाव्या आणि त्यांप्रमाणें आचरण करावें, असें कीं ज्यांस अनुसरून तुह्मी व्यभिचारी झालां, ह्मणजे आपलें हृदय व आपली दृष्टि, त्याच्या मागें जाऊं नये. यासाठीं कीं, तुह्मी माझ्या सर्व आज्ञा आठवून पाळाव्या, आणि आपल्या देवासाठीं पवित्र व्हावें. मी परमेश्वर तुमचा देव; ज्याने तुमचा देव असा होण्यासाठीं तुह्मास मिसर देशांतून आणिलें तोच मी परमेश्वर तुमचा देव आहें.

אלהיכם אמת " परमेश्वर तुमचा देव सत्य आहे.

אמת ואמונה हें सर्व सत्य, निःसंशय, आणि आह्मा-

मध्यें स्थापित आहे कीं, तोच आमचा परमेश्वर देव आहे; त्या शिवाय दुसरा कोणी नाहीं; आणि आह्मी इस्राएल त्याचे लोक आहों. आमच्या तारकानें राजांच्या हातांतून आह्मास खंडून काढलें; आमच्या राजानें बलात्कार्‍यांच्या पंजांतून आह्मास सोडविलें. त्याच देवानें आह्मासाठीं आमच्या वैर्‍यांचा सूड घेतला आणि आमच्या जिवाच्या सर्व शत्रूंस योग्य दंड केला. तो आमचा प्राण वांचवितो, आणि आमचे पाय सरकूं देत नाहीं. त्यानें आह्मास आमच्या शत्रूंच्या उंच स्थानावरून चालविलें, आणि आमच्या सर्व द्वेष्ट्यांवर आमचें शिंग उभारिलें. त्याच देवानें हामाच्या वंशाच्या देशांत चमत्कार व आश्चर्यकर्में करून आह्मासाठीं फारोचा सूड उगविला. त्यानेंच आपल्या रागानें मिसरांतील सर्व जेष्ठ पुत्र मारून आपल्या इस्राएल लोकांस निरंतरच्या मोकळिकीकरितां त्यांमधून काढिलें. त्यानें आपल्या लेंकरांस सूफ समुद्राच्या विभागांमधून चालवून त्यांचा पाठलाग व द्वेष करणारांस डोहांत बुडविलें. त्याच्या लेंकरानीं (असा) त्याचा पराक्रम पाहून त्याच्या नामाचें कीर्तन व स्तवन केलें, आणि स्वइच्छेनें त्याचें राज्य आपणावर मान्य केलें. मोशे व इस्राएलांच्या लेंकरानीं मोठ्या आनंदानें गायन करून एकदांच म्हणाले, हे परमेश्वरा, देवांमध्यें तुझ्यासारिखा कोण? पवित्रतेनें महान, स्तवण्याविषयीं भयमान, चमत्कार कर्ता असा तुजसारिखा कोण आहे? हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या सर्व लेंकरानीं समुद्र (तिरीं) तुझी राजसत्ता पाहिल्यावरून तुझी स्तुति केली, आणि तुझें राज्य आपणावर मान्य करून म्हणाले, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. आणि असें म्हटलें आहे कीं, परमेश्वरानें याकोब उद्धरिला आहे, आणि त्यापेक्षां जो बळवान होता त्याच्या हातांतून त्यास सोडविलें आहे. हे परमेश्वरा, इस्राएलाच्या उद्धारका, तूं धन्य आहेस.

השכיבנו אבינו हे आमच्या बापा, आह्मास शांतीनें झोंप लागूं दे; आणि हे आमच्या राजा, चांगल्या जीवनानें व शांतीनें आह्मास उठीव. हे आमच्या राजा, तूं आपला सुखाचा

मंडप आह्मावर पसरून आपल्या सुबोधानें आह्मास सुधार; तूं आपल्या नामास्तव लौकर आमचें तारण व संरक्षण कर; आणि आपला दयेचा व सुखाचा मंडप आह्मावर पसर. हे परमेश्वरा, आह्मावर, आपल्या सर्व इस्राएल लोकांवर, आणि येरूशालेमेवर आपला सुखाचा मंडप पसरणाऱ्या, तूं धन्य आहेस.

शाब्बाथ असल्यास हेंहि बोलावें.

ושמרו בני ישראל आणि शाब्बाथ पाळायास इस्राएलाच्या संतानानी त्यांच्या पिढ्यानपिढीं शाब्बाथाला सर्वकाळ करारापमाणें मानावें; माझ्या व इस्राएलाच्या संतानांमध्यें ती सर्वकाळपर्यंत खूण, कारण कीं सहा दिवसांत परमेश्वराने आकाश व पृथ्वी उत्पन्न केली, आणि सातव्या दिवशीं स्वस्थ राहून विसांवा घेतला.

शाब्बाथ नसल्यास मात्र हें बोलावें.

כי ביום הזה कारण कीं याच दिवशीं तुमच्या सर्व पापांपासून तुह्मास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो* प्रायश्चित्त करील, मग तुह्मी शुद्ध व्हाल.

קדיש לעילא पृष्ठ ९.

हें उभें राहून हळू व एकचित्ताने बोलावें.

אדני שפתי हे प्रभु, माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमच्या पूर्वजांच्या देवा, आब्राहाम, इसहाक व याकोब यांच्या देवा, मोठ्या, पराक्रमी, भयंकर व परात्पर देवा, कृपादानें देणाऱ्या, सर्व पदार्थांच्या धनी, पूर्वजांच्या यथार्थतेची आठवण करणाऱ्या, आणि दयेंकरून आपल्या नामाकरितां त्यांच्या संततीसाठीं उद्धारक पाठविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

זכרנו לחיים हे जीवनांत आनंद मानणाऱ्या देव-

---

* मुख्य याजक.

राजा ! जीवनाकरितां आमची आठवण कर, हे जीवनाच्या देवा, तूं आपणाकरितां आह्मास जीवनाच्या पुस्तकांत लिही (दरबार बंद होण्याच्या वेळेच्या प्रार्थनेंत— आह्माविषयीं जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.) हे जीवंत देवा, तूं राजा, सहायकर्ता, तारक व आह्मावर ढालरूप असणारा आहेस. हे परमेश्वरा, आब्राहामाच्या ढालरूप (आश्रया!) तूं धन्य आहेस.

אתה גבור हे प्रभू, तूं सर्वकाळ पराक्रमी आहेस! मेलेल्यांस जीवंत करणारा, तारायास समर्थ, दहिवर पाडणारा, कृपेने प्राणिमात्रांचें पोषण करणारा, बहुत दयेने मेलेल्यांस जीवंत करणारा, पडलेल्यांस आश्रय देणारा, रोग्यांस निरोगी करणारा, बंदिवानांस मोकळें करणारा, आणि धुळींत निजलेल्यांबरोबर आपली सत्यता स्थापन करणारा तूंच आहेस. हे अद्भुत कृत्यें करणाऱ्या, तुजसारिखा कोण ! आणि हे राजा, मारणाऱ्या, जिवंत करणाऱ्या व तारण उगीवणाऱ्या, तुझी बरोबरी कोण करूं शकेल !

מי כמוך हे दयाळू बापा, दयेने प्राणिमात्रांची जीवनाकरिता आठवण करणाऱ्या, तुजसारिखा कोण आहे ? आणि मेलेल्यांस जीवंत करणारा तूं सत्य आहेस. हे परमेश्वरा, मेलेल्यांस जीवंत करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אתה קדוש तूं पवित्र आणि तुझें नामहि पवित्र आहे, आणि धार्मिक मनुष्यें नित्य तुझें स्तवन करितात.

לדור ודור पिढीपिढी तुह्मी देवाचें राज्य मान्य करा; कारण तो एकटाच महान व पवित्र आहे.

ובכן יתקדש यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या इस्राएल लोकांमध्यें तुझें नाम पवित्र मानिलें जावो.

ובכן תן פחדך यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या सर्व कामांवर आपलें भय, जें सर्व त्वां उत्पन्न केलें आहेस त्यावर आपला त्रास घाल, ह्मणजे सर्व कृत्यें तुला भितील आणि सृष्टींतील सर्व पदार्थ तुजपुढें नमन करितील; आणि पूर्ण मनाने तुझी इच्छा पूर्ण करण्याकरितां ते एकमेळा करितील. कारण

हे परमेश्वरा, आमच्या देवा, आह्मी जाणतों कीं, राज्य तुलाच (शोभतें), सामर्थ्य तुझ्या हातीं व पराक्रम तुझ्या उजव्या हातीं आहे; आणि सर्व उत्पन्न केलेले पदार्थांस तुझें नाम भयंकर आहे.

ובכן תן כבוד यास्तव लवकर व आमच्या आयुष्याच्या दिवसांत तूं आपल्या लोकांस मोठेपणा दे; आपल्या भिणाऱ्यांची प्रशंसा कर, आपल्या शोधणाऱ्यांस चांगली आशा व आपली वाट पाहाणाऱ्यांस भरंवसा दे, आपल्या देशास आनंदित कर, आपल्या नगरास हर्षित कर, आपला सेवक दाविद याचें शिंग उगीव आणि इशायाचा पुत्र माशीयाह याचा दिवा सिद्ध (प्रकाशित) कर.

ובכן צדיקים यामुळें पुण्यवान पाहून आनंद करितील, यथार्थ हर्ष करितील, आणि धार्मिक उल्हासानें गातील; परंतु पापाचें तोंड बंद होईल, दुष्टाई धुराप्रमाणें नाहींसी होईल; कारण दुष्कर्माचा अधिकार तूं पृथ्वींतून काढून टाकिशील.

ותמלוך אתה मग हे परमेश्वरा आमच्या देवा, तूं आपल्या सर्व कृत्यांवर सियोन डोंगर, जें तुझ्या गौरवाचें वसतिस्थान, आणि यरूशालेम जें तुझें पवित्र नगर, त्यांमध्यें लवकरच राज्य करिशील, तुझ्या पवित्र वचनांतहि तसेंच लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्व काळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे, तुह्मी परमेश्वराला स्तवा.

קדוש אתה तूं पवित्र आहेस, आणि तुझें नामहि भयंकर आहे, आणि तुजवांचून दुसरा कोणी देव नाहीं, आणि लिहिलेंहि तसेंच आहे कीं, सैन्यांचा परमेश्वर नीतीनें उंचावेल, आणि देव जो पवित्र त्याला न्यायानें पवित्र मानितील. हे परमेश्वरा, पवित्र राजा, तूं धन्य आहेस.

אתה בחרתנו त्वां आह्मास सर्व लोकांतून निवडून घेतलें, आह्मावर प्रीति करून व आह्मास प्रसन्न होऊन सर्व भाषांपेक्षां (जातींपेक्षां) आह्मास उंचाविलें, आपल्या आज्ञांकडून आह्मास पवित्र केलें; हे आमच्या राजा, आपली सेवा करण्याकरितां आ-

ह्मास जवळ घेतलें, आणि तुझें मोठें व पवित्र नाम आह्मास दिल्हें आहे.

ותתן לנו आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, प्रीतिभावें-करून माफी, सुटका व क्षमा होण्याकरितां, आणि आमचे सर्व अपराध क्षमा होण्याकरितां तूं आह्मास (शाब्बाथ असल्यास— हा शाब्बाथ दिवस व) हा प्रायश्चित्ताचा दिवस, हा अपराधाच्या क्षमेचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा दिवस, जो मिसरांतून निघण्याच्या आठवणीकरितां प्रीतिरूप पवित्र मेळा तो, दिला आहेस.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, (शाब्बाथ असल्यास—या शाब्बाथ दिवशीं, व) या प्रायश्चित्ताच्या दिवशीं, या अपराधांच्या क्षमेच्या दिवशीं, या पवित्र मेळा मिळण्याच्या दिवशीं, आमचे अपराध क्षमा कर, आणि आमचीं उल्लंघनें पुसून टाक व तुझ्या दृष्टीपुढून दूर कर. जसें ह्मटलें आहे कीं, जो तुझे अपराध आपण होऊन पुसून टाकितो तो मी, मीच आहें, आणि तुझीं पातकें मी स्मरणार नाहीं. आणखी असें ह्मटलें आहे कीं, म्यां तुझे अपराध अभ्राप्रमाणें व तुझीं पातकें ढगाप्रमाणें पुसून टाकलीं आहेत ; म्यां तुला उद्धारिलें ह्मणून मजकडे परत ये. आणखीहि असें ह्मटलें आहे कीं, याच दिवशीं तुमच्या सर्व पापांपासून तुह्मास परमेश्वरा समोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील, मग तुह्मी शुद्ध व्हाल.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची, आमच्या पूर्वजांची, तुझ्या यरूशालेम नगराची, तुझा सेवक दावीद याचा पुत्र जो माशीयाह याची, आणि तुझे सर्व लोक इस्राएलाचें घराणें यांची, आठवण (शाब्बाथ असल्यास—या शाब्बाथ दिवशीं व) या प्रायश्चित्ताच्या दिवशीं, या अपराधाची क्षमा होण्याच्या दिवशीं, या पवित्र मेळा मिळण्याच्या दिवशीं, यशस्वी तारणाकरितां कृपेनें, दयेनें व ममतेनें तुजपुढें चढो, येवो, पोंहोचो, पाहिली जावो, मान्य होवो, ऐकिली जावो,

लक्षांत आणिली आणि आठविली जावो. आह्मावर दया करण्यास व आमचें तारण करण्यास, हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमचें कल्याण होण्याकरितां आमची आठवण कर; आह्मावर आशीर्वाद होण्याकरितां आह्मास दर्शन दे; आह्मास चांगलें जीवन प्राप्त होण्याकरितां आमचें तारण कर; तारणाच्या व दयेच्या वचनाने आह्मास राख, आह्मावर कृपा कर, आमची करुणा येऊं दे, आह्मावर दया कर आणि आह्मास तार; कारण तूंच दयाळू व कृपाळू देवराजा आहेस; ह्मणून आमचे डोळे तुजकडे लागले आहेत.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, सर्व जगावर तूं आपल्या गौरवाने राज्य कर; आपल्या वैभवाने सर्व पृथ्वीवर थोर मानिला जा; आणि आपल्या सामर्थ्याच्या महत्वाने भूमंडळाच्या राहणाऱ्यांवर प्रकाशित हो, मग सर्व उत्पन्न केलेले(पदार्थ)जाणतील, कीं त्वां त्यांस उत्पन्न केलें; सर्व घडविलेले (पदार्थ) जाणतील, कीं त्वां त्यांस घडिलें; आणि ज्यांच्या नाकपुड्यांत श्वास आहे, ते ह्मणतील कीं, इस्राएलांचा परमेश्वर देव राज्य करितो; आणि त्याचा अधिकार सर्वांवर चालतो.

קדשנו במצותיך तूं आपल्या आज्ञांकडून आह्मास पवित्र कर; तुझें शास्त्र आमचें वतन होऊं दे; आपल्या चांगुलपणाकडून आह्मास तृप्त कर; आपल्या तारणाकडून आमचा जीव आनंदित कर; तुझी सेवा सत्यानें करायास आमचीं मनें शुद्ध कर; कारण तूं (स्वतां) सत्य परमेश्वर देव आहेस; आणि हे आमच्या राजा, तुझें वचन सर्वकाळ सत्य व स्थापित आहे. हे परमेश्वरा राजा, आमचे अपराध व आपले लोक इस्राएल यांचे अपराध माफ व क्षमा करणाऱ्या, आणि वर्षोवर्षीं आमचे अतिक्रम दूर करणाऱ्या, सर्व पृथ्वीच्या राजा, (शाब्बाथ असल्यास— शाब्बाथास व) इस्राएलास व प्रायश्चित्ताच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

רצה יי אלהינו हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या इस्राएल लोकांस प्रसन्न हो, त्यांची प्रार्थना मनावर घे,

आपल्या घराच्या प्रसादस्थानीं पूजन पुन: चालू कर, इस्राएलांचीं अर्पणें व त्यांची प्रार्थना लवकर आवडीने मान्य कर, आणि तुझ्या इस्राएल लोकांची भक्ति तुला आवडो.

ואתה ברחמיך הרבים तूं आपल्या बहुत दयेने आह्माविषयीं संतोषित होऊन आह्मास प्रसन्न हो, मग आमचे डोळे तुला कृपेंकरून सियोनेकडे फिरतांना पाहतील; हे परमेश्वरा, आपला शेखीना* सियोनेमध्यें पुन: स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

מודים אנחנו לך सदांसर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव जो तूं, तुलाच आह्मी स्तवितों.† तूं आमचा व आमच्या जीवाचा खडकरूप आश्रय व आमच्या तारणाची ढाल आहेस. आमचा जीव तुझ्या हातीं सोंपिलेला आहे, आमचा आत्मा तुझ्या स्वाधीन आहे, तुझे चमत्कार आह्मामध्यें नित्य केले जातात, आणि तुझीं आश्चर्यकृत्यें व तुझा चांगुलपणा आह्मी संध्याकाळीं, सकाळीं व दोनप्रहरीं अनुभवितों ; त्याकरितां आह्मी पिढोपिढीं तुझें कीर्तन करूं व तुझे स्तुतीचें वर्णन करूं. तूं चांगला आहेस, कारण तुझी दया (आह्मावरून) नाहींसी होत नाहीं. तूं कृपाळू, कारण सर्वकाळ आह्मी तुजवर आशा ठेवितों, ह्मणून तुझी कृपा आह्मावरून सरत नाहीं.

ועל כלם יתברך हे आमच्या राजा, या सर्व (दयेवरून) तुझें नाम अखंडित व सर्वकाळ धन्य ह्मटलें, उंचाविलें व वर्णिलें जावो. आणि सर्व प्राणी तुझें स्तवन करोत. सेलाह. तूं आपल्या कराराच्या लेंकरांस चांगल्या जीवनाकरितां लिही. (दरबार बंद होण्याच्या वेळेच्या प्रार्थनेंत— तूं आपल्या कराराच्या लेंकराविषयीं जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.)

ויהללו ויברכו मग हे आमच्या तारणाच्या व सहायकारी देवा, आणि हे उत्तम देवा, ते सर्वकाळ तुझ्या मोठ्या नामास सत्यतेने स्तवितील; आणि धन्य ह्मणतील, कारण तें चांगलें

---

* साक्षात्कार † स्तवितों याच्या इब्री शब्दाचा अर्थ कोणी अधिकार मान्य करितों असाहि करितात.

आहे. सेलाह. हे परमेश्वरा, तूं धन्य आहेस, चांगलें तुझें नाम आणि स्तवन तुलाच शोभतें.

שים שלום (हे परमेश्वरा,) आह्मावर व तुझ्या सर्व इस्राएल लोकांवर चांगले, आशीर्वाद, जीवन, दया, कृपा, यथार्थता व ममता असूं दे, आणि हे आमच्या बापा, तूं आपल्या मुखतेजा कडून आम्हां सर्वांस एक मेळी आशीर्वाद दे, कारण हे आमच्या बापा, तूं आपल्या मुखतेजाकडून आह्मास शास्त्र व जीवन, प्रीति व दया, यथार्थता व कृपा, आशीर्वाद व शांति दिल्हीं आहेस. आणि आह्मास व तुझ्या सर्व इस्राएल लोकांस मोठा सामर्थ्यरूप व कल्याणयुक्त आशीर्वाद देण्यास तुझ्या दिसण्यांत चांगलें असो.

ובספר חיים आणि आम्ही व तुझे सर्व इस्राएल लोक हे (दरबार बंद होण्याच्या वेळेच्या प्रार्थनेंत— आह्माविषयीं व तुझे सर्व इस्राएल लोक यांविषयीं) चांगल्या जीवनाकरितां व कल्याणाकरितां, जीवनाच्या, आशीर्वादाच्या, कल्याणाच्या, चांगल्या अन्नसामग्रीच्या, तारणाच्या, समाधानाच्या, व चांगल्या निवाड्याच्या पुस्तकांत तुजपुढें आठवण होऊन लिहिले जावोत (दरबार बंद होण्याच्या वेळेच्या प्रार्थनेंत— मोहोर केली जावो.)

" ברוך אתה हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

יהיו לרצון हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें आणि माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

אלהינו ואלהי אבותנו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची प्रार्थना तुजपुढें यावी असें आम्ही मागतों; आणि आमच्या विनंतीपासून तूं लपून राहूं नको; कारण आम्ही यथार्थ आहों, आम्हीं पाप केलें नाहीं, असें तुजपुढें बोलायास, हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मास धिटाई व धारिष्ट नाहीं, निश्चयें आह्मी व आमच्या वडिलांनीहि पाप केलें आहे.

אשמנו בגדנו आम्ही अतिक्रम केले, विश्वासघात

केला, लुटलें, चाहाडी व वाईट भाषणें केलीं, अपराध केले, दुष्टाई केली, गर्व केला, जुलूम केला, खोटें रचिलें व वाईट योजनाहि केल्या. भोंदलें, थट्टा केली, बंडावा केला, अपवाद केला, व्यभिचार केला, व्यर्थ व खोट्या शपथीहि वाहिल्या. अनिवार झालों, वांकडे वर्तलों, उलंघनें केलीं, दुःख दिल्हें, आह्मी आपली मान ताठरहि केली. दुराचार केले, नासलें, ओंगळ केलें, वहकलों, आणि दुसऱ्यासहि वहकविलें. आणि आह्मी तुझे सुंदर नियम व न्याय सोडून फितूर झालों; परंतु तेणेंकरून आह्मास कांहीं लाभ झाला नाहीं. तथापि जें अवघें आह्मावर आलें आहे त्याविषयीं तूं सात्विक आहेस; त्वां सत्यता केली आहेस, परंतु आह्मी दुष्टाई केली आहे.

מה נאמר हे उंचस्थानीं राहणाऱ्या, आह्मी तुजपुढें काय ह्मणूं, आणि हे आकाशांत वस्ती करणाऱ्या, आह्मी तुजपुढें काय कळवूं ? तूं गुप्त व उघड गोष्टी जाणत नाहींस काय? तूं जगांतील सर्व गुह्य आणि प्राणिमात्रांचीं गुप्तकर्में जाणतोस. तूं सर्वांचीं अंतर्यामें पारखितोस, मन व गुर्दे कमळें पाहातोस, तुजपुढें कांहींच झांकलें जात नाहीं; आणि तुझ्या दृष्टीपासून कांहींच लपलें जात नाहीं.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, त्वां आह्मावर दया करावी, आह्मास आमचीं सर्व पापें माफ करावीं, आह्मास आमचे सर्व अपराध क्षमा करावे, आणि आमचीं सर्व उलंघनें माफ व क्षमा करावीं; असी तुझी प्रसन्नता होवो.

על חטא जें पाप आह्मी अगत्यामुळें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी निर्बुद्धीने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी उघडपणें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी जाणून व कपटानें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी मन विचारानें केलें असेल त्याची.
जें पाप आम्हीं तोंडच्या वचनानें केलें असेल त्याची.
जें पाप आम्हीं गर्विष्ठपणें केलें असेल त्याची.
जें पाप आम्हीं बळकट हातानें केलें असेल त्याची.

जें पाप आम्ही ओंठाच्या विटाळाने केलें असेल त्याची.
जें पाप आम्ही दुष्टवासनेने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी जाणून आणि न जाणून केलें असेल त्याची.
जें पाप आम्ही ठकबाजीने व लबाडीने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी वाईट जिव्हेने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी डोळ्याच्या नजरेने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी उन्मत्तपणें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी व्याजामुळें व वाढीमुळें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी गुप्तपणें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी उंचदृष्टीने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी आशा देऊन केलें असेल त्याची.
जें पाप आम्ही पायांच्या पावलानी केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी ताठर मानेने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी चाहाडीने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी आपल्या शरीरांतलि व त्याप्रमाणें आमचा जीव, आत्मा व प्राण यांतीलहि दोनशें अठेचाळीस अवयव व तीनशें पांसष्ट शिरा, यांकडून केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी विसरतेपणें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी मन घाबरल्यामुळें केलें असेल त्याची.

על חטאים ज्या पापांकरितां आह्मास दोषार्पण करणें योग्य आहे त्यांची. (खरोखर व संशययुक्त त्यांचीहि.)
ज्या पापांकरितां आह्मास चढतें उतरतें अर्पण* करणें योग्य आहे त्यांची.
(ज्या पापांकरितां आह्मास होम करणें योग्य आहे त्यांची.)
ज्या पापांकरितां आह्मास नेमलेलें पापार्पण करणें योग्य आहे त्यांची.
ज्या पापांकरितां आह्मास ईश्वरसत्तेचें मरण † योग्य आहे त्यांची.
ज्या पापांकरितां आह्मास छेदले जाणें ‡ योग्य आहे त्यांची.
ज्या पापांकरितां आह्मास चाळीस फटके¶ योग्य आहेत त्यांची.

* टीक . ४ † लेवीय २२.९ ‡ निर्गम १२.१५. ¶ अनुवाद २५.३.

(ज्या पापांकरितां आह्मास बंडखोरांचें शासन योग्य आहे त्यांची.)
(ज्या पापांकरितां आह्मास अपांक होणें योग्य आहे त्यांची.)
ज्या पापांकरितां आह्मास न्यायसभेचे चार देहांत **दंड**, ह्मणजे धोंडमार, जाळणें, वधणें व श्वासबंद करून मारणें, * योग्य आहेत त्यांची; करण्याविषयींच्या आज्ञा व न करण्याविषयींच्या आज्ञा (भंग करण्याच्या दोषांची;) काम लावून दिल्हेल्या आज्ञांच्या व काम न लावून दिल्हेल्या आज्ञांच्या दोषांची; जीं पापें आह्मी जाणत आहों त्यांची, आणि जीं आम्ही जाणत नाहीं (त्यांची तूं क्षमा कर.) जीं आम्ही जाणत आहों तीं, हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आम्ही पूर्वींच तुजपुढें म्हणून दाखविलीं आहेत; आणि जीं आह्मी जाणत नाहीं तीं सर्व, हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुजपुढें उघड व प्रगट आहेत. जसें ह्मटलें आहे कीं, ज्या गोष्टी गुप्त ठेविलेल्या त्या आमचा देव परमेश्वर याच्या आहेत, परंतु ज्या उघड्या केलेल्या, त्या आमच्या व आमच्या संतानांच्या सर्वकाळ आहेत; आह्मी शास्त्रांतल्या सर्व गोष्टी पाळाव्या ह्मणून. कारण इस्राएलास क्षमा करणारा, आणि येशूरूनाच्या† वंशांस माफ करणारा तूंच आहेस; आह्मास माफ करणारा व क्षमा करणारा तुजवांचून कोणी नाहीं.

אלהי עד שלא נוצרתי हे माझ्या देवा, जोंपर्यंत मी घडलों नव्हतों तोंपर्यंत मी अयोग्य होतों; आणि आतां जेव्हां मी घडलेला आहें, तेव्हांहि मी घडलेला नाहींच असा आहें; जीवंत असतां मी माती आहें; मग माझ्या मरणानंतर अधिकच. हे परमेश्वरा माझ्या देवा व माझ्या पूर्वजांच्या देवा, पाहा, मी तुजपुढें लज्जेने व कालिमेने भरलेल्या पात्राप्रमाणें आहें; आणि पुनः असें करणार नाहीं असें बोलायास मला भाग्य आहे, परंतु मी दुष्ट वासनेला भितों; कारण ती अग्नीपासून (घडलेली) आहे, आणि मी मांस व रक्त आहें. मी तिजवर प्रबल होऊं शकत नाहीं, म्हणून कदाचित माझ्या (सध्यांच्या) पापांपेक्षां अधिक उल्लंघनें वाढतील.

* टीका ५. † अनुवाद ३२, १५ एथें येशूरून हें नाम इस्राएलास दिलें आहे.

तरी हे परमेश्वरा, माझ्या देवा व माझ्या पूर्वजांच्या देवा, मी आणखी पाप करूं नये; आणि जें मी पाप केलें आहे, त्याचा आपल्या पुष्कळ दयेनें नाश कर, परंतु मला कठोर शासन करूं नको व मजवर वाईट रोग आणूं नको. हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें आणि माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

एथें אלהי נצור व. प्र. प्रा. पृष्ठ. २१ हें बोलण्याची चाल आहे.

עושה שלום जो उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेनें आह्मास व सर्व इस्राएल लोकांस शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

शाब्बाथ असल्यास हें बोलावें.

ויכלו השמים तसें आकाश व पृथ्वी व त्यांतील सर्व समुदाय, हीं समाप्त झालीं. मग देवानें आपलें जें काम केलें होतें त्यापासून तो सातव्या दिवशीं थांबला; आणि आपलें सर्व जें काम केलें होतें त्यापासून सातव्या दिवशीं स्वस्थ राहिला. आणि देवानें सातव्या दिवसाला आशीर्वाद दिल्हा आणि त्याला पवित्र केलें, कारण कीं त्यांत आपलें जें उत्पत्तीचें काम त्यापासून स्वस्थ राहिला.

" ברוך אתה हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमच्या पूर्वजांच्या देवा, आब्राहामाच्या देवा, इसहाकाच्या देवा व याकोबाच्या देवा, मोठ्या, पराक्रमी व भयंकर देवा, परात्पर देवा, दयेनें आकाश व पृथ्वी यांवर धनीपणा चालविणाऱ्या, तूं धन्य आहेस. तो आमच्या पूर्वजांची ढाल, आपल्या आज्ञेकडून मेलेल्यांस सजीव करणारा, ज्यासारिखा दुसरा नाहीं असा पवित्र राजा, आपल्या लोकांस आपल्या शाब्बाथ दिवशीं विश्रांति देणारा असा आहे; कारण त्यांस विश्रांति देण्यास त्यास हर्ष झाला. त्याचें आम्ही भयानें व त्रासानें भजन करूं; आणि त्याचें नाम प्रतिदिवशीं अखंडित स्तवूं. तो आशीर्वादांचा उगम, पुष्कळ स्तुतीस योग्य, शांती-

चा स्वामी, शाब्बाथास पवित्र करणारा, सातव्या दिवसास आशीर्वाद देणारा, आणि उत्पत्तीच्या कृत्यांच्या आठवणीकरितां हर्षाने तृप्त झालेले लोकांस पवित्रतेने विसांवा देणारा आहे.

אלהינו ואלהי אבותינו हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या विसांव्यामुळें तूं प्रसन्न हो; आपल्या आज्ञांकडून आह्मास पवित्र कर; आपल्या शास्त्रांत आमचा विभाग राखून ठेव; आपल्या चांगुलपणा कडून आह्मास तृप्त कर; आपल्या तारणाकडून आमचा जीव हर्षित कर; सत्यतेने तुझी सेवा करावी म्हणून आमचीं मनें शुद्ध कर; आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा पवित्र शाब्बाथ आम्हास वतन करून दे, असा कीं तुझें नाम पवित्र मानणाऱ्या सर्व इस्राएलांनी त्यांत स्वस्थ राहावें. हे परमेश्वरा, शाब्बाथास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

קדיש לעילא पृष्ठ ९.

תפלה לדוד दावीदाने केलेली प्रार्थना, हे परमेश्वरा, नीति ऐक, माझ्या रडण्याचें श्रवण कर; माझ्या प्रार्थनेकडे कान दे. कां तर ती कपट ओठांतून नाहीं. दावदिाकडून प्रार्थना, हे परमेश्वरा, तूं आपला कान लावून माझें ऐक; कारण कीं मी दुःखित व दुबळा आहें. देवाचा माणूस मोशे याची प्रार्थना, हे प्रभु, तूं पिढोपिढीं आमचा आश्रय आहेस. दुःखितांसाठीं प्रार्थना, जेव्हां तो बुडतो आणि परमेश्वरापुढें आपुलें हार्द्र ओतितो तेव्हांची. हबाकुक भविष्यवाद्याची शिग्योनोथेवर प्रार्थना. हे इस्राएला, ऐक, परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे. हे परमेश्वरा, ऐक आणि मजवर दया कर; हे परमेश्वरा, मला सहाय हो. हे परमेश्वरा, मी हाक मारितों; तूं माझा शब्द ऐक, मजवर कृपा कर आणि मला उत्तर दे. हे परमेश्वरा, माझी विनंती ऐक; हे परमेश्वरा, माझी प्रार्थना मान्य कर. हे माझ्या लोका, मी बोलतों;

हे इस्राएला, मी तुजवर साक्ष देतों, ऐक; मी देव तुझा देव आहें. अहो माझे लोक, तुह्मी ऐका, मग मी तुह्माला साक्ष देईन, हे इस्राएला, त्वां माझें ऐकावें. कां तर त्याने दुःखिताच्या दुःखाचा धिःकार केला नाहीं, कंटाळा केला नाहीं, आणि त्याने आपलें तोंड त्याच्यापुढें लपविलें नाहीं; परंतु जेव्हां हा त्याजवळ ओरडला, तेव्हां त्याने ऐकिलें. कां तर परमेश्वर दुबळ्याचें ऐकतो, आणि आपल्या बंदिवानाची उपेक्षा करीत नाहीं. जेव्हां मी तुझ्याजवळ ओरडतों, जेव्हां मी आपले हात तुझ्या पवित्र गाभाऱ्याकडे उभारितों, तेव्हां तूं माझ्या काकुळतीची वाणी ऐक. हे परमेश्वरा, तूं माझी प्रार्थना ऐक, आणि माझ्या ओरडण्याकडे कान दे, माझ्या अश्रुपाताविषयीं उगाच राहूं नको, कां तर मी आपल्या सर्व वडिलांसारिखा तुझ्याजवळचा विदेशी प्रवासांत आहें. हे परमेश्वरा, तूं माझी प्रार्थना ऐक, आपल्या सत्यतेने माझ्या काकुळतीकडे कान लाव; आपल्या नीतीने मला उत्तर दे. मी परमेश्वराला हाक मारितों, तेव्हां तो ऐकतो. हे परमेश्वरा, तुझी कीर्ति ऐकून मी भयभीत झालों आहें; हे परमेश्वरा तूं आपलें कार्य वर्षांच्यामध्यें स्थापन कर, वर्षांच्यामध्यें विज्ञापन कर; कोपाच्या समयीं दया स्मर. हे आमच्या राजा, तूं आपणापुढून आह्मास रिकामे परतवूं नको, कारण तूं प्रार्थनेचा ऐकणारा आहेस. हे प्रार्थनेच्या ऐकणाऱ्या; सर्व मांसमय तुजकडे येतील.

" אנא हे परमेश्वरा, मी विनंती करितों कीं, जे लोक (तुझ्याजवळ) प्रार्थना करितात, त्यांस तूं आपली दया दाखीव, त्यांची काकुळती मान्य कर, आणि त्यांस सांपड; कारण ते तुझ्या नामाने हाक मारितात.

שמע תפלה हे प्रार्थना ऐकणाऱ्या! तुजकडे सर्व मांसमय येतील.

" אנא हे परमेश्वरा, मी विनंती करितों कीं, खेदित मनाने जेव्हां मी हाक मारितों, तेव्हां माझी काकुळती ऐक,

माझा ताठरपणा दूर कर; * हे परमेश्वरा, नीति ऐक व माझ्या वाणीकडे कान लाव. שמע תפלה

" אנא हे परमेश्वरा, मी विनंती करितों कीं, तुझ्या अशक्त (लोकांस) तूं आश्रय दे; जेव्हां ते तुझा दरवाजा ठोकितात, तेव्हां तूं आपलें महत्व त्यांस दाखीव, आणि जेव्हां मी तुजकडे ओरडतों, तेव्हां माझ्या काकुळतीची वाणी ऐक שמע תפלה

" אנא हे परमेश्वरा, मी विनंती करितों कीं, दुःखित जीवाकडे लक्ष लाव, आणि जे अश्रूंनी पेरितात ते उत्साहाने कापीत; हे परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐक, आणि माझ्या विनंतीकडे कान लाव. שמע תפלה

" אנא हे परमेश्वरा, मी विनंती करितों कीं, माझी आठवण करून मला दर्शन दे; आणि हे परमेश्वरा, माझ्या अतिक्रमाप्रमाणें माझा न्याय करूं नको. हे परमेश्वरा, मी हाका मारितों, माझी वाणी ऐक आणि मजवर दया करून मला उत्तर दे. שמע תפלה

" אנא हे परमेश्वरा, मी विनंती करितों कीं, तुझ्या गरीब झालेल्या लोकांवर व तुझ्या दयेची वाट पाहाणाऱ्यांवर तूं आपल्या आकाशांतील वस्तिस्थानांतून दया कर; कां कीं तुझ्या नगरास व तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. שמע תפלה

שמע תפלה हे प्रार्थना ऐकणाऱ्या, सर्व मांसमय तुजकडे येतील. हे विनंती ऐकणाऱ्या, सर्व प्राणी तुजकडे येतील; तुजकडे सर्व प्राणी व जीव येतील.

הנשמה לך हे खडकरूप आश्रया ! तुजसारिखा कोणीच नसतां, प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य आहे, ह्मणून तूं आपले हस्तकर्मावर दया कर.

אשרו דרכיכם अहो (सत्वशील) लोकांनो! तुह्मी आपले मार्ग सरळ करा; हा प्रायश्चित्ताचा दिवस, ज्या दिवशीं खाणें

---

* इ. निरोगी कर.

मना केलें आहे; त्या दिवसाविषयींच्या आज्ञा तुह्मी उलंघूं नका. הנשמה לך

בתענית היו ज्या दिवशीं उंच आकाशांतील (देवाकडून) पिण्याचीहि मनाई आहे त्या दिवशीं त्या दयाळू व कृपाळू देवापुढें तुह्मीं उपास करून काकुळती करा. הנשמה לך

רחמים משמי מעונים ज्या दिवशीं देव प्रसन्न होतो, आणि ज्या दिवशीं अंघूळ करणें मना केलें आहे, त्या दिवशीं आकाशांत वस्ति करणाऱ्या देवापुढें लज्जित तोंडानें तुह्मी दया मागा. הנשמה לך

התודו על עוניכם ज्या दिवशीं उटणें लावणें मना केलें आहे, त्या दिवशीं तुह्मी आपला परमेश्वर देव याजपुढें आपलीं पापें कबूल करून प्रार्थना करा. הנשמה לך

מעל וחטאת עזבו ज्या दिवशीं धनवानास व गरीबास जोडा घालायास मना आहे, त्या दिवशीं तुह्मी आपलीं दुष्ट कर्में व पापाचरण सोडून आपल्या जीवाचें रक्त अर्पण करा. הנשמה לך

הזקו רפי ידים ज्या दिवशीं पापाचें प्रायश्चित्त होतें, आणि (ज्या दिवशीं) स्त्रीपुरुष एकत्र निजायास मना आहे, त्या दिवशीं तुह्मी आपले अशक्त हात बळकट करून देवाकडे आपले तळहात पसरा. הנשמה לך

התבשרו तुह्मी सुवर्तमान कळवा, कारण कीं याच दिवशीं तुमचा खडकरूप आश्रय तुह्मावर शुद्ध पाणी शिंपडून तह्मी केलेल्या पापांपासून तुह्मास शुद्ध करील. הנשמה לך

שטר עלי उद्यां जेव्हां परमेश्वर न्यायाधीश होईल, तेव्हां मजवर साक्षीनिशीं व शपथेनिशीं निघालेल्या (कर्ज) रोख्याची फेड करणें आहे; परंतु जेव्हां (त्याविषयीं) मी दुरून विचार केला, तेव्हां मी अतिशय रडलों; कारण रडण्याची वेळ

आहे, आणि हासण्याचीहि वेळ आहे; जेव्हां न्यायाचा दिवस मला आठवला, तेव्हां मला कंप सुटला, भय आणि त्रास यांणी मला व्यापिलें; यास्तव मी आपल्या हृदयाच्या हट्टामुळें आपल्या मनीं खेद पावलों, कीं मी आपल्या बापाकडे कसा चढेन?

הנשמה לך हे खडकरूप आश्रया, तुजसारिखा कोणीच नसतां, प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य आहे, म्हणून तूं आपले हस्तकर्मावर दया कर.

שוך למי רב זדונו ज्याचे अपराध पुष्कळ आहेत, ज्याच्या पापाची झडती त्या दिवशीं होईल, आणि ज्यास आपले धन्यास हिशेब द्यावा लागेल, त्याजकडे पाहा; त्या दिवशीं जेव्हां तो (देव) शरीरासहित आत्म्यास शासन करण्यास येईल, तेव्हां तो सरदाराचीहि तोंडओळख धरणार नाहीं. त्या दोघांचा न्याय व वाद देव त्यांचा स्वामी, याजकडे येईल; आत्म्याने त्वरेने उत्तर केलें कीं मजवर कांहींच पाप लिहिलेलें नाहीं; याप्रमाणें त्याने आपल्या फिरण्याविषयीं आपणास न्यायी दाखविलें. הנשמה לך

הרפני ועזבני मला जाऊं दे, मला सोड. मजशीं वाद करायास मला थांबवितोस काय? तूं मजशीं कां वाद करितोस हें मला कळीव; माझा पवित्र मजवर प्रीति करीत नाहीं, कारण त्याने मला बेड्या घालून आणून अंधार (कोठडींत) घातलें आहे; अमंगळ देह मला त्रास देतो, त्याकुजट प्रेतापासून मी पळत आहें; मी थकलों व अतिशय जर्जर झालों, कारण त्या ठक देहानें मला ठकविलें ह्मणून मी खालें (पाप केलें.)

בכל חטא יתגלע सर्व प्रकारच्या पापांत तो निमग्न आहे, जसा गोफणींत धोंडा फिरवितात तसा तो मला फिरवितो; अनर्थ करण्यापासून तो आपला हात आवरीत नाहीं; त्याने मला मसलत देवून थांबविलें, आणि नाशाप्रत पोहोंचविलें; निश्चयें, आतां त्यानें मला म्लान केलें; सर्व प्रकारच्या लोभांत तो गुंतला आहे, खाण्यापीण्यापासून तो वळत नाहीं; असो, परंतु दुष्टाचें पोट रितें राहील; तो आपल्या स्वतःस विटाळायास लपून राहतो, कारण तो

आपल्या नांवाप्रमाणें आहे, ह्मणजे तो मूर्ख असून त्याजबरोबरहि मूर्खत्व आहे. הנשמה לך

יצודני פורע क्षणांत तो मला फांसांत धरून आपल्या दांतांखालीं धरितो, मी त्याच्या दिसण्यांत ठकविणाऱ्याप्रमाणें आहें; पाहा, त्याचीं पापें अवर्णनीय आहेत; यास्तव आपल्या दुष्टाईच्या परिणामाप्रमाणें तो लाजतो व संकोचित होतो; त्याचा सूड मजवर उगवूं नको, आणि देहाची शिक्षा उगी करूं नको, कारण तो पूर्ण ढोंगी व दुष्कर्मी आहे. तेव्हां देह आपला बचाव करण्यासाठीं ह्मणाला, मला सोड, मला असूं दे; मी शुद्ध व निष्पाप आहें; पाहा, (मजवर) दगडाप्रमाणें ओझीं आहेत, मी लाजेनें व धिक्कारानें भरलों आहें, तर मी काय करूं शकेन ? הנשמה לך

גם אני נשכל निश्चयें, मी निष्फलहि आहें, जो द्राक्षाची डाहाळी कांहींच फल देत नाहीं तिजसारिखा मी आहें; जीव नसल्यास, ज्या घरांत कोणी राहणारा, उत्तर देणारा किंवा ऐकणारा नसतो, त्यासारिखा मी आपल्या स्वतःस मानितों; यास्तव सकाळपासून संध्याकाळपर्यंत जो आपल्या जागेवरून हालत नाहीं, त्या दगडाप्रमाणें मी टाकलेला आहें. पाहा, सर्व झडती जीवावर व त्याच्या दुष्ट कृत्यांवर आहे. त्याच्या कर्माप्रमाणें तूं त्याची फेड कर; हे माझ्या जीवा, तुझ्या फितुरीचें दुःख तूच सोस; आपलें फल खा; आणि आपलें ऋण फेड. सर्व (कोणत्याहि) वाईटाकरितां मी तान्हेला नव्हतों; तुजमध्यें मी अगदीं मुका होतों, मग मी विटाळलों नाहीं, असें तूं (आपणाविषयीं) कसें ह्मणतोस.

מחשבותיך הבינו तुझे विचार (देवास) कळले आहेत; आणि तुझ्याच हातानें सर्व केलें आहे. मग मी काय? कीं तूं मजवर कुरकूर करितोस;* ते (उभयतां) गलबल करून थकले, परंतु त्यांस यथार्थता सांपडली नाहीं. शेवटीं ते एक प्रत्येकास जडले, मग विचार करणारें मन व त्याचीं कृत्यें एकमत्ताचे होऊन हे दोघे साक्ष झाल्यावर ते दोघे † एकदाच स्तब्ध राहिले, परंतु त्यांच्या

* इ. आह्मी कार्य कीं तुह्मी आह्मावर कुरकुर करितां. † देह व जीव.

दोषांचा अनर्थ दूर होवो, आणि त्यांची शिक्षा भारी न होवो. कारण निश्चयें, तो मांसमय आहे; एकाग्राने हट्टाची आवड धरिली, म्हणून हे दयावंता, जर तूं त्याच्या कर्मांप्रमाणें, (त्याच्या पदरीं) मोजून देशील, तर (तुजपुढें) कोण उभा राहील; तूं आपला पेटलेला क्रोध शांत कर, आपल्या रागाने शिक्षा करूं नको. परंतु आपल्या दासांच्या पुत्रास विसांवा दे; आतां मला मुक्ति व्हावी म्हणून आपणाजवळ घे, आणि ज्या दिवशीं तूं मला न्यायांत आणिशील, तेव्हां तूं आपल्या रागाने मला धमकावूं नको.

הנשמה לך प्राण हा तुझा, व शरीरहि तुझेंच कृत्य आहे, म्हणून तूं आपले हस्तकर्मावर दया कर. हे खडकरूप आश्रया, तुजसारिखा कोणीच नसतां, प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य आहे, म्हणून तूं आपले हस्तकर्मावर दया कर. प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य आहे म्हणून, हे परमेश्वरा, तूं आपल्या नामाकरितां कार्य कर. हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या नांवाने आम्ही म्हटले गेलों आहों. तुझें नाम आम्हामध्यें गाजविलें जातें, म्हणून हे परमेश्वरा, आमच्या देवा, आम्हास सोडूं नको. आणि मी तुझ्या परम कृपेने तुझ्या मंदिरास येईन, तुझ्या भयाने तुझ्या पवित्र देवळांत भजन करीन. तुझ्या पवित्र देवळाकडे भजन करीन, आणि तुझ्या दयेमुळें व तुझ्या सत्यतेमुळें तुझ्या नांवाची स्तुति करीन, कारण कीं त्वां आपल्या सगळ्या नांवांपेक्षां आपलें वचन मोठें मोजिलें आहे. या, आपण आपल्या (उत्पन्न) करणाऱ्या परमेश्वरासमोर नमन करूं, गुडघे टेंकूं, व पायां पडूं. पवित्रतेच्या शोभेने परमेश्वराला भजा, अहो पृथ्वीचे सर्व, तुम्ही त्याच्यासमोर भय धरा. परमेश्वराला त्याच्या नामाचें गौरव द्या, पवित्र शोभेने परमेश्वरापुढें नमन करा. आणि त्या समयीं असें होईल कीं, मोठा करणा वाजेल, तेव्हां जे अश्शूर देशामध्यें नाशाच्या लागास आलेले ते, आणि मिसर देशांत घालविलेले ते येतील; आणि यरूशालेमेंत पवित्र पर्वतावर परमेश्वराला भजतील. परमेश्वर आमचा देव याला तुम्ही उंच माना, आणि त्याच्या पवित्र

डोंगरावर भजा, कां तर परमेश्वर आमचा देव पवित्र आहे. तूंच तूं मात्र परमेश्वर आहेस; त्वां आकाशें, आकाशांचीं आकाशें व त्यांचीं सर्व सैन्यें, पृथ्वी व जें कांहीं तिजवर आहे, समुद्र व त्यांतलें सर्व त्वां उत्पन्न केलें, व तीं तूं वांचवितोस आणि आकाशांचीं सैन्यें तुजपुढें नमन करितात.

משתחוים להדרת (तुझे इस्राएल) आरिएल डोंगराच्या पवित्र शोभेकडे आणि हारएलाच्या* पायाच्या मोलवान कोपऱ्याकडे नमन करितात, उद्यांच्या दिवसाकरितां ते आपणास पवित्र करून आतां परमेश्वरापुढें विनंती करितात. हे इस्राएला! तूं आपल्या देवाच्या पुढें जाण्यास सिद्ध हो.

הכון לקראת हे इस्राएला ! तूं आपल्या देवाच्या पुढें जाण्यास सिद्ध हो.

הבו עוז देवास द्वीपांमध्यें वैभव द्या, पूर्वेकडील देशांत त्याचें गौरव करा; अहो निवडक लोकहो! अन्य लोकांच्या कुटुंबांपासून वेगळे व्हा, आणि या प्रायश्चित्ताच्या दिवसीं तुह्मी शुद्ध व्हा; सर्व पापापासून मुक्त व्हा, अपराधापासून सांभाळून जा; कारण सर्व इस्राएलाच्या पुत्रांस, ही पाळायाची रात्र आहे. הכון

וקרעו הלבבות तुह्मी आपलीं मनें फाडा आणि त्याचा गर्व मोडा; आपल्या पूर्वजांची पुण्याई (देवापुढें) वर करा, आपणास त्याच्या प्रकाशांत चालवा; आणि समुद्राच्या गर्जनेच्या वाणीप्रमाणें (तुह्मी ओरडत) आकाशांतील (देव), जो लढाईमध्यें बळवान, जो झोंपीं जात नाहीं व घाबरत नाहीं, आणि जो आब्राहाम, ईसहाक व इस्राएल यांचा देव, त्यापुढें ओरडा. הכון

דלתי קבלה (हे देवा,) त्यांच्या विनंत्या करितां (प्रार्थना) मान्य करण्याचीं द्वारें तूं उघड; त्यांच्या रोगांकरितां आरोग्यतेचे उपाय त्यांस सांपडूं दे, आपलें दयेचें व कृपेचें मुख त्यांजवर प्रकाशित कर, त्या (दयेची व कृपेची) वाट पाहाणाऱ्यांस क्षमेच्या पुस्तकांत लिहून त्यांत इस्राएलाच्या पुत्रांचीं नावें कोर. הכון

* टीका ५.

המצא לישע लुटला गेलेल्या तुझ्या कळपाच्या-तारणाकरितां (तूं त्रास) सांपड; जरी त्याचा नैवेद्य थोडा किंवा पुष्कळ असला, तरी तो तूं मान्य कर; जरी त्याची दुष्टाई वाढली असली, तरी तुझ्या लोकांची मुक्ति वाढीव, उलंघनापासून फिरणाऱ्यांस झांकून ठेवलेला उजेड तूं प्रगट कर, आणि आपल्या रागाने इस्राएलाचा दिवा विझवूं नको. הכון

אורי וישעי " परमेश्वर माझा प्रकाश व माझें तारण आहे, म्या कोणाला भ्यावें; परमेश्वर माझ्या जीवाचा आश्रय आहे, म्या कोणाविषयीं धास्ती धरावी. हे परमेश्वरा, माझ्या देवा, मी तुझ्या जवळ ओरडलों आणि त्वां मला निरोगी केलें आहे. हे परमेश्वरा, सकाळीं तूं माझा शब्द ऐकशील, सकाळीं मी तुझ्यासाठीं सिद्ध होऊन लक्ष लावीन. परमेश्वराने आपलें सिंहासन आकाशांत स्थापिलें आहे, आणि त्याच्या राज्याचा अधिकार सर्वांवर आहे. हे परमेश्वरा, तुझें चागुलपण आकाशांत, तुझी सत्यता आभाळापर्यंतहि आहे. हे परमेश्वरा, तूं थोर आहेस, आणि पराक्रमाविषयीं तुझें नाम थोर आहे. सर्व समर्थ देव जो परमेश्वर तो बोलला आहे; आणि त्याने सूर्याच्या उगवण्यापासून त्याच्या मावळण्यापर्यंत पृथ्वी बोलाविली आहे. तो परमेश्वरच, त्याच्या दिसण्यांत जें चांगलें तें तो करितो. परमेश्वरच, आणखी कोणी नाहीं; त्यावांचून कोणी देव नाहीं. परमेश्वराने आमची आठवण केली आहे, तो आशीर्वाद देईल, इस्राएलाच्या घराण्याला तो आशीर्वाद देईल. त्याच्या न्यायत्वाकरितां परमेश्वर संतोषित आहे, तो नेमशास्त्रास मोठेपणा देऊन प्रतिष्ठित करील. कां तर हे प्रभु, तूं चांगला व क्षमाशील आणि जे तुला हाक मारितात, त्या सर्वांवर फार दयाळू आहेस. मी परमेश्वराला हाक मारितों तेव्हां तो ऐकतो. परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. जे परमेश्वराविरुद्ध होतील ते पराभव पावतील, तो आकाशांतून त्यांवर गर्जना करील, परमेश्वर पृथ्वींतील सर्व देशांचा न्यायाधिशी करील, आणि तो आपल्या राजाला शक्ति देईल, आणि आपल्या अभिषिक्ताचें शृंग उंच करील. परमेश्वर राज्य

करितो, परमेश्वराने राज्य केलें, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देतो, परमेश्वर आपल्या लोकांस कल्याणयुक्त आशिर्वाद देतो. हे सैन्याच्या परमेश्वरा, जो माणूस तुजवर आशा ठेवितो तो धन्य. हे परमेश्वरा, मी तुला हाक मारितों, तूं मजसाठीं उतावळी कर; मी तुला हाक मारितों तेव्हां माझ्या शब्दाकडे कान लाव. हे प्रभू, ऐक, हे प्रभू, क्षमा कर, हे प्रभू, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको, हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कां कीं तुझ्या नगराला आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. हे परमेश्वरा, तूं माझी प्रार्थना ऐक, आपल्या सत्यतेने माझ्या काकुळतींकडे कान लाव, आपल्या नीतीने मला उत्तर दे.

אנא בקראנו हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, जेव्हां आह्मी तुजकडे ओरडतों, तेव्हां आमच्या काकुळतीची वाणी तूं ऐक; हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, आमचे लोभाचे अपराध क्षमा कर.

דברים לקחתי हे देवा, जीं वचनें (मी तुजपुढें) उच्चारितों, तीं हे देवा, ऐक; आणि ज्या पापांत मी जन्मलों तें, हे देवा, क्षमा कर. אנא

וממעון שמך तुझ्या आकाशांतील वसतिस्थानांतून, हे देवा, ऐक; आणि तुझ्या लोकांचीं पापें, हे देवा, क्षमा कर. אנא

יום ערכי שבחה ज्या दिवशीं मी स्तुति सिद्ध करितों तेव्हां, हे देवा, माझें ऐक; नेहेमीची (आमची) फितूरी, हे देवा, क्षमा कर. אנא

דלים ואביונים दीन व दरिद्री यांचें, हे देवा, ऐक; लाखेसारिखीं तांबडीं झालेलीं त्यांचीं पापें, हे देवा, क्षमा कर. אנא

הרדים נגדך तुजपुढें जे कांपतात त्यांचें, हे देवा, ऐक; आणि तुझा सेवक जो मी, मला हे देवा, क्षमा कर. אנא

זמירות מהללי माझें स्तुतीचें कीर्त्तन, हे देवा, ऐक; माझीं वाईट कर्मे हे देवा, क्षमा कर. אנא

קול שארית יעקב याकोबाच्या शेषाची वाणी हे देवा, ऐक; सर्व कपटी मनाचे अपराध, हे देवा, क्षमा कर. אנא

אדני שמעה हे प्रभु, ऐक, हे प्रभु, क्षमा कर, हे प्रभु, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको, हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कां कीं तुझ्या नगराला, आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. हे परमेश्वरा, ऐक, आणि मजवर दया कर; हे परमेश्वरा, माझें सहाय कर. परमेश्वराने माझी काकळूत ऐकिली आहे, परमेश्वर माझी प्रार्थना अंगीकारील. हे देवा, म्यां तुला हाक मारिली, कां तर तूं मला उत्तर देत असतोस; तूं आपला कान मजकडे लाव, माझें बोलणें ऐक. हे माझ्या न्यायत्वाच्या देवा, जेव्हां मी हाक मारितों, तेव्हां तूं मला उत्तर दे, संकटाच्या वेळेस त्वां मला मोकळें केलें, तूं मजवर दया करून माझी प्रार्थना ऐक. आणि मजविषयीं हे परमेश्वरा, प्रसन्नतेच्या वेळेस माझी प्रार्थना केली आहे; हे देवा, तूं आपल्या पुष्कळ दयेने, आपल्या तारणाच्या सत्यतेने मला उत्तर दे. कारण कीं ह्याच दिवशीं तुमच्या सर्व पापांपासून तुह्मास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील, मग तुह्मी शुद्ध व्हाल. हे परमेश्वरा, त्वां ज्या इस्राएलाला सोडविलें, त्या आपल्या लोकांस क्षमा करून आपल्या इस्राएल लोकांकडे निर्दोषाचा रक्तपात लावूं नको, असी त्या रक्तपाताविषयीं त्यांवर क्षमा व्हावी. माझ्या शक्तीपेक्षां अन्यायाच्या गोष्टी भारी झाल्या, परंतु आमच्या उलंघनांची क्षमा तूं करसील.

ירצה עם אביון जो दरिद्री लोक तुझें मुख (दर्शन) शोधितो, त्यास तुझी प्रसन्नता सांपडो, तो ओरडत आहे, आपल्या स्वामीला हाक मारण्याच्या वाणीकडून त्याचा घसा बसला आहे; हे देवा, आज रात्रीं व उद्याहि तूं आपली दया त्याच्या पुढें येऊं दे.

אדני הקשיבה हे प्रभु, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको.

אשר התודה जो आपलें पाप कबूल करितो, आपल्या अतिक्रमाविषयीं पश्चात्ताप करितो, आणि आपले लोभाचे अपराध आपणासमोर व आपणापुढें ठेवितो, त्याकरितां तूं आपल्या दयेचा दुत पाठवून त्याच्या दुःखामुळें त्यांस दर्शन दे, कारण त्याच्या लज्जेच्या घाबरण्यामुळें त्याचें मन त्याजमध्यें धगधगतें. אדני

בליל זה हे स्वामींच्या स्वामी ! आज रात्रीं दीन व दरिद्र्यांकडे प्रसन्नतेने पाहा; जे तुजकडे काकळूत करीत* आहेत, त्यांचे अपराध व जाणून केलेलीं पापें क्षमा कर; जरी तीं लाखेसारिखीं असलीं, तरी तीं लोंकरेसारिखीं शुभ्र होवोत. אדני

והצועקים בשביהם जे आपल्या दासत्वांत अपराधाकरितां व आपल्या फितुरीकरितां ओरडत आहेत, आणि आपल्या उलंघनाकरितां आपल्या गालांवरून अश्रुधारा वाहवीत आहेत, त्यांकरितां मी विनंती करितों कीं, तुझें तारण व तुझी मुक्ति त्यांच्या आयुष्यांच्या दिवसांतच त्वरेने येऊं दे, आणि इस्राएलाची प्रार्थना तूं आपणाजवळ येऊं दे, मान्य कर, आणि तिजमध्यें आनंद मान. אדני

אדני שמעה हे प्रभु, ऐक, हे प्रभु, क्षमा कर; हे प्रभु कान देऊन कार्य कर; उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर, कां कीं तुझ्या नगराला आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. मी परमेश्वराला धन्य ह्मणेन; कां तर तो मला बोधितो, रात्रीं माझीं गुर्दे कमळें देखील मला बोध करितात. त्वां माझ्या अंतःकरणाची परीक्षा केली, रात्रीं चौकशी केली, मला आटिलें, तरी तुला कांहीं सांपडणार नाहीं. म्या नेम केला आहे, माझ्या तोंडाने उलंघन होणार नाहीं. दिवसां परमेश्वर आपली दया प्रगट करील, आणि रात्रीं त्याचें गायन मजकडून होईल; माझ्या जीवाच्या देवाची प्रार्थना मजक-

* इ. औतात.

हून होईल. सकाळीं तुझी दया, व रात्रींच्या रात्रीं तुझी सत्यता प्रगट करणें (बरें आहे.) माझा न्याय तुझ्या पुढून प्रगट व्हावा; जा नीट तीं तुझ्या डोळ्यांनीं पाहावीं. परंतु मजविषयीं हे परमेश्वरा, प्रसन्नतेच्या वेळेस माझी प्रार्थना केली आहे; हे देवा, तूं आपल्या पुष्कळ दयेने, आपल्या तारणाच्या सत्यतेनें मला उत्तर दे. हे परमेश्वरा, आम्हाला तुजकडे फिरीव, म्हणजे आम्ही फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

סליחות पापाच्या क्षमेची प्रार्थना.

אל מלך हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा, दयें-करून वर्तणाऱ्या, आपल्या लोकांच्या पापांची क्षमा करणाऱ्या, त्यांतील एक एक पार (दूर) करणाऱ्या, पाप्यांस फारच क्षमा, आणि उलंघन करणाऱ्यांस माफी करणाऱ्या, सर्व मांसमयांबरोबर व प्राण्यांबरोबर यथार्थतेने वागणाऱ्या, त्यांच्या वाईट कृत्यांप्रमाणें त्यांची फेड न करणाऱ्या; हे देवा, तुझे तेरा गुण उच्चारायास त्वां आम्हास शिकविलें आहेस, आणि पूर्वी नम्र (मोशे) यास कळविलेल्या त्या तेरा गुणांच्या कराराची* आज आम्हाकरितां आठवण कर. आणि शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर मेघांत उतरला, आणि तेथें त्याजवळ उभा राहिला, आणि त्याने परमेश्वराचें नांव मोश्याने सांगितलें.

ויעבור "तेव्हां परमेश्वराने त्याच्या पुढें जवळून जाऊन मोश्याने असें म्हटलें कीं, परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोधी आणि फार दयेचा व सत्यतेचा; हजारोंसीं दया राखितो; अन्याय व उलंघनें व पाप यांची क्षमा करितो; आणि दोष्यांस निर्दोषी ठरविणारच नाहीं; म्हणून आमच्या अन्यायाची, व आमच्या पापाची क्षमा कर, आणि आम्हास तुझें वतनरूप कर.

* निर्गम. ३४.१०

כי ביום הזה कारण कीं याच दिवशीं तुमच्या सर्व पापांपासून तुम्हास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील, मग तुम्ही शुद्ध व्हाल.

ויאמר אני אעביר तेव्हां तो बोलला कीं, "मी आपलें सर्व बरेंपण तुझ्यापुढें जवळून चालवीन, आणि तुझ्या पुढें परमेश्वराचें नाम प्रगट सांगेन, आणि ज्यावर दया करीन त्यावर दया करीनच, आणि ज्यावर ममता ठेवीन त्यावर ममता ठेवीनच."

רחמנא אדכר לן हे दयावंता, प्रियकर आब्राहामाबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर.

בדיל ויעביר पार जातांना (कळविलेल्या) तुझ्या गुणाकरितां.

हे दयावंता, बंधन पावलेल्या इसहाकाबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर. בדיל ויעבור

हे दयावंता, पूर्ण याकोबाबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, यथार्थ योसेफाच्या पुण्याची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, मोशे भविष्यवाद्याबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, आहारोन आचार्याबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, आवेशी पिनहासाबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, अभिषिक्त दावीदाबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, शलोमो राजाच्या प्रार्थनेची आम्हासाठीं आठवण कर.,,

हे दयावंता, तुझा उजवा हात उभारून आपलें तारण उगीव. ,,

हे दयावंता, लज्जित तोंडानें आह्मी तुला हाक मारायास आलों आहों; ह्मणून आह्मावर दया कर. "

हे दयावंता, तुझें सामर्थ्य आह्मांमध्यें प्रगट कर. בדיל ויעבור
हे दयावंता, आमचें न्यायत्व प्रकाशांत आण. "
हे दयावंता, आम्हाविषयीं जीवनाचा निवाडा ठरीव. "
हे दयावंता, तुझें गौरव आह्मावर ठेव. "
हे दयावंता, आमच्या दुष्ट कृत्यांप्रमाणें आमची फेड करूं नको. "
हे दयावंता, तुझें वैभव आह्मावर ओत. "
हे दयावंता, आह्माकरितां यथार्थता योज. "
हे दयावंता, आह्मावर चांगलें मोज. "
हे दयावंता, आह्मावर पुष्कळ चांगलें येऊं दे. "
हे दयावंता, तुझी दया आह्मावर लोट. "
हे दयावंता, आह्मास जीवनाच्या पुस्तकांत लिही. "
हे दयावंता, आह्मास दयेच्या पुस्तकांत लिही. "
हे दयावंता, आह्मास यथार्थतेच्या पुस्तकांत लिही. "
हे दयावंता, आह्मास सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत लिही. "
हे दयावंता, आह्मास चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत लिही. "
हे दयावंता, आह्मावरून तूं आपला राग व क्रोध जिंक (काढ). "
हे दयावंता, तूं आमचा शेवट (नाश) करूं नको. "
हे दयावंता, आमचीं ऋणें व आमचे अपराध आह्मास सोड व क्षमा कर. "
हे दयावंता, तुझ्या चांगुलपणाचा उजेड आह्मावर प्रकाशित कर. "
हे दयावंता, (तूं) आह्माकरितां आश्रय व सहायकारी हो. "
हे दयावंता, आमचें चांगलें होण्याची खूण कर. "
हे दयावंता, आमच्या प्रार्थनेसाठीं आकाश उघड. "
हे दयावंता, प्रसन्नतेने आमची प्रार्थना कबूल कर. "
हे दयावंता जाचणुकीच्या वेळीं आमच्या प्रार्थना व आमचे अर्ज कबूल कर. "
हे दयावंता, (आमच्या) जीवावर दया कर. "
हे दयावंता, चांगलें वर्ष आह्मावर येऊं दे. "

हे दयावंता, तूं आपल्या क्रोधापासून फीर. בדיל ויעבור
हे दयावंता, तुजपुढून आह्मास रिकामें परतवूं नको. "

" ויעבור " "तेव्हां परमेश्वराने त्याच्या पुढें जवळून जाऊन मोठ्याने असें म्हटलें कीं, परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोधी आणि फार दयेचा व सत्यतेचा; हजारोंसीं दया राखितो; अन्याय, उलंघनें व पाप यांची क्षमा करितो; आणि दोष्यांस निर्दोषी ठरविणारच नाहीं; म्हणून तूं आमचे अन्यायांची व आमच्या पापांची क्षमा कर, आणि आम्हास तुझें वतरूप कर."

הטיבה ברצונך तूं आपल्या प्रसन्नतेने सियोनेचें बरें कर; यरूशालेमेचीं गांवकुसें बांध. तेव्हां नीतीचे यज्ञ, होम व सर्वांग होम तुला आवडतील, तेव्हां तुझ्या वेदीवर खोंडाचे होम करितील.

כי ביום הזה कारण कीं याच दिवशीं इत्यादिक.

אנשי אמונה प्रमाणिक मनुष्यें नाहींसीं झालीं आहेत, तीं (आपल्या सत्कर्मांच्या) सामर्थ्याने (तुजपुढें) येत असत; खंडन सोसायास तीं शक्तिमान होतीं आणि तीं दुःखाचें निवारणहि करीत असत. क्रोधाच्यासमयीं तीं आम्हास भिंतीसारिखीं व आश्र-यासारिखीं होतीं; तीं आपल्या गुह्य प्रार्थनेकडून राग शमवीत असत. हे देवा, त्यांनी तुला हाक मारिल्याअगोदर, त्वां त्यांस उत्तर दिल्हें. तीं तुला विनवायास व तुझी प्रसन्नता मिळवायास जाणत असत; म्हणून तूं त्यांवर बापाप्रमाणें प्रीति करून, त्यांच्या तोंडांस (त्यांस) रिकामें परतविलें नाहींस. परंतु आमच्या पुष्कळ अपराधांमुळें तीं नाहींसीं झालीं; आणि आमच्या पापामुळें तीं आपल्या पूर्वजांसीं मिळालीं आहेत. आपण विसाव्याप्रत जाऊन, त्यांनी आम्हास धापा देण्यास मागें टाकलें आहे. कुपण नीट करणारे मोडकळीस गेले; राग फिरविणारे शांत (मृत) झाले. आतां खंडनांत उभे राहणारे (संकट दूर करणारे) कोणी नाहींत;

तुझ्या प्रसन्नतेची वाट पाहाणारे नाहींसे झालें. आम्ही पृथ्वीच्या चोहोंकोनीं भटकत फिरत आहों; परंतु कोठेंच आम्हास आरोग्यता सांपडत नाहीं. आतां लज्जित तोंडानें क्षमा साधनाच्या वेळीं, हे देवा, आम्ही तुला शोधायास आलों आहों.

אל מלך पृष्ठ ३७.

תמהנו מרעות आम्ही वाईटामुळें अपधाकर्तों, संकटामुळें आमचें बळ खचतें; आम्ही फारच नीच होऊन धुळीस मिळालों आहों. हे दयावंता, आमचा स्वभावहि तसाच आहे; आम्ही ताठर मानेचे व बंडखोर आहों. जरीं आम्ही आपल्या तोंडानें ओरडून तुला हाक मारितो; तरीं आम्ही पाप करितों व आमचें मन वांकडें व विपरीत आहे. यद्यपि हे परात्परा,! तुझी दया सर्वकाळापासून आहे, आणि क्षमा ती तुझ्या जवळच आहे. तूं वाईटाविषयीं अनुतापत असतोस, आणि दयेकडे वळतोस ; म्हणून अशा वेळीं लपून राहूं नको, कारण आम्ही मोठ्या विपत्तींत पडलों आहों. आम्हावरील तुझें चांगुलपण व दया सर्वांच्या दृष्टीस समजीव (पाड); आम्हाविषयीं चाहाडी करूं नये, म्हणून सैतानाचें तोंड बंद कर; त्यास धमकाव म्हणजे तो उगा राहील. आणि आम्हास यथार्थ ठरविण्याकरितां चांगला मध्यस्थ उभा कर; म्हणजे तो आमचा सरळपणा कळवील. हे दयावंता व कृपावंता, जेव्हां तुझा घरचा विश्वासू (मोशे) यानें तुजपुढें येऊन विनंती केली; तेव्हां तूं आपला मार्ग त्यास कळविलास व आपली सत्यता त्यास समजविलीस.

אל מלך पृष्ठ ३७.

לײ אלהינו הרחמים प्रभु, जो आमचा देव, त्याविरुद्ध जरीं आह्मी पाप केलें; तरीं त्याला दया आणि क्षमा आहे. प्रभु, जो आमचा देव, त्याविरुद्ध जरीं आह्मी बंडावा केला; तरीं त्याला दया आणि क्षमा आहे. (हे आमच्या प्रभो !) जें पाप आह्मी मूर्खपणानें व पापिष्ठपणानें केलें, तें आह्मावर लावूं नको.

חטאנו צורנו हे आमच्या खडकरूप आश्रया, आह्मी पाप केलें आहे; हे आमच्या निर्माणकर्त्या, आह्मास क्षमा कर.

שמע ישראל हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे.

ברוך שם त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदांसर्वकाळ धन्य असो.

הוא האלהים ,, परमेश्वर तोच देव आहे; परमेश्वर तोच देव आहे. (दो० वे०)

אראלי מעלה वरील आरआलिम दूत ह्मणतात कीं, परमेश्वर आमचा प्रभु आहे; आणि निवडलेली संपत्ति (इस्राएल) उत्तरें करून ह्मणते कीं, परमेश्वर तोच देव आहे. ,, הוא האלהים

גלגלי מעלה वरील गलगालिम दूत ह्मणतात कीं, परमेश्वर आमचा प्रभू आहे; आणि प्रख्यात संपत्ति (इस्राएल) उत्तरें करून ह्मणते कीं, परमेश्वर तोच देव आहे. ,, הוא אלהים

המוני מעלה वरील दुतांचीं सैन्यें म्हणतात कीं, परमेश्वर आमचा प्रभु आहे; आणि इस्राएल आपल्या दुःखांत व पाडावपणांत उत्तरें करून म्हणतात कीं, परमेश्वर तोच देव आहे.

מלך ,, परमेश्वर राज्य करीत आहे, परमेश्वरानें राज्य केलें आणि परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. (दो. वे.)

בטרם שחקים आकाश व पृथ्वी विस्तारल्या पूर्वींपासून परमेश्वर राज्य करीत आहे; ज्योति प्रकाशल्यापूर्वीं परमेश्वरानें राज्य केलें; आणि पृथ्वी वस्त्राप्रमाणें जीर्ण झाल्यावर व आकाश धुराप्रमाणें विरघळून गेल्यावरहि परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. ,, מלך

ועד לא עשה पृथ्वी व शेतें उत्पन्न केलीं नव्हतीं तेव्हांपासून परमेश्वर राज्य करीत आहे; पृथ्वीवरील घडिवलेले पदार्थ सिद्ध केल्या अगोदर परमेश्वरानें राज्य केलें, आणि परागंदा

झालेले, चोहोंकडून एकत्र होण्याच्या वेळानंतरहि परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. " מלך

מיוחד באריה जो आहे तोच खुद आहे; तोच होता, तोच आहे व तोच असेल; तोच मारणारा व जिवंत करणारा; कोणी निर्माण झालेला देव त्याच्यापूर्वीं नव्हता, व त्याच्यानंतरहि कोणी व्हावयाचा नाहीं.

עננו אבינו हे आमच्या बापा, आम्हास उत्तर दे.

עננו आम्हास उत्तर दे.

हे आमच्या उत्पन्नकर्त्या, आम्हास उत्तर दे. עננו

हे आमच्या उद्धारका, आम्हास उत्तर दे. "

हे आम्हाविषयीं चौकशी ठेवणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे तेज व महत्त्व यानीं वेष्टिलेल्या, आम्हास उत्तर दे. "

हे सूड घेण्यांत न्यायी असणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे यथार्थ व सरळ (देवा,) आम्हास उत्तर दे. "

हे जिवंत व निश्चल (देवा) आम्हास उत्तर दे. "

हे निर्मळ दृष्टीच्या, आम्हास उत्तर दे. "

हे आकाशांत राहणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे सर्व शक्तिमान (देवा,) आम्हास उत्तर दे. "

हे दुष्टाईची आवड न धरणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे राजा, व राजांचा राजा, आम्हास उत्तर दे. "

हे भयंकर व गडरूप (देवा,) आम्हास उत्तर दे. "

हे पडलेल्यांस आश्रय देणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे गरीबांचें सहाय करणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे खंडून घेणाऱ्या, व संकटांतून मुक्त करणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे यथार्थ आणि यथार्थ ठरविणाऱ्या, आह्मास उत्तर दे. "

हे हाक मारणाऱ्यांच्या जवळ असणाऱ्या, आह्मास उत्तर दे. "

हे उंच व महत्त्ववान् (देवा,) आह्मास उत्तर दे. "

हे आकाशांत वस्ती करणाऱ्या, आह्मास उत्तर दे. "

עננו हे पूर्ण लोकांच्या आश्रया, आह्मास उत्तर दे.

עננו מלך מלכי המלכים हे राजा, आणि राजांच्या राजा, आम्हास उत्तर दे.

हे आब्राहामाच्या देवा, आह्मास उत्तर दे.

हे प्रसन्नतेच्या वेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मास उत्तर दे.

हे इसहाकाच्या भयपात्रा, आह्मास उत्तर दे.

हे संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, आह्मास उत्तर दे.

हे याकोबाच्या बळदात्या, आम्हास उत्तर दे.

हे दयेच्या वेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मास उत्तर दे.

हे दावीदाच्या रक्षका, आम्हास उत्तर दे.

हे (करूबाच्या) रथांत बसणाऱ्या, आह्मास उत्तर दे.

हे दयावंता व कृपावंता, आम्हास उत्तर दे.

רחום וחנון हे दयावंता व कृपावंता, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

אדון הסליחות हे क्षमाशील देवा, मनें पारखणाऱ्या, खोल गोष्टी प्रगट करणाऱ्या, आणि सत्यवक्त्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

הדור בנפלאות हे चमत्काराने सुशोभित, सूड घेण्यांत न्यायी असणाऱ्या, पूर्वजांच्या कराराची आठवण राखणाऱ्या आणि गुर्द कमळें शोधणाऱ्या, आम्ही तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

טוב ומטיב לבריות हे मनुष्यमात्रांशीं चांगला असणाऱ्या, व चांगलें करणाऱ्या, सर्व गुप्त गोष्टी जाणणाऱ्या, (आमचे) अपराध धुळीस मिळविणाऱ्या, व सात्विकपणा परिधान करणाऱ्या आम्ही तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

מלא זכיות हे यथार्थतेने भरलेल्या, स्तुतीनें भयंकरा, दोष क्षमा करणाऱ्या आणि संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आम्हावर दया कर.

פועל ישועות हे उद्धारका, भविष्य जाणणाऱ्या, पित्यांस बोलविणाऱ्या (उत्पन्न करणाऱ्या,) आकाशमंडळावर स्वारी करणाऱ्या, प्रार्थना ऐकणाऱ्या, आणि पूर्णबुद्धीच्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

אל רחום שמך तुझें नांव दयाळू देव व तुझें नांव कृपाळू देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל אדיר שמך तुझें नांव बळवंत, धन्य, मोठा व कीर्तिमान देव असें आहे; म्हणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל הדור שמך तुझें नांव सुशोभित, न्यायी, यथार्थ व कृपाळू देव असें आहे; म्हणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל טהור שמך तुझें नांव निर्दोष, एकच, पराक्रमी व अनादि देव असें आहे; म्हणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל מלך שמך तुझें नांव राजा, भयंकर, आश्रय देणारा व सहाय करणारा देव असें आहे; म्हणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל פודה שמך तुझें नांव उद्धारक, सात्विक, पवित्र व दयाळू देव असें आहे; म्हणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל שדי שמך तुझें नांव सर्व समर्थ, पूर्ण, आधार देणारा व प्रबळ देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל רחום שמך तुझें नांव दयाळू देव, तुझें नांव कृपाळू देव, तुझें नांव मंदक्रोधी देव, व तुझें नांव करुणासागर असें आहे;

आणि तुझें नाम आम्हामध्यें गाजविलें जातें, म्हणून तुझ्या नामाकरितां (आमची विनंती मान्य) कर.

חננו והקימנו " हे परमेश्वरा, आम्हावर दया करून आम्हास स्थापित कर.

ובספר חיים आणि आह्माविषयीं आठवण करून आह्मास जीवनाच्या पुस्तकांत लिही.

हे परमेश्वरा, तूं आपलें मुखतेज आह्मावर पाड.

हे परमेश्वरा, कृपा करून तारणाचे दिवसांचें शुभवर्त्तमान आह्मास · ऐकीव: ובספר חיים

हे परमेश्वरा, तुझ्या दयेचा पूर आह्मावर येऊं दे. "

हे परमेश्वरा, आमच्या आरंभापेक्षां आमचा शेवट अधिक चांगला कर. "

हे परमेश्वरा, कृपा करून तुझी दया आह्मापुढें येऊं दे. "

हे परमेश्वरा, आह्माविषयीं तुझ्या दयेला द्रव येऊं दे. "

हे परमेश्वरा, आज आह्मास तूं आपल्या हृदयावर मोहोरीप्रमाणें करून ठेव. "

हे परमेश्वरा, आमचा वाद व आमची लढाई तूं कर. "

हे परमेश्वरा, आमच्या अन्नपाण्यास आशीर्वाद दे. "

עשה למען " हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां (आमची विनंती मान्य) कर.

וחוסה על ישראל आणि आपल्या इस्राएल लोकांवर दया कर.

हे परमेश्वरा, तुझ्या पूर्णतेमध्यें जन्मलेल्या (आब्राहामाकरितां) आमची विनंती मान्य कर. וחוסה על ישראל

हे परमेश्वरा, तुझ्या खांबांशीं बांधला गेलेल्या (इसहाकाकरितां) आमची विनंती मान्य कर. "

हे परमेश्वरा, आकाशांतून शिडीवरून उत्तर मिळालेल्या (याकोबाकरितां) आमची विनंती मान्य कर. "

हे परमेश्वरा, तुझा यथार्थ योसेफ, याच्या पुण्याकरितां आमची विनंती मान्य कर. והושע על ישראל

हे परमेश्वरा, पाण्यांतून काढलेल्या (मोशेकरितां) आमची विनंती मान्य कर. ,,

हे परमेश्वरा, तुझ्या उरीम व थुम्मीमाने आचार्यपणा चालविणाऱ्या (आहारोनाकरितां) आमची विनंती मान्य कर. ,,

हे परमेश्वरा, तुझ्या नामाचा शुद्ध (खरा) आवेश धरणाऱ्या (पिनहासाकरितां) आमची विनंती मान्य कर. ,,

हे परमेश्वरा, (दाविदाच्या) सुंदर गीतांकरितां आमची विनंती मान्य कर.

हे परमेश्वरा, तुझ्या नामासाठीं मंदिर बांधणाऱ्या (शलोमो) राजाकरितां आमची विनंती मान्य कर. ,,

हे परमेश्वरा, तुझ्या नामाच्या एकत्वाकरितां जे मारले व जाळले गेले, त्यांकरितां आमची विनंती मान्य कर. ,,

हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां आमची विनंती मान्य कर. ,,

עשה למען שמך (हे परमेश्वरा,) तूं आपल्या नामाकरितां आमची विनंती मान्य कर. तूं आपल्या सत्यतेकरितां, आपल्या कराराकरितां, आपल्या मोठेपणाकरितां, आपल्या नियमाकरितां, आपल्या महत्वाकरितां, आपल्या वचनाकरितां, आपल्या आठवणीकरितां, आपल्या दयेकरितां, आपल्या चांगुलपणाकरितां, आपल्या सरळपणाकरितां, आपल्या गौरवाकरितां, आपल्या मतत्त्वाकरितां, आपल्या राज्याकरितां, आपल्या अनाद्यंततेकरितां, आपल्या गुप्त भावाकरितां, आपल्या सामर्थ्याकरितां, आपल्या वैभवाकरितां, आपल्या यथार्थतेकरितां, आपल्या पवित्रतेकरितां, आपल्या दयेकरितां, आपल्या साक्षात्काराकरितां, आणि आपल्या शास्त्राकरितां, आमची विनंती मान्य कर.

עשה למען אברהם (हे परमेश्वरा,) आब्राहाम, इसहाक व याकोब यांकरितां; मोशे व आहारोन यांकरितां; दाविद व शालोमो यांकरितां; पवित्र यरूशालेम नगराकरितां; सीयोन,

जें तुझ्या गौरवाचें वसतिस्थान, त्याकरितां; तुझ्या नाश पावलेल्या मंदिराकरितां; तुझ्या ओसाड पडलेल्या वाड्याकरितां; गरीब इस्राएल लोकांकरितां; दरिद्री इस्राएल लोकांकरितां; दुःख सोसणाऱ्या इस्राएल लोकांकरितां; विधवा व पोरक्याकरितां; तान्हे बाळाकरितां; दूध पिण्याकरितां; शाळेंत शिकणाऱ्याकरितां; व ज्याकडून कांहींच पाप घडलें नाहीं, त्याकरितां आमची विनंती मान्य कर.

עשה למענך जर आम्हाकरितां नाहीं, तर तूं आपणाकरितां (आमची विनंती मान्य कर;) तूं आपणाकरितां तसें करून आमचें तारण कर आणि आज व नित्य आमच्या प्रार्थना ऐकून आम्हास तार व आम्हास उत्तर दे; कारण तूंच आमचें स्तुतिपात्र आहेस.

אחד אלהינו आमचा देव एकच, आमचा प्रभु मोठा, त्याचें नांव पवित्र व भयंकर आहे. तर तुझी दया आकाशाएवढी, आणि तुझी सत्यता आभाळाएवढी मोठी आहे. तूं मोठा आणि आश्चर्याचीं कृत्यें करणारा आहेस. तूंच केवळ देव आहेस. ज्या राष्ट्रांनी तुला जाणिलें नाहीं, त्यांवर; आणि ज्या राज्यांतील लोकांनीं तुझें नाम घेतलें नाहीं, त्यांवर; तूं आपला संताप ओत.

לקדושת שמך आम्हास नको; परंतु तुझ्या पवित्र नामास गौरव दे. हे परमेश्वरा, आम्हास नको; परंतु तूं आपल्या दयेवरून व आपल्या सत्यतेवरून आपल्या नामास गौरव दे. राष्ट्रांनी कां म्हणावें ? कीं, त्यांचा देव आतां कोठें आहे ! तर आमचा देव आकाशांत; एकच जो देव, तो आकाशांत आहे. प्रत्येक दिवशीं दोन वेळा आम्ही (त्याचें एकत्व) मानितों. तो जिवंत व निश्चल आहे; तो दयेने व यथार्थतेने व्यापलेला आहे. त्याला जें आवडलें, तें सर्व त्याने आकाशांत व पृथ्वींत केलें आहे. तूं काय करितोस ? असें त्यास म्हणणारा कोणी नाहीं ; आणि तूं

काय चालविलें आहेस? असें त्यास ह्मणणारा कोणी नाहीं; कारण सर्व त्याच्या हाताचीं कामें आहेत.

אלהינו שבשמים हे आमच्या आकाशांतील देवा, आमची वाणी ऐक, आणि प्रसन्नतेने आमची प्रार्थना कबूल कर.

אמן तथास्तु.

हे आमच्या आकाशांतील देवा, या आमच्या दीर्घ दासत्वांत तूं आमचा नाश करूं नको. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, जे आमच्या वाईटावर उठतात, त्या सर्वांचा नाश कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, तूं आपल्या कराराची आठवण कर, आह्मास विसरूं नको. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या अन्नपाण्यास आशीर्वाद दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास शुभवर्त्तमान ऐकीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, सर्व कठोर व वाईट शासनें आह्मावरून रद्द कर (उडीव). "

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या राज्याचें वैभव आह्मामध्यें लवकर प्रगट कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्माविषयीं चांगला निवाडा कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मी तुझा शोध करीत असतां, आह्मास सांपड.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मावर उठणाऱ्यांपासून आमच्या रक्ताची झडती घे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आज व नेहमी तूं आमची प्रार्थना ऐक. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास तुजकडे पूर्ण पश्चात्तापानें परतीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या आशेविषयीं आह्मास लाजवूं नको. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्ही हाक मारितों आणि तूं आम्हास उत्तर दे. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, तूं आपल्या समोर आमची चांगली आठवण कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या न्यायांत आह्मास यथार्थ ठरीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमची आणि आमच्या मुलांलेंकरांची करूणा तुला येऊं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या पापापासून आह्मास शुद्ध कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या विटाळापासून आम्हास शुद्ध कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हाविषयीं तुझ्या दयेला द्रव येऊं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हास चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिही. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास शुद्धतेच्या पुस्तकांत लिही. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हास यथार्थ व धार्मिक लोकांच्या पुस्तकांत लिही. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत लिही. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हास चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत लिही. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हास जिंकणाऱ्यांस तूं जिंक. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा तूं विध्वंस करूं नको. "

हे आमच्या आकाशांतील देवा, जर आम्हाकरितां नाहीं; तर तूं आपल्या नामाकरितां आमचें कार्य कर. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हावर जुलूम करणाऱ्यांवर तूं जुलूम कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हाबरोबर लढणाऱ्यांशीं तूं लढ. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचे मनोरथ चांगल्या प्रकारें पूर्ण कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा सूड तूं उगीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या खचण्याच्या वेळीं आम्हास आश्रय दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, दावीदाच्या पडलेल्या मंडपास आश्रय दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या विनंतींत उत्तर दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्ही हाक मारितों त्या दिवशीं आम्हास उत्तर दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या सर्व शत्रूंच्या हातांतून आम्हास सोडीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या वाईट विचारापासून आम्हास मोकळें कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हावर तुझा आशीर्वाद होण्याविषयीं आज्ञा कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हास तुझें तारण मिळावें म्हणून आज्ञा कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या न्यायांत आह्मास यथार्थ ठरीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा न्याय करितांना आह्मास यथार्थ ठरीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या उद्धाराचा वेळ आह्मा-
जवळ आण. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या तारणाचा दिवस आम्हा-
जवळ आण. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझी सेवा करायासाठीं आह्मास
जवळ ने. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा वाद करून आह्मास
सोडीव. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांच्या
दुःखाकडे पाहा. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांचे रोग
दूर कर. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, जुलुमाच्या वेळीं आम्हाकडे पाहा ''

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचें ओरडणें मान्य कर. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हांमध्यें शांति राख. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या वाड्यांत सुख असूं दे. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या प्रभुराजास जीवन व
शांति दे. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, त्याच्या मनांत आह्माविषयीं
चांगलें घाल. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, पृथ्वीवर शांतता असूं दे. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, जगांत तृप्तता असूं दे. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, या राज्यांत शांतता असूं दे. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, पृथ्वीवर दंहिवर व पर्जन्य आशी-
र्वादरूप व्हावे; ह्मणून त्यांच्या योग्यसमयीं त्यांस पडूं दे. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, पेरायास बीज व खावयास
भाकर दे. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, (आमच्या) कुटुंबाच्या संख्येप्रमाणें
भाकर देत ऐस. ''

हे आमच्या आकाशांतील देवा, आमची प्रार्थना तुजसमोर धुपासारिखी मानिली जावो. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचें चांगलें होण्याची, आमचें तारण होण्याची, आणि आह्मास दया प्राप्त होण्याची खूण कर; मग आमचे द्वेष्टे पाहून लाजतील, आणि आमचे शत्रु अवलोकन करून घाबरतील; कारण हे देवा, तूंच आमचें सहाय व समाधान करणारा आहेस.

אל ארך אפים मंदक्रोधी देव आणि दयेचा स्वामी तूंच आहेस; तूं आपल्या दयेचें व कृपेचें महत्व पूर्वी नम्र मोशे यास कळविलेंस. आणि शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर मेघांत उतरला, आणि तेथें त्याजवळ उभा राहिला; आणि त्यानें परमेश्वराचें नांव मोठ्यानें सांगितलें.

ויעבור पृष्ठ ४०.

וידוי पापाविषयीं कबूल होणें.

אנא אל תעש हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, तूं आमचा विध्वंस न करितां, न्यायांत आपला हात आटोपून धर. आह्मी तुझ्या समक्ष निषेध पावायास आलों असतां, तूं आमचीं नांवें तुझ्या पुस्तकांतून पुसून टाकूं नको. जेव्हां तूं शिक्षण शोधायास (करायास) लागतोस, तेव्हां (आह्माकडे) रागापूर्वीं तुझी दया येऊं दे. चांगल्या कृत्यांविषयीं तुझ्या दृष्टींत आमची न्यूनता दिसून आली असतां, तुझी उपकारबुद्धि आह्माजवळ आण. हे आमच्या बापा, आह्मी ओरडत व विनंती करीत आहों, तुझी प्रार्थना करितांना आमचें तारण व्हावयास आज्ञा कर. सरळाच्या राहोंच्यांस दासत्वांतून परतीव; कारण पाहा, त्याच्या (नगरांचीं) द्वारें ओसाड पडलीं आहेत. तुझ्या वाक्याची आठवण राखून, त्याच्या संततीच्या मुखांतून प्रमाणनेमाचा विसर पडूं

देऊं नको. त्यां मोहोर केलेले प्रमाणनेम उघड, आणि तुझें गुह्य तुझ्या शिष्यांमध्यें ह्मणजे पृथ्वीच्या मध्यभागीं अर्धचंद्राच्या आकृतीसारिखी वाटोळी बसणाऱ्या मोठ्या न्यायसभेच्या सभासदांमध्यें व त्या मोठ्या सभेचा एक तृतीयांश, ज्या लहान सभेंत असे, तिच्या सभासदांमध्यें स्थापित कर. हे अनंता ! जे तुला ओळखितात, त्यांस तूं स्वीकार, परंतु जें राष्ट्र तुला जाणत नाहीं, त्यास नाकार; आणि आशेने बांधलेल्या (आशा लागलेल्या) बंदिवानास दुर्गाकडे फिरीव.

" אנא हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची प्रार्थना तुजपुढें यावी असें आह्मी मागतों, आणि आमच्या विनंतीपासून तूं लपून राहूं नको, कारण आह्मी यथार्थ आहों, आह्मी पाप केलें नाहीं, असें तुजपुढें बोलायास, हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मास धिटाई व धारिष्ट नाहीं. निश्चयें आह्मी व आमच्या वडिलांनीहि पाप केलें आहे.

אשמנו בגדנו आह्मी अतिक्रम केले, विश्वासघात केला, लुटलें, चाहाडी व वाईट भाषणेंहि केलीं. अपराध केले, दुष्टाई केली, गर्व केला, जुलूम केला, खोटें रचिलें, व वाईट योजनाहि केल्या. भोंदलें, थट्टा केली, बंडावा केला, अपवाद केला, आह्मी व्यर्थ व खोट्या शपथाहि वाहिल्या. अनिवार झालों, वांकडे वर्तलों, उल्लंघनें केलीं, दुःख दिल्हें, आह्मी आपली मान ताठरहि केली. दुराचार केले, नासलें, ओंगळ केलें, बहकलों आणि दुसऱ्यासहि बहकविलें. आणि आह्मी तुझे सुंदर नियम व न्याय सोडून फितूर झालों, परंतु तेणेंकरून आह्मास कांहीं लाभ झाला नाहीं. तथापि जें अवघें आम्हावर आलें आहे, त्याविषयीं तूं सात्विक आहेस; त्वां सत्यता केली आहे, परंतु आम्हीं दुष्टाई केली आहे.

אשמנו מכל עם आह्मी सर्व लोकांपेक्षां अधिक अतिक्रम केले आहेत, सर्व राष्ट्रांपेक्षां आह्मास अधिक लज्जा प्राप्त

झाली आहे. आमचा हर्ष मावळला आहे; आमच्या पापामुळें आमचें हृदय मूर्छित झालें आहे. आमची आशा व्यर्थ गेली; आमचे अलंकार आह्मावरून हिरावून नेले आहेत. आमच्या पापामुळें आमच्या पवित्र मंदिराचा नाश होऊन नगर ओसाड पडलें आहे; आमचा सुंदर देश परक्यांस, आणि आमची संपत्ति इतरांस (दिल्ही गेली आहे.) असें असतां अद्याप आह्मी आपल्या परिचारापासून मागें वळत नाहीं. मग हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी यथार्थ आहों; आह्मी पाप केलें नाहीं; असें तुजपुढें बोलायास आह्मास धिटाई व धारिष्ट कोठून असेल? निश्चयें, आह्मी व आमच्या पूर्वजानींहि पाप केलें आहे.

רבונו של עולם हे जगदीशा, पूर्वरात्रीं मी आपलीं लहान व मोठीं उलंघनें कबूल करितों. मी आपल्या कुकल्पनेंकडून व दुष्ट कृत्यांकडून तुला चिडविलें; (ह्मणून मी भयानें ह्मणतों,) पाहारेकऱ्या रात्रीचें काय? पाहारेकऱ्या रात्रीचें काय? माझ्या मनानें व नेत्रानीं पाप करण्याविषयीं मसलत केली, आणि रात्रंदिवस त्यांस विसांवा नव्हता; आणि माझ्या उरलेल्या अवयवानीं तुझ्या दृष्टीपुढें वाईट करण्याकरितां आपणामध्यें फुसफुस केली, अवघा दिवस व अवघी रात्र ते उगेच राहात नाहींत. आणि ज्या करायाच्या व न करायाच्या आज्ञा मोडल्या, ह्मणून सर्व रात्रीं आपलें आंथरूण पाणीगत करितों; आपल्या अश्रूनीं आपल्या पलंगास भिजवितों. ज्याचीं कृत्यें भयंकर (देव) तो कदाचित माझ्या शोकाची वाणी ऐकेल; ह्मणून रात्रंदिवस मी ओरडत आहें. मी आपल्या उलंघनामुळें व आज्ञाभंग करण्यामुळें आपली वाणी उंचावून ओरडतों; रात्रीं मला विश्रांति नाहीं. तो आपणाकरितां आजच्या रात्रीं क्षमेचें व प्रायश्चित्ताचें पाणी आह्मावर शिंपडील. ज्या क्षमा साधनाच्या रात्रीं आकाशांत वस्ती करणारापुढें तुह्मास क्षमा मिळणार आहे, ती हीच रात्र आहे. जो भविष्य जाणणारा (सर्वज्ञ) त्यापुढें आपल्या पापाचा कांहींसा भाग आठवून, या रात्रीं

मी स्तुति करायास येतों; आणि आजच्या रात्रीं मी देवासमोर आपलीं उलंघनें आणि अधर्म कबूल करितों.

कोणी एथें हें पुढील बोलतात आणि कोणी

אשמנו בגדנו पृष्ठ ५४ हें बोलतात.

אשמנו באמר आह्मी शब्देंकरून व कृत्यांकडून दोषी आहों; दुष्कर्में करण्याकरितां आह्मी तुझ्या नियमाचा धिःकार केला; न्याय व यथार्थतेचा आह्मी तिरस्कार केला; आणि आमचा मार्ग कांटेरी कुपणासारिखा झाला आहे. आह्मी करार मोडून, उलंघनें अपार वाढविलीं आहेत; तूं शिकविलेलें चांगलें आह्मी टाकून दिल्हें; आणि तूं धिःकारलेल्या वाईटासाठीं आम्ही श्रम केले. आम्ही खोटें व कपट रचिलें; आणि पापाची व दोषाची योजना केली; जगत्संबंधी व्यर्थतेमध्यें आह्मी आपलीं (आयुष्याचीं) वर्षें संपविलीं; तूं सर्व गुप्त गोष्टींविषयीं आमचा न्याय करशील याची आठवण राखिलीच नाहीं. आह्मी ज्ञानाचा बोध धिःकारला; बुद्धि आणि ज्ञानाविषयीं आह्मी मूढ झालों आहों. तुझ्या यथार्थ न्यायाविषयीं आम्ही असंतुष्ट झालों; आणि तुझ्या नियमाचा मार्ग आह्मी सोडिला. आमचें तोंड (लक्ष) आमच्या आवडी पुरविण्याकडे लागलें आहे; आह्मी आमच्या वांछांच्या खाणींत बुडालों; ज्ञान्याच्या तोंडच्या निषेधामुळें आह्मास राग आला; आम्ही आपलें तोंड उघडून दुष्टाईचीं भाषणें मोठ्यानें केलीं. तुजपासून निरंतरचें फिरणें आम्ही फिरलों आहों; निषेधणाऱ्या मनुष्यास आह्मी ओंगळ मानिलें आहे. तथापि जें अवघें आह्मावर आलें आहे, त्याविषयीं तूं सात्विक आहेस; त्वां सत्यता केली आहे; परंतु आह्मी दुष्टाई केली आहे.

לעינינו עשקו आमच्या दुष्कर्मांमुळें आमचे डोळे पीडित झाले आहेत; व आह्मी विखरलेले व लुचाडलेले आहों. शत्रूनें आह्मावर आपलें जोकड ठेविलें आहे; तें आह्मी आपल्या

खांद्यावर वाहत आहों; दासानी आह्मावर प्रभुत्व केलें; आम्हास त्यांच्या हातांतून सोडवायास कोणी नाहीं. पुष्कळ संकटानी आह्मास घेरिलें आहे; हे परमेश्वरा, आमच्या देवा, आम्ही तुला हांक मारितों, परंतु पाहा, आमच्या पापामुळें तूं आम्हापासून दूर झाला आहेस. आम्ही तुझ्या मागून वळलों, आणि शेरडांप्रमाणें बहकून नाश पावलों; असें असतां, अद्यापि आह्मी आपल्या परिचारापासून मागें वळत नाहीं. मग हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी यथार्थ आहों; आह्मी पाप केलें नाहीं; असें तुजपुढें बोलायास आह्मास धिटाई व धारिष्ट कोठून असेल ? निश्चयें, आह्मी व आमच्या पूर्वजानीहि पाप केलें आहे.

חטאתי אודיעך तुझ्याजवळ म्या आपलें पाप कबूल केलें, आपला अन्याय झांकिला नाहीं; म्या ह्मटलें कीं परमेश्वराजवळ मी आपले अतिक्रम आपल्यावर पत्करीन मग त्वां माझ्या पापदोषाची क्षमा केली.

אשמנו בגדנו पृष्ठ २१.

מה נאמר לפניך पृष्ठ २१.

יהי רצון पृष्ठ २१.

על חטא पृष्ठ २१.

על חטאים पृष्ठ २२.

אדיר ונאור हे पराक्रमी व महत्त्ववान्, आकाश व पृथ्वी उत्पन्नकर्त्या.

מי אל כמוך तुजसारिखा देव कोण आहे !
खोल (गोष्टी) प्रगट करणाऱ्या, आणि सत्यवक्त्या, तुजसारिखा देव कोण आहे !

पांघरूणाने विराजिता आणि ज्यावांचून कोणी नाहीं, त्या तुजसारिखा देव कोण आहे !

करार आठविणाऱ्या आणि (आपल्या लोकांच्या) शेषावर दया करणाऱ्या, तुजसारिखा देव कोण आहे !

निर्मळ दृष्टीच्या आणि आकाशांत वस्ती करणाऱ्या, तुजसारिखा देव कोण आहे !

(आमचे) अपराध धुळीस मिळविणाऱ्या आणि सात्विकपणा परिधान करणाऱ्या, तुजसारिखा देव कोण आहे !

राजांच्या राजा आणि भयंकर व गौरवयुक्त (देवा,) तुजसारिखा देव कोण आहे !

पडलेल्यांस आश्रय आणि पीडितांस उत्तर देणाऱ्या, तुजसारिखा देव कोण आहे !

उद्धारणारा, मुक्त करणारा आणि मोठ्या पराक्रमाने चालणाऱ्या तुजसारिखा देव कोण आहे !

हाक मारणाऱ्यांच्या जवळच असणाऱ्या आणि दयावंता व कृपावंता, तुजसारिखा देव कोण आहे !

आकाशांत वस्ती करणाऱ्या आणि यथार्थास आश्रय देणाऱ्या, तुजसारिखा देव कोण आहे !

ככתוב על יד נביאך जसें तुझ्या भविष्यवाद्यांच्या हातून लिहिलें आहे कीं, हे देवा, जो तूं अन्यायाची क्षमा करितोस, आणि आपल्या विभागाच्या दोषाचें पातक उल्लंघितोस, त्या तुजसारिखा कोण आहे? तो आपला क्रोध सर्वकाळपर्यंत बाळगीत नाहीं, कारण कीं त्याला दया आवडती. तो फिरेल, तो आह्मावर दया करील; तो आमचे अन्याय धुळीस मिळवील; आणि त्यांचीं सर्व पापें समुद्राच्या खोलपणांत टाकिसील. तूं याकोबासाठीं खरेंपण आणि आब्राहामासाठीं करुणा साधिसील, जिजविषयीं तूं आमच्या पूर्वजापासीं पुरातन दिवसापासून शपथ वाहीस ती.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचा-

विलें, आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु. त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु म्हणा.

תענו ותעתרו आकाशांतून (दयेने) तुम्हास उत्तर मिळो व तुमचें ऐकिलें जावो, तुमचें ओरडणें मान्य होवो, तुमची प्रार्थना प्रसन्नतेने ऐकिली जावो, आणि तुमच्या विनंतीचे वार्णींचें उत्तरहि मिळो; आणि परमेश्वर आमचा देव आह्मास व आमच्या सर्व इस्राएल बांधवांस, जेथें ते राहात असतील त्या ठिकाणीं प्रकाशाचा, प्रीतीचा व सख्यत्वाचा, आशीर्वादाचा, बुद्धीचा, आपल्या पवित्र मंदिराचा, मुक्तीचा, मोठेपणाचा, आनंदाचा, हर्षाचा, ज्ञानाचा व समजाचा, देवास लगटून राहाण्याचा, गौरवाचा व महत्वाचा, सफलतेचा, विस्ताराचा, शांततेचा व सुटकेचा, चांगल्या मंडळीचा, यथार्थतेचा, अधिकाईचा, पुण्याचा, हुशारीचा, सुबोधाचा, कीर्त्तनाचा, उल्हासाचा, करुणेचा, शाहाणपणाचा, चांगल्या जीवनाचा, अनुग्रहाचा व दयेचा, चांगुलपणाचा, शुद्धतेचा, दंहिवराचा, सरळपणाचा, तारणाचा, प्रायश्चित्ताचा, अन्नाच्या पूर्वल्याचा, सन्मानाचा, शास्त्राचा अभ्यास त्याच्या नामानें करण्याचा, चांगल्या मनाचा, मुगुटाचा, उपजीवनाचा, क्षमेचा, उत्तराचा, विश्रांतीचा, परोपकारबुद्धीचा, मधुरपणाचा, आश्रयाचा, त्याच्या शास्त्राच्या रहस्याचा, माफीचा, सहायाचा, शृंगाराचा, खंडणीचा, शास्त्राचा (अभ्यास करणाऱ्या लेंकरांकडून) पुष्कळ होण्याचा व वाढण्याचा, चांगल्या भक्षसामग्रीचा, न्यायत्वाचा, प्रेमाचा, उगवण्याचा, मोकळेपणाचा, प्रार्थना मान्य होण्याचा, तोंडावरील तेजाचा, पूर्ण आरोग्यतेचा, वाढण्याचा, ईश्वरास

उंचावण्याचा, प्रसन्नतेचा, कल्याणाचा, निर्भयपणाचा, अधिकाई-चा, शास्त्राचा, प्रार्थनेचा, उद्धाराचा, पश्चात्तापाचा दरवाजा उघडो. आणि तुह्मामधून तो सर्व प्रकारचा हेवा, द्वेष व वाद दूर करो; आणि शास्त्रांत जें लिहिलें आहे कीं, "तुमच्या पूर्वजांचा देव, याने तुह्मी जितके आहां, त्यापेक्षां हजारपट अधिक करावें; आणि जसें त्याने तुह्मास वचन दिल्हें आहे; तसा तुह्मास आशीर्वाद द्यावा." हें तुह्मामध्यें स्थापित होवो आणि तुह्मास तो चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिहो. आणि असी त्याची प्रसन्नता होवो. आणि अपण तथास्तु ह्मणूं.

תתקבל צלותהון सर्व इस्राएलांच्या घराण्याची प्रार्थना व काकळूत, आकाश व पृथ्वींतील त्यांच्या बापापुढें मान्य होवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

יהי שלמא आणि आकाशांतून आह्मास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार, आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आह्मास व सर्व इस्राएलांसाहि शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

אשרי האיש गीत १.
למה רגשו गीत २.
מזמור לדוד गीत ३.
למנצח בנגינות गीत ४.
לדוד מזמור ליי गीत २४.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचावलें आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत

व तुमच्या दिवसांत, लवकर व थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु; त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु म्हणा.

יהא שלמא आकाशांतून आम्हास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्ता, तारण, समाधान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुम्हीहि तथास्तु म्हणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आम्हास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

ברכו את יי सुवंदित परमेश्वराला तुम्ही धन्य म्हणा.

ברוך יי המבורך सुवंदित परमेश्वर सदासर्वकाळ धन्य असो.

עלינו לשבח आम्ही सर्वांच्या प्रभूची स्तुति करावी; आणि प्रारंभीं (पृथ्वी) घडणाऱ्यास थोर मानावें (हा आमचा मुख्य धर्म होय;) कारण त्यानें आम्हास जगांतील राष्ट्रांप्रमाणें केलें नाहीं, आणि पृथ्वींतील कुलांप्रमाणें आम्हास ठेविलें नाहीं, त्यांच्या वांट्याप्रमाणें वांटा आणि त्यांच्या समुदायांच्या भाग्याप्रमाणें आमचें भाग्य करून ठेविलें नाहीं. ते व्यर्थतेस व शून्यास नमन करितात; आणि जो देव तारीत नाहीं त्यास प्रार्थितात. परंतु राजांचा राजा, जो पवित्र व धन्य, ज्यानें आकाश पसरिलें व पृथ्वीचा पाया घातला, ज्याच्या गौरवाची वस्ती वरील आकाशांत आणि ज्याच्या सामर्थ्याचें वैभव उंचांत आहे, त्यास आम्ही नमन करितों. तोच आमचा देव, आणि दुसरा कोणी नाहीं; आमचा राजा सत्य आणि त्यावांचून कोणी नाहीं; जसें शास्त्रांत लिहिलें

आहे कीं, आज तुह्मी जाणून आपल्या हृदयीं असें ठसवून घ्या कीं, वर आकाशांत आणि खालीं पृथ्वीवर परमेश्वर तोच देव आहे, दुसरा कोणी नाहीं.

על כן נקוה לך यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या सामर्थ्याच्या गौरवानें पृथ्वींतून ओंगळपणा काढून टाकावा, मूर्ति छेदून टाकाव्या, सर्वसमर्थाच्या राज्याखालीं पृथ्वी स्थापन व्हावी, सर्व मांसमयांच्या संतानानी तुझ्या नामाने हाक मारावी, पृथ्वींतील सर्व दुष्टानी तुजकडे फिरावें, आणि सर्व गुडघे तुजपुढेंच नमावे, आणि सर्व जिव्हानी तुजविषयींच शपथ वाहावी, असें आहे; ह्मणून पृथ्वीवरील सर्व राहणारे तुलाच ओळखतील व जाणतील असें लवकर पाहण्यास आम्ही आवड धरितों. हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुजपुढेंच ते नमतील व नमस्कार करितील; तुझ्या नामाच्या गौरवाचा आदर करितील; आणि सर्व तुझ्या राज्याचें जोकड (राज्याधिकार) मान्य करितील. यास्तव तूं लवकर त्यांवर सर्वकाळचें राज्य कर. कारण राज्य तुझेंच आहे; तूंच सर्वकाळ गौरवानें राज्य करिशील; जसें तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, परमेश्वर सदांसर्वकाळ राज्य करील; आणि ह्मटलें आहे कीं, आणि परमेश्वर सर्व पृथ्विर राजा होईल; त्या समयीं एकच परमेश्वर होईल आणि त्याचें नाम एकच.

יגדל אלהים חי जीवंत देव थोर मानिला व स्तविला जाईल. तो आहेच आणि त्याच्या अस्तित्वास काळरूप सीमा नाहीं. तो एकच आहे, आणि त्याच्या एकत्वासारिखें दुसरें एकत्व नाहीं. तो अदृश्य आहे; आणि त्याच्या एकत्वासहि अंत नाहीं. त्यास शरीराकृति नाहीं व शरीरहि नाहीं; त्याचे पवित्रतेची बरोबरी (कोणीच) करूं शकत नाहीं. तो सर्व निर्माण केलेल्या पदार्थांच्या पूर्वींचा आहे. तोच पहिला आणि त्याच्या मुळास आरंभ नाहीं. पाहा, तो जगाचा स्वामी सर्वांस घडणारा आहे; तें त्याचें महत्व व त्याचा अधिकार दाखवितें. त्यानें आपल्या भविष्यकथनाची प्रेरणा आपल्या संपत्तिरूप आणि महत्वान मनुष्यांस

दिल्हीं. ज्याने त्याचें गौरव पाहिलें, त्या मोशेसारिखा इस्राएलांत कोणी दुसरा भविष्यवादी उठला नाहीं. देवाने आपल्या लोकांस, आपला भविष्यवादी व आपल्या घरचा विश्वासू याच्या हातून सत्य नियम शास्त्र दिल्हें आहे. देव आपल्या या नियमाशिवाय दुसरा लावून देण्याकरितां कधींहि तो पालटणार आणि बदलणार नाहीं. तो आमचीं सर्व गुह्यें पाहतो व जाणतो; सर्व पदार्थांचा शेवट तो पूर्वींच लक्षांत आणितो. धार्मिक मनुष्याची फेड त्याच्या कर्माप्रमाणें करितो; आणि दुष्टास त्याच्या दुष्टाईप्रमाणें शासन करितो. त्याच्या तारणाच्या वेळेची वाट पाहाणाऱ्यांस खंडून घेण्याकरितां शेवटल्या दिवशीं तो आमच्या माशीयाहास पाठवील. देव आपल्या बहुत दयेने मेलेल्यांस जीवंत करील; त्याचें स्तुत्य नाम सदांसर्वकाळ धन्य असो. हीं तेरा मूळतत्वें* देवाच्या नियमांचा व त्याच्या शास्त्राचा पाया आहेत.

संध्याकाळची प्रार्थना झाल्यावर कित्येक लोक घरीं न जातां देवालयांतच राहून रात्रभर पढत असतात, त्या रात्रीं शास्त्रांतील जे भाग विशेषेंकरून वाचावे ते येणेंप्रमाणें;—गीतें. ८८, १२४, १२६, ३९ आणि गीतांचें पुस्तक प्रारंभापासून शेवटपर्यंत वाचून मिश्नाच्या पुस्तकांतील व जोहारांतीलहि भाग वाचितात, याशिवाय, या दिवसाच्या प्रार्थनेच्या पद्धतीच्या ग्रंथांत כתר מלכות म्हणजे "राजकीय मुगुट" असा जो भाग आहे तोहि वाचितात. या भागांत सृष्टींतील चमत्कारावरून, ईश्वरी गुण वर्णून त्याचें स्तवन केलें आहे. याचें भाषांतर निराळें छापावें असी कर्त्याची इच्छा आहे.

कीर्त्तन.

वर्षप्रतिपदेच्या प्रार्थनेंत पृष्ठ ३० אלהי נשמה पासून पृष्ठ ९२ एथें לדוד ברכי נפשי याच्या शेवटपर्यंत लि-

* टीका ७.

हिल्याप्रमाणें कीर्तन वाचावें, मग खालीं लिहिल्याप्रमाणें वाचावें.

הוא האלהים " परमेश्वर तोच देव आहे, परमेश्वर तोच देव आहे. दो. वे.

מלך " परमेश्वर राज्य करितो, परमेश्वराने राज्य केलें, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. दो. वे.

והיה " למלך आणि परमेश्वर सर्व पृथ्वीचा राजा होईल; त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नाम एकच. हे परमेश्वरा, आमच्या देवा, आम्ही तुझ्या पवित्र नामाने उपकार मानावे, आणि तुझ्या स्तुतीने उत्सव करावा, ह्मणून तूं आम्हास तार आणि राष्ट्रांमधून आम्हास एकवट कर. इस्राएलाचा देव याचे धन्यवाद सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंतहि व्हावे; तेव्हां सर्व लोकांनी तथास्तु बोलून परमेश्वराची स्तुति करावी. प्रत्येक श्वासवानाने परमेश्वराला स्तवावें. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

למנצח מזמור לדוד गीत. १९.

רננו צדקים गीत ३३ आणि ३४, ९०, ९१, १७, २९, ३२, ९२, ६९, ८५, ८६, १०२, १०३, १०४, ९८, १२१, १२२, १२३, १२४, १३५, १३६ हीं गीतें वाचावीं.

ברוך שאמר जो बोलला आणि पृथ्वी झाली तो धन्य; जो बोलतो आणि करितो तो धन्य; जो ठरवितो आणि स्थापितो तो धन्य; ज्याने प्रारंभीं (पृथ्वी) उत्पन्न केली तो धन्य; जो पृथ्वीवर दया करितो तो धन्य; जो प्राणिमात्रांवर दया करितो तो धन्य; जो आपल्या भिणाऱ्यांस चांगलें वेतन देतो तो धन्य; जो अंधार घालवून प्रकाश आणितो तो धन्य; सदा जीवंत व सर्वकाळ स्थापित जो देव तो धन्य; त्याच्या पुढें दुष्टाई टिकत नाहीं. ज्यास विसर पडत नाहीं, आणि जो तोंडओळख धरीत नाहीं, व लांच घेत नाहीं तो धन्य; तो आपल्या सर्व मार्गांत यथार्थ व सर्व कामांत दयाळू आहे; जो खंडून घेतो व सोडवितो तो धन्य. ज्याने आपले लोक इस्राएल यांस (शाब्बाथ असल्यास—हा शा-

ब्बाथ दिवस व) हा प्रायश्चित्ताचा दिवस, हा अपराधाच्या क्षमेचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा दिवस दिल्हा तो धन्य.

ברוך הוא וברוך שמו तो धन्य, त्याचें नाम धन्य, आणि त्याचें स्मरणहि सर्वकाळ धन्य. हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, मोठ्या पवित्र राजा, दयाळू बापा, आपल्या लोकांच्या मुखाकडून स्तविला जाणाऱ्या, आणि आपल्या यथार्थींच्या व भक्तांच्या जिव्हेकडून वाखाणिला व गौरविला जाणाऱ्या, तूं धन्य आहेस. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा सेवक दावीद याच्या गीतांकडून आह्मी तुझी स्तुति करूं, स्तवनाकडून व कीर्त्तनाकडून तुला आह्मी सन्मान देऊं, थोर मानूं, स्तवूं, गौरवूं आणि उंचावूं, आमचा राजा असें मान्य करूं, पवित्र मानूं व तुझें भय धरूं; आणि हे आमच्या राजा, आमच्या देवा, सर्वकाळ जीवंत असणारा, जो एकच स्तविलेला, आणि ज्याचें नाम सदां-सर्वकाळ गौरविलेलें, आह्मी तुझें नाम स्मरूं; हे परमेश्वरा, आमच्या देवा, स्तवनांकडून गौरविलेल्या राजा, तूं धन्य आहेस.

מזמור שיר ליום השבת गीत ९२.

〃 מלך गीत ९३.

מזמור לתודה गीत १००.

יהי כבוד 〃 परमश्वराचें गौरव सर्वकाळपर्यंत होत जाईल; परमेश्वर आपल्या कृत्यांवर संतुष्ट होईल. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नांव धन्य धन्य ह्मटलें जावो. सूर्याच्या उगवतीपासून त्याच्या मावळतीपर्यंत परमेश्वराच्या नांवाची स्तुति असो. सर्व राष्ट्रांवर परमेश्वर उंच आहे; त्याचें गौरव आकाशांत आहे. हे परमेश्वरा, तुझें नाम सर्वकालिक आहे; तुझें स्मरण, हे परमेश्वरा, पिढोपिढीं आहे. परमेश्वराने आपलें सिंहासन आकाशांत स्थापिलें आहे, आणि त्याचा राज्याधिकार सर्वांवर आहे. आकाशाने आनंद करावा; आाण पृथ्वीने हर्षावें; आणि तीं राष्ट्रांत सांगतात कीं, परमेश्वराने राज्य केलें. परमेश्वर राज्य करितो, परमेश्वराने राज्य केलें, परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. परमेश्वर

सदांसर्वकाळ राजा आहे, त्याच्या देशांतून राष्ट्रांचा नाश झाला आहे. परमेश्वर लोकांचा विचार नाहींसा करितो; मुलुखांच्या योजना निरस करितो. मनुष्याच्या मनांत बहुत कल्पना असतात, परंतु जो परमेश्वराचा संकल्प तोच ठरेल. परमेश्वराचा विचार सर्वकाळ टिकतो; त्याच्या मनांतल्या योजना पिढोंपिढीं चालतात. कारण तो बोलतांच ती (पृथ्वी) झाली; त्याने आज्ञा करितांच ती स्थिर राहिली. कां तर परमेश्वराने सीयोन निवडून घेतलें, आपल्या राहण्यासाठीं इच्छिलें आहे. कां कीं, परमेश्वराने आपल्यासाठीं याकोब, आपलें स्वकीय धन होण्यासाठीं इस्राएल निवडून घतला आहे. कां तर परमेश्वर आपल्या लोकांला सोडीत नाहीं; आणि आपल्या वतनाला टाकीत नाहीं. तथापि तो ममताळू आहे, यास्तव तो अन्यायाची क्षमा करितो, नाश करीत नाहीं; तो बहुत वेळ आपला राग टाळितो आणि आपला सर्व संताप चेतवीत नाहीं. हे परमेश्वरा, तारण कर; आह्मी हांक मारितों, त्या दिवशीं राजाने आह्मास उत्तर द्यावें.

אשרי יושבי ביתך जे तुझ्या घरांत राहातात ते धन्य; ते नेहेमी तुझा उत्सव करितील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५.

הללויה הללי נפשי गीत १४६.

הללויה כי טוב गीत १४७.

הללויה הללו את יי गीत १४८.

הללויה שירו ליי गीत १४९.

הללויה הללו אל בקדשו गीत १५०.

ברוך יי לעולם परमेश्वराची सर्वकाळ स्तुति असो. आमेन व आमेन. यरुशालेमांत वस्ती करितो जो परमेश्वर त्याची सीयोनांतून स्तुति असो. तुम्ही परमेश्वराचें स्तवन करा. परमेश्वर देव इस्राएलाचा देव, त्याची स्तुति असावी; केवळ तोच आश्चर्य कृत्यें करितो. त्याच्या गौरवी नामाची स्तुति सर्वकाळ-

ही असावी; आणि त्याच्या गौरवानें सर्व पृथ्वी भरली जावी. आमेन व आमेन.

ויברך דוד आणखी दावीदानें सर्व समुदायाच्या देखतां परमेश्वराची स्तुति केली; तेव्हां दावीदानें ह्मटलें, "हे परमेश्वरा, इस्राएलाच्या देवा, आमच्या बापा, सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंत तुझी स्तुति व्हावी. हे परमेश्वरा, मोठेपणा व पराक्रम व तेज व जय व मान, हीं तुझीं. कारण कीं जें आकाशांत व पृथ्वींत तें सर्व तुझें; हे परमेश्वरा, राज्य आणि सर्वांवरला मुख्य अधिकार तुझा आहे. संपत्ति व गौरवहि तुझ्याकडून होतें, आणि तूं सर्वांवर अधिकार करितोस. तुझ्याच हातीं शक्ति व पराक्रम, आणि सर्वांस मोठेपण व शक्ति देणें हें तुझ्या हातीं आहे. तर हे आमच्या देवा, आतां आह्मी तुझे उपकार मानितों, आणि तुझ्या अतितेजस्वी नामाची स्तुति करितों. आणि तुझें गौरवविशिष्ट नाम, सर्व स्तुति व प्रशंसा यांवरतीं उंचावलेलें असतां वंदिलें जावें. तूंच तूं मात्र परमेश्वर आहेस; त्वां आकाशें, आकाशांचीं आकाशें व त्यांचीं सर्व सैन्यें, पृथ्वी व जें कांहीं तिजवर आहे, समुद्र व त्यांतलें सर्व उत्पन्न केलेलें तीं सर्व तूं वांचवितोस व आकाशांचीं सैन्यें तुझें भजन करितात. तूं परमेश्वर देव आहेस, ज्या त्वां आब्रामाला निवडून खास्द्यांच्या ऊर गांवांतून काढून घेतलें, आणि त्याचें नाम आब्राहाम ठेविलें. आणि त्याचें मन तुजपुढें विश्वासू असें सांपडलें, आणि खनानी, हित्ती, अमोरी व परिज्जी व यबूसी व गिर्गाशी, यांचा देश त्याच्या संततीला द्यायाला त्यासीं करार केला, आणि आपलीं वचनें खरीं केलीं आहेत, कां कीं, तूं सात्विक आहेस. आणि त्वां मिसरांत आमच्या पूर्वजांची पीडा पाहिली, आणि सूफ समुद्राजवळ त्यांची आरोळी ऐकिली. आणि फारोवर व त्याच्या सर्व चाकरांवर व त्याच्या देशच्या सर्व लोकांवर अद्भुतें व उत्पात केले. कां कीं, त्यानी त्यांजवर गर्व केला असें त्वां जाणिलें, आणि आजच्या प्रमाणें आपल्याला नाम प्राप्त केलें. तेव्हां त्वां त्यांपुढें समुद्र दुभागला, मग ते समुद्रामधून कोरड्या भू-

मीवरून पार गेले, आणि त्यांच्या पाठीस जे लागले, ते त्वां, जसा धोंडा खोल पाण्यांत तसे अगाधांत टाकून दिल्हे."

॥ ויושע ॥ तसें त्या दिवशीं परमेश्वराने इस्राएलास मिसऱ्यांच्या हातांतून सोडविलें, आणि इस्राएलाने समुद्राच्या कांठीं मिसरी मेलेले पाहिले. तेव्हां जो मोठा पराक्रम परमेश्वराने मिसऱ्यांवर केला, तो इस्राएलाने पाहिला; तेव्हां लोकांनीं परमेश्वराचें भय धरिलें आणि परमेश्वरावर व त्याचा सेवक मोशे यावर भरंवसा ठेविला.

אז ישיר משה मग इस्राएलाच्या संतानासुद्धां मोशाने परमेश्वराला हें गायन गाऊन असें ह्मटलें कीं, परमेश्वराला मी गाईन, त्याने तर जयच जय केला आहे; त्याने घोडा व त्यावरील स्वार समुद्रांत टाकिला आहे. परमेश्वर माझें बळ व कीर्तनपात्र, क्यां कीं तो माझा तारण झाला आहे; तो माझा देव, ह्मणून मी त्याचें गौरव करीन; तो माझ्या पूर्वजांचा देव, ह्मणून मी त्याला थोर मानीन. परमेश्वर युद्ध करणारा, त्याचें नाम परमेश्वर. त्याने फारोचे रथ व त्याचें सैन्य समुद्रांत टाकिलें आहे; त्याचे निवडलेले सरदारहि सूफ समुद्रांत बुडाले. डोहानीं त्यांस झांकिलें, ते धोंड्यासारिखे तळीं गेले. हे परमेश्वरा, तुझा उजवा हात बळाने महान झाला; हे परमेश्वरा, तुझ्या उजव्या हाताने शत्रूला आपटून टाकिलें आहे. त्वां आपल्यावरील उठणाऱ्यांस आपल्या अतिथोरपणाने पाडिलें आहे; त्वां आपला मोठा संताप लाविला, याकडून ते भूसासारिखे नष्ट झाले. तेव्हां तुझ्या नाकपुड्यांच्या श्वासाने पाणी गोळा झालें, राशीसारिखे ओघ उभे राहिले, समुद्राच्या पोटांत जळें थिजलीं. शत्रूने ह्मटलें, मी पाठीस लागेन, मी आटोपीन, मी लूट वांटीन, माझा जीव त्याकडून तृप्त होईल; माझी तरवार मी उपसीन, माझा हात त्यांचें ग्रहण करील. त्वां आपल्या वाऱ्याने फुंकिलें; समुद्राने त्यांस झांकिलें; ते शिस्यासारिखे महापाण्यांत बुडाले. हे परमेश्वरा, देवांमध्यें तुझ्यासारिखा कोण ! पवित्रतेने तुझ्यासारिखा महान कोण ! (तूं) स्तवण्याविषयीं भयमान, चमत्कार

कर्ता आहेस. त्वां आपला उजवा हात लांबविला, पृथ्वीने त्यांस गिळिलें. त्वां हे खंडन घेतलेले लोक दयेने आणिले, आपल्या सामर्थ्याने आपल्या पवित्र स्थानाकडे नेले. राष्ट्रें ऐकून कांपतील, पलेशेतांतील राहणाऱ्यांस दुःख व्याप्त करील. तेव्हां अदोमाचे अग्रसर विस्मित होतील; मोआबी बलाढ्य यांस कंप व्यापील; खनानांतील सर्व राहाणारे विरून जातील. भय व घाबरेंपण त्यांवर पडेल, तुझ्या मोठ्या भुजामुळें ते दगडासारिखे एथपर्यंत स्तब्ध होतील कीं, हे परमेश्वरा, तुझे लोक पार जातील. जे लोक त्वां विकत घेतले ते पार जातील. तोंपर्यंत तूं त्यांस आणून आपल्या वतनाच्या डागरांत लावसील; हे परमेश्वरा, तें ठिकाण त्वां आपल्या वस्तीसाठीं केलें आहे; हे प्रभू, तें पवित्र स्थान तुझ्या हातानीं सिद्ध केलें आहे. परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. (परमेश्वराचें राज्य सर्वकाळ आणि सर्वकाळांच्या सर्वकाळ स्थापित आहे.) कां तर फाराचे घोडे त्याच्या रथासुद्धां व त्याच्या स्वारांसुद्धां समुद्रांत गेले, आणि परमेश्वराने समुद्राचें पाणी त्यांजवर फिरवून आणिलें, परंतु इस्राएलाचीं संतानें समुद्राच्या मधून कोरड्या भूमीवरून गेलीं.

כי ליי המלוכה कां तर राज्य परमेश्वराचें आहे; तोच राष्ट्रांवर अधिकार करितो. आणि एसावाच्या पर्वताचा न्याय करायाला सायोन पर्वतावर तारणारे चढतील; आणि राज्य परमेश्वराचें असत जाईल. आणि परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नाम एकच. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या शास्त्रांतहि लिहिलें आहे कीं, हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे; आणि परमेश्वर एकच आहे.

שחרית पाहांटेची प्रार्थना.

נגדך " हे परमेश्वरा, माझी सर्व वांछा तुजपुढें आहे;

जरी मी आपल्या ओंठाने उच्चारीत नाहीं तरी एक क्षण मी तुझी प्रसन्नता मागतों, नाहीं तर मी मरेन; परंतु माझी मागणी कोणाकडून पूर्ण होईल. मी आपला उरलेला आत्मा तुझ्या हातीं सोंपून झोंपीं जातों; ह्मणजे माझी झोंप मधुर होईल. तुजपासून दूर झालों तर मी जीवंत असतां मेल्यासारिखा; आणि तुला लगटून राहिलों तर मेलों असतां जीवंतासारिखा आहें. मी तुजपुढें कशाने यावें आणि माझी भक्ति व माझा नियम हीं कशीं असावीं हें मी जाणत नाहीं. हे परमेश्वरा, तूं आपले मार्ग मला शिकीव; आणि ह्या मूर्खपणें केलेल्या फितुरीच्या बंदांतून मला सोडीव. मजमध्यें कष्ट भोगायास सामर्थ्य आहे इतक्यांत मला शिकीव; आणि माझे कष्ट तूं धिःकारूं नको. मी आपले स्वतांस ओझें होण्याच्या आणि माझा एक अवयव दुसऱ्यास भारी होण्याच्या दिवसापूर्वीं, आणि माझ्या इच्छेविरुद्ध माझी कंबर वांकल्यापूर्वीं, आणि माझीं हाडें कसरेने खाऊन तीं मला आधार देण्यास अशक्त होण्याच्या पूर्वीं, आणि माझे पूर्वज ज्या ठिकाणीं गेले त्या ठिकाणीं मी गेल्याच्या, आणि त्यांच्या विश्रांतीच्या ठिकाणीं मी विश्रांति केल्याच्या (अगोदर मला शिकीव). पृथ्वीच्या पाठीवर मी केवळ परका व प्रवासी यासारिखा आहें, आणि निश्चयें, तिच्या पोटांत माझ्या वतनाचा वांटा आहे. माझे तारुण्याने एथपर्यंत सर्व कामें आपणाकरितांच केलीं, तर आतां मी आपल्या घराची * सामग्री केव्हां करूं? हें जग † जें माझ्या मनांत आहे, तें मला आपला अंत शोधण्यास मना करितें. मी आपल्या दुष्टवासनेच्या बंदांत असतां, आणि आपल्या वांच्छेचा दास झालों असतां, आपल्या उत्पन्न कर्त्याची सेवा कशी करूं? उद्यां कीड माझी वहीण होणार, मग मी उंच पद कसें शोधूं? उद्यांचा (दिवस) मला चांगला जाईल असें जर मी जाणत नाहीं, तर आजच्या दिवसाच्या चांगल्यामुळें माझें मन कसें हर्षित होईल! माझ्या त्वचेचा पूर्ण नाश व्हावा ह्मणून दिवस व रात्र

* घर हें नाम एथ लाक्षणिक भाषेंत पुढल्या जगास दिल्हें आहे.
† संसार माया.

हीं जामीन झालीं आहेत. माझा अर्धा अंश हावेंत जाऊन मिसळेल आणि अर्धा अंश परत मातीस जाऊन मिळेल. माझ्या (दुष्ट) वासनेनें माझ्या तरुणपणापासून वयानें मी जर्जर होईपर्यंत शत्रूप्रमाणें माझा पाठलाग केला आहे, तर मी काय ह्मणूं ! जर तुझी प्रसन्नता नाहीं तर (या आयुष्याच्या) वेळेचा मला काय उपभोग? आणि जर तूं माझा विभाग नाहींस, तर माझा विभाग काय ! चांगल्या कृत्याविषयीं मी उघडा व नागवा आहें; आणि तुझें पुण्य मात्र माझें आच्छादन आहे. अज्ञान मी आपली * वचनें किती लांबवूं. हे परमेश्वरा, माझ्या सर्व वांच्छा तुजपुढें आहेत.

אלהים אלי אתה हे देवा, तूंच माझा देव आहेस, मी तुझें गुप्त राखलेलें रहस्य लवकर शोधीन; तुझी सत्यता मी कळवीन आणि तुझें महत्व मी गाजवीन. ज्या दिवशीं मीं तुझ्या मंडळींत उभा राहतों, त्या दिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों तेव्हां, तूं मला उत्तर दे; हे देवा, तूं माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील. हे देवा, तूंच माझा देव आहेस, माझे गुप्त अपराध तुजपुढें प्रगट आहेत, माझा जीव व माझीं हाडें तुझ्या भयामुळें कांपतात. ज्या दिवशीं घाबरलेले लोक तुझ्या तारणाची आवड धरितात आणि कुलीन लोक एकत्र होतात, त्या दिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों तेव्हां तूं मला उत्तर दे. हे देवा, यथार्थता पांघरणारा व धारण करणारा माझा देव तूंच आहेस; तुझें भय धरणारांनी त्यांसाठीं काकळूत करण्यास मला परवानगी दिल्ही आहे; तर मी त्वरा करितों, परंतु मी लज्जित न व्हावें. आणि ज्या दिवशीं तूं माझा (मोहो) † दाबून टाकणार आणि माझे घाय बरे करणार त्या दिवशीं, जेव्हां मी तुला हाक मारितों, तेव्हां तूं मला उत्तर दे; आणि मी लज्जित न व्हावें ह्मणून माझें मन तुझ्या विधी-विषयीं यथास्थित असावें. हे देवा, तूंच माझा देव आहेस, माझ्या विचा-

* इ. जीभ. † इ. फांस.

रानी मला तुजपासून वळवूं नये; आणि माझ्या ओंठानीं चूक करण्याविषयीं त्वरा करूं नये; म्हणून त्यांस तूं सांभाळ. ज्या दिवशीं तुझ्या स्तुतीमुळें मला माझ्या कष्टांचा विसर पडतो, त्या दिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों, तेव्हां मला उत्तर दे; तुझ्या प्रकाशानें, व तुझ्या सत्यतेनें मला चालवावें म्हणून त्यांस पाठीव. हे देवा, तूंच माझा देव आहेस, हे माझ्या खडकरूप आश्रया ! मी तुजकडे पाहातों, तूं मला शिकीव व धैर्य दे, कारण मजमध्यें कांहींच शक्ति नाहीं. ज्या दिवशीं मी आपल्या ऋणापासून शुद्ध व निर्मळ होणार, त्या दिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों, तेव्हां मला उत्तर दे; हे देवा, मजमध्यें शुद्ध मन उत्पन्न कर, आणि सरळ आत्मा मजमध्यें नवा कर. हे देवा, तूंच माझा देव आहेस, अति उंच आकाशांत वस्ती करणाऱ्या, खोल स्थानांतून ओरडून मी तुजकडे विनंती करितों. ज्या तुझी स्तुति उच्चारण्याच्या दिवशीं (पापाच्या) क्षमेची आवड धरणारांच्या, आणि * देव वळेल, आणि रागापासून फिरेल असें जाणणारांच्या मंडळींत जेव्हां मी हाक मारितों, तेव्हां मला उत्तर दे. हे देवा, तूंच माझा देव आहेस, मी तुजपुढें अतिक्रमानें भरलेला आहें; हे अनंता, जर तूं अन्याय मोजितोस, तर हे प्रभु, तुजपुढें कोण उभा राहील ? जेव्हां मी तुला हाक मारितों तेव्हां तूं मला उत्तर दे; मजशीं वाद करायास आज तूं येऊं नको; कारण मी अन्यायांत जन्मलों आणि माझ्या आईनें माझा गर्भ पापांत धरिला. हे देवा, तूंच माझा देव आहेस, मला सरळमार्गी चालवायास पूर्वीच तूं उपाय दाखवून ठेविला आहेस; मला प्रसन्नतेनें सुशोभित करायास त्वां प्रायश्चित्ताचा दिवस नेमून ठेविला आहे. ज्या दिवशीं मी बांधले गेलेले बंद तुटणार, त्या दिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों तेव्हां तूं मला उत्तर दे; माझ्या अन्यायापासून मला पूर्ण धू, आणि माझ्या पापापासून मला शुद्ध कर. हे देवा, तूंच माझा देव आहेस, जरी

* या वाक्याचा कोणी असा अर्थ करितात कीं, जो कोणी (ईश्वराकडे) फिरायास जाणतो त्यानें पश्चात्ताप करावा.

माझ्या जाणून केलेल्या पापामुळें मी शोककारक नीचत्वांत आहें, तरी माझे विचार तुझ्या जवळ येण्याची आवड धरितात. ज्या दिवशीं त्वां विश्वासू कळपास तुह्मी आपणासुद्धां वचनें घेऊन (प्रार्थना करून *) ईश्वराकडे फिरा, असें सांगितलें, त्या दिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों तेव्हां तूं मला उत्तर दे. हे देवा, तूं माझा देव आहेस, जे तुजमध्यें हर्ष मानितात त्यानीं आपलीं अंतःकरणें शुद्ध करून खाणें † पिणें वर्जिलें आहे. तुला लगटून राहणारांनीं ज्या दिवशीं आपणास दुःख लावून घ्यावें असें नेमिलें आहेस, त्यादिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों, तेव्हां तूं मला उत्तर दे; ज्या तुझे नेम शिकावे ह्मणून मी पिडीत होतों हें मला बरें आहे. हे देवा, तूंच माझा देव आहेस, आह्मी आपले डोळे ‡ तुजकडे उंचाविले आहेत, आह्मी आपली दृष्टी तुजकडे लाविली आहे, आणि आपलीं तोंडें खालीं घालून तुजसमोर उभे आहों. त्यादिवशीं खोटे विचार स्पष्ट दिसणार, त्यादिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों तेव्हां तूं मला उत्तर दे; आपण आपलीं हृदयें व आपले हात, देवाकडे उंचावूं या. हे देवा, दयाळू व आकाशांतील सेराफीमांच्या मंडळींत सन्मानिलेला तूंच माझा देव आहेस, मी जेव्हां मनन करून तुझी काकळूत करितों, तेव्हां माझी आठवण कर आणि मला दर्शन दे. हे परमेश्वरा, सर्व प्राण्यांचा आत्मा तुला धन्य ह्मणेल असें मी तुझा विश्वासू लोकांच्या मंडळींत ह्मणून जेव्हां मी तुला हांक मारितों, तेव्हां तूं मला उत्तर दे.

נשמת כל חי हे परमेश्वरा ! आमच्या देवा, सर्व प्राण्यांचा आत्मा तुझ्या नामाला धन्य ह्मणतो; आणि हे आमच्या राजा ! सर्व मांसमयांचा जीव तुझ्या स्मरणाचें नित्य गौरव करून प्रशंसा करितो. सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंत तूंच देव आहेस; आह्मास तुजवांचून कोणी राजा, खंडून घेणारा, तारणारा, मुक्त करणारा, सोडविणारा, आणि दुःखाच्या व संकटाच्या समयीं

* इ. वचनें घेऊन. † इ. रुचि घेणे. ‡ इ. पापण्या.

उत्तर देणारा व दया करणारा कोणी नाहीं. आह्मास तुजवांचून राजा, सहायकर्ता व आश्रय देणारा कोणी नाहीं. हे आदिकाळच्या व अंतकाळच्या देवा ! सर्व प्राण्यांच्या देवा ! सर्व उत्पत्तीच्या स्वामी ! तूं सर्व स्तुतींकडून वर्णिला आहेस; तूं आपल्या जगाला दयेने, आणि सर्व प्राण्यांस कृपेने चालवितोस. आणि परमेश्वर जागृत आहे; तो निजत नाहीं व झोंप घेत नाहीं; झोंपीं गेलेल्यांस सावध करितो; निजलेल्यांस जागृत करितो; मेलेल्यांस जीवंत करितो; रोग्यांस निरोगी करितो; आंधळ्यांस दृष्टी देतो; ओणव्यांस उभे करितो, मुक्यांस वाचा देतो; गुप्त गोष्टी प्रगट करितो; (हे देवा,) तुजपुढेंच मात्र आह्मी नमन करितों.

ואלו פינו जरी आमचे मुखांत सागराप्रमाणें गायन, आमच्या जिव्हेंत त्यांतील लाटांच्या गर्जनेसारिखी स्तुति, अमच्या ओठांत विस्तीर्ण अंतराळासारिखें कीर्त्तन, आणि जरी आमचे डोळे सूर्य व चंद्र यांसारिख्या तेजाने भरले आहेत, आमचे हात आकाशांतील गरूडा सारिखे पसरले आहेत, आणि आमचे पाय हरणासारिखे चपळ आहेत; तरी हे परमेश्वरा, आमच्या देवा, पूर्वीं त्वां आह्मावर व आमच्या पूर्वजांवर जे हजारों व लक्षावधि उपकार, चिन्हें व चमत्कार केले आहेस, त्यांतील एकाकरितांहि तुझें स्तवन करायास; आणि हे आमच्या राजा, तुझें नाम सुवंदित करायास आह्मामध्यें पूर्णता नाहीं. हे परमेश्वरा ! आमच्या देवा, त्वां आह्मास मिसरांतून काढिलें, दासत्वाच्या वस्तींतून त्वां आह्मांस सोडविलें, दुष्काळांत अन्न पुरविलें, सुकाळांत आह्मास पोषिलें, तरवारीपासून आह्मास मुक्त केलें, पटकींतून आह्मास वांचविलें, आणि वाईट व पुष्कळ रोगांपासून आह्मास सोडविलें. एथपर्यंत (आजपर्यंत) तुझ्या दयेने आमचें सहाय केलें, आणि तुझ्या कृपेने आह्मास सोडिलें नाहीं, ह्मणून जें निरनिराळे अवयव त्वां आह्मामध्यें (उत्पन्न) केले आहेस; जो आत्मा व जीव आह्मामध्यें फुंकिला आहेस; आणि जी जीभ आमच्या मुखांत ठेविली आहेस; पाहा, तीं, हे आमच्या राजा, तुझ्या नांवाला सर्वकाळ

स्तवितील, धन्य ह्मणतील, वाखाणितील, गौरव करितील आणि गातील. कारण सर्व मुखें तुझेंच स्तवन करितील; सर्व जिव्हा तुलाच वाखाणितील, सर्व डोळे तुजकडेसच लागतील; सर्व गुडघे तुजपुढेंच टेंकले जातील; सर्व बांधे (मनुष्यांचीं शरीरें) तुजपुढेंच नमन करितील; सर्व मनें तुझेंच भय धरितील; आणि सर्व अंतर्यामें व गुर्दकमळें तुझ्याच नांवाचें स्तवन करितील. जसें ह्मटलें आहे कीं, माझीं सर्व हाडें ह्मणतील कीं, "हे परमेश्वरा! तुझ्यासारिखा कोण? दीनापेक्षां जो शक्तिमान त्यापासून. आणि दीनाला व दरिद्र्याला त्याच्या लुटणाऱ्यापासून तूं सोडवितोस; दीनाची विनंती तूं ऐकितोस आणि गरीबांच्या ओरडण्याकडे कान लावून त्याचें तारण करितोस." आणखी असें लिहिलें आहे कीं, "अहो नीतिमान, तुह्मी परमेश्वराविषयीं हर्ष शब्द करा; कीर्त्तन करणें हें सरळांस शोभतें; सरळांच्या मुखांकडून तूं उंचाविला जाशील; पुण्यवंतांच्या ओठांकडून सुवंदित होशील; यथार्थांच्या जिव्हेकडून पवित्र मानिला जाशील; आणि पवित्र लोकांमध्यें तुझी स्तुति केली जाईल."

במקהלות तुझे लोक इस्राएल यांच्या घराण्यांच्या दाहा हजारांच्या मंडळ्यांमध्यहि (असें तुझें गौरव केलें जाईल); कारण सर्व उत्पन्न केलेले पदार्थांचा असा धर्म आहे कीं, इशायचा पुत्र दावीद याच्या गीतांपेक्षां व स्तुतिपेक्षां त्यांनी तुझी अधिक स्तुति करावी, स्तवन करावें, सुवंदन करावें, गौरव करावें, उंचवावें, सन्मान करावा, आणि वाखाणावें.

ובכן ישתבח שמך यास्तव, हे आमच्या राजा; तुझें नाम सर्वकाळ सुवंदित असो: आकाशांत व पृथ्वींत तूंच सर्वाधिकारी, मोठा व पवित्र देव आहेस; कारण, हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, गायन व सुवंदन, स्तुति व कीर्त्तन, शक्ति व अधिकार, जयजयकार, मोठेपणा व सामर्थ्य, स्तवन व गौरव, पवित्रता व राज्य हें तुलाच, आणि धन्यवाद व उपकार स्तुति तुझ्याच मोठ्या व पवित्र नामाला शोभतात; आणि

सर्वकाळांपासून सर्वकाळपर्यंत तूंच देव आहेस. हे परमेश्वरा! मोठ्या व स्तुतिकडून वर्णिलेल्या राजा, महत्ववान देवा, आश्चर्य कृत्यांच्या स्वामी, सर्व प्राण्यांस उत्पन्न करणाऱ्या, सर्व कामांच्या धनी, कीर्त्तनाच्या गायनामध्यें आवड धरणाऱ्या, जगतांच्या जीवंत देव राजा, तूं धन्य आहेस. आमेन.

שנאנים शांतीचे शीनअनिम * दूत ज्वालेसारिखे प्रकाशतात; ज्या तेजाने ते वेष्टिलेले आहेत, तें निर्मल आरस्या सारिखें चमकतें; गौरव युक्त आसनापुढें ते मोठ्या वाणीने हर्ष करितात; आणि दृष्टांताकडून ते एक प्रत्येकास हाक मारितात, देवास पवित्र मानणें त्यांस आवडतें.

הבו ליי अहो परमेश्वराच्या दुतानों, परमेश्वराला द्या, (परमेश्वराला गौरव व वैभव) द्या.

לך חיות वरील हाय्योथ * दूतहि तुझेच आहेत, त्यांस तुझ्या आसनाखालीं नेमून ठेविलें आहे, आणि आरआलिम * व हाशमालिम * जे तेजस्वी रंगाने वेष्टिलेले आहेत, ते आपल्या चार टोळ्या करून तुझी स्तुति व तझें महत्व गाजवितात. एक सन्मानाने व दुसरी धैर्याने तुझें कीर्त्तने व गायन करितात; हे पराक्रमी दूतांरात्रंदिवस आपल्या पाहाऱ्यावर उभे असतात. הבו ליי

מכון משמר वर सांगितलेल्या पाहाऱ्याची नेमणूक तुझ्या सर्व सैन्याच्या तळांच्यावर आहे, आणि ती तुझ्या नामांकित सरदार मिखाएल याच्या हातीं सोपिलेली नाहीं कीं काय? (त्या पाहाऱ्यावरील दूत) लक्षावधि रथांमध्यें तुझ्या उजव्याकडे उभे आहेत; याप्रमाणें ते एकवट होऊन व एकत्र राहून तुझें वसतिस्थान कोठें आहे याचा शोध करितात; तेथें पडद्याच्या आड ‡ नमन करून ते तुझें भजन करीत जवळ येतात. הבו ליי

המון מחנה दुसऱ्या तळाचें सैन्य तुझ्या डाव्याबाजूस

---

* या दुताच्या जाति आहेत.

† इ. पराक्रमी पुत्र.

‡ इ. पुदें.

उभें आहे; त्यांच्या सैन्यावर पाहाणीकरितां गाब्रीएल हा आहे, हजारो सेराफीम इकडून, आणि फार बळकट व मोठें सैन्य तिकडून तुझ्या पवित्र आसनास घेरितात, ते अग्नीचे घडलेले आणि अग्नीने वेष्टिलेले असून अग्नीच्या घोड्यांवर स्वार होतात. הבו ליי

קול יצפצף तिसऱ्या तळाचें सैन्य गुंगण्याच्या वाणीचें गीत रचितात, आणि बलिष्ठ सरदार नुरीएल सामर्थ्यें हल्यारखाण्याच्या बुरूजासारिखा उभा आहे; त्यांच्या पाऊलच्या गडबडीमुळें, आणि अनादि देव, आकाशाचा व पृथ्वीचा * घडणारा कोठें आहे? अशा त्यांकडून वारंवार निघणाऱ्या शब्दाच्या गर्जनेमुळें अति उंच आकाशमंडळाहि थरथरतें; ते तुझें पूर्ण सौंदर्य पाहाण्याकरितां रात्रंदिवस आवड धरितात. הבו ליי

מכוסי הוד चौथ्या (तळाचें) गौरवाने शृंगारलेलें (सैन्य) तुजविषयीं साक्ष व प्रमाण देतें, आणि रेफाएलाबरोबर तुझें वचन व गौरव कळवितें; ते सामर्थ्याच्या पुष्पाने व पराक्रमाच्या मुगुटाने तुला शृंगारित व सुशोभित करितात. ते चारहि तळ एकत्र होऊन सदासर्वकाळ गीतें व सुवर्णवाक्यें गातात; कारण त्यां त्यांस असें घडलें आहे कीं, ते कधींच थकत नाहीं व म्लान होत नाहींत. הבו ליי

נצוצים נקבצים त्या एकत्र झालेल्या ज्योति एकदांच तुला स्तवितात, आणि जुलुमामुळें कण्हणाऱ्यांकरितां † तुजपुढें काकळूत करितात, आणि तुझ्या भयामुळें व त्रासामुळें आपलीं पाउलें स्थापून गडगडाटासारिख्या मोठ्या वाणीने वेळोवेळ तुझी पवित्रता गातात; आणि पवित्र देवास पवित्र उत्तरें करून परम पवित्रापुढें मध्यस्थ होतात. הבו ליי

קדיש לעילא पृष्ठ ९.

" ברכו את सुवंदित परमेश्वराला तुह्मी धन्य ह्मणा. ישתבח ויתפאר राजा, राजांचा राजा आणि पवित्र

* इ. उंच व नीचाचा. † इस्राएलांकरितां.

व धन्य जो, त्याचें नाम स्तविलें आणि गौरविलें जावो. पहिला तोच व शेवटलाहि तोच आणि त्यावांचून कोणी देव नाहीं, आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नाम सुवंदित व सर्व स्तुति व प्रशंसेपेक्षां अधिक उंचाविलेलें असो.

ברוך " המבורך सुवंदित परमेश्वर सदांसर्वकाळ धन्य असो.

" ברוך אתה हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, उजेड घडणाऱ्या आणि काळोख उत्पन्न करणाऱ्या, शांति करणाऱ्या आणि सर्व पदार्थ उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस. सर्व तुला स्तवितील, सर्व तुला सुवंदितील आणि सर्व ह्मणतील कीं, परमेश्वरासारिखा पवित्र कोणीच नाहीं. हे सर्वांस घडणाऱ्या, प्रतिदिवशीं पूर्वेच्या द्वारांचीं कवाडें उघडणाऱ्या देवा, आणि अंतराळाच्या खिडक्या उघडणाऱ्या, सूर्यास त्याच्या ठिकाणांतून आणि चंद्रास त्याच्या विश्रांतीच्या जागेंतून काढणाऱ्या, आणि सर्व जगास व दयेच्या गुणाकडून उत्पन्न केलेल्या त्याजवरील राहाणाऱ्यांस प्रकाशित करणाऱ्या, सर्व तुलाच उंच मानितील; सेलाह. पृथ्वीला व तिजवर राहाणाऱ्यांला दयेने प्रकाश देणाऱ्या, आणि आपल्या चांगुलपणाकडून नेहेमीं प्रतिदिवशीं उत्पत्तीचीं कृत्यें नवीं करणाऱ्या, हे परमेश्वरा, तुझीं कृत्यें किती आहेत ! तीं सर्व त्वां चातुर्यानें केलीं; पृथ्वी तुझ्या संपत्तीने भरली आहे. पूर्वकाळांपासून उंच मानिलेल्या आणि अनंतकाळाच्या दिवसांपासून स्तविलेल्या, गौरवयुक्त व थोर मानलेल्या राजा, अनादि देवा ! तुझ्या पुष्कळ दयेने आह्मावर दया कर. आमच्या सामर्थ्याचा देव, आमचा खडकरूप आश्रय, आमच्या तारणाची ढाल आणि आमच्या आश्रयाचा दुर्ग (तूंच आहेस.) तुजबरोबर तुळणा करणारा कोणी नाहीं; आणि तुजवांचून कोणी नाहीं; तुजविना कोणी नाहीं; आणि तुजसारिखाहि कोणी नाहीं. हे परमेश्वरा ! आमच्या देवा, या जगांत तुजबरोबर तुळणा करणारा कोणी नाहीं, आणि हे आमच्या राजा, पुढील जगांत तुजवांचून कोणी

नाहीं; हे आमच्या खंडून काढणाऱ्या, माशीयाहच्या दिवसापर्यंत तुजविना आम्हास कोणीच नाहीं; आणि हे आमच्या तारणाऱ्या, पुनरुत्थितीच्या वेळेस आम्हास तुजसारिखा कोणीच असणार नाहीं.

אל אדון देव सर्व कृत्यांचा स्वामी आहे; तो सर्व प्राण्यांच्या मुखांकडून धन्य मानलेला व सुवंदित आहे. त्याच्या मोठेपणाकडून व चांगुलपणाकडून पृथ्वी भरलेली आहे; ज्ञान व बुद्धि त्याच्या सभोंवतीं आहेत. तो पवित्र हाय्योथापेक्षां * श्रेष्ठ आणि रथांवर गौरवाने शोभायमान आहे. पुण्य व सरळपणा त्याच्या आसनापुढें आहेत, आणि कृपेने व दयेने त्याचें गौरव भरलें आहे. आमच्या देवाने ज्या ज्योति उत्पन्न केल्या त्या उत्कृष्ट आहेत; त्या त्याने ज्ञान, बुद्धि व चातुर्याने घडिल्या आहेत. त्यांस त्याने सामर्थ्य व बळ दिल्हें आहे कीं, त्यांनी सृष्टि चालवावी. त्या तेजाने व किरणाच्या उजेडाने भरल्या आहेत, सर्व जगांत त्यांचें तेज सुंदर आहे. निघतांना त्या आनंद करितात व परत येतांना उल्हास करितात; आणि आपल्या उत्पन्न करणाऱ्याची इच्छा भयाने (पूर्ण) करितात. ते त्याच्या नामाचें गौरव व महत्व करितात; आणि त्याच्या राज्याच्या आठवणीवरून हर्ष व उल्हास करितात. सूर्यास हाक मारतांच तो प्रकाशला, आणि चंद्राचे आकार पाहून त्याने त्यांस सुधारलें. (यावरून) उंचावरील सर्व सैन्य त्याचें स्तवन करितें, आणि सेराफीम, ओफानीम आणि पवित्र हाय्योथ † त्याचें गौरव करून त्यास थोर मानितात.

शाब्बाथ असल्यास हें बोलावें.

לאל אשר שבת जो सर्व कामांपासून स्वस्थ राहून सातव्या दिवशीं थोर मानिला जाऊन गौरवाच्या आसनावर बसला, त्या देवाची ते (दूत) स्तुति करितात. विसांव्याच्या दिवसास त्याने सौंदर्याने शृंगारित करून शाब्बाथ दिवसास त्याने हर्ष

* हाय्योथ एक प्रकारचे दूत आहेत.
† हीं निरनिराळ्या प्रकारच्या दूतांचीं नावें आहेत.

असें ह्मटलें. जेव्हां देव आपल्या सर्व कामांपासून स्वस्थ राहिला त्या सातव्या दिवसाच्या स्तुतीचें गीत तें हेंच. आणि सातवा दिवस शाब्बाथ दिवशीं गाण्याचे गीताकडून * स्तुति करून ह्मणतो. यास्तव ईश्वराने सर्व घडलेले पदार्थ त्याचें गौरव करून सर्व पदार्थ घडणाऱ्या राजास, ज्याने आपले लोक इस्राएल यांस शाब्बाथ दिवशीं विसांवा दिल्हा, त्याचें गौरव व माहात्म्य करून त्यास थोर मानितात.

शाब्बाथ नसल्यास एथून बोलावें.

שמך יי אלהינו हे परमेश्वरा ! आमच्या देवा, तुझ्या हातांच्या स्तुत्य कामांकरितां,आणि ज्या तेजस्वी ज्योति त्वां घडिल्या त्यांकरितां वर आकाशांत व खालीं पृथ्वींत तुझें नाम पवित्र मानिलें जावो; आणि हे आमच्या राजा, तुझी आठवण स्तविली जावो. तीं (सर्व) तुझें गौरव करितील. सेलाह.

תתברך לנצח हे आमच्या खडकरूप आश्रया, आमच्या राजा, आमच्या खंडून घेणाऱ्या, आणि पवित्र (दूतांस) उत्पन्न करणाऱ्या, तूं सदासर्वकाळ धन्य आहेस; हे आमच्या राजा, सेवा करणारे दूत उत्पन्न करणाऱ्या, आणि ज्याचे सेवा करणारे दूत जगताच्या उंच भागीं उभे राहून भयाने एकाच वाणीने जीवंत देव व जगताच्या राजाच्या गोष्टी ऐकवितात, तुझें नाम सर्वकाळ स्तविलें जावो. ते सर्व प्रिय, शुद्ध, पराक्रमी व पवित्र असून ते सर्व आपल्या उत्पन्नकर्त्याची इच्छा भयाने व त्रासाने पूर्ण करितात. आणि सर्व आपलीं मुखें पवित्रतेने, शुद्धतेने, गायनाने व कीर्त्तनाने उघडून थोर, पराक्रमी,भयंकर व पवित्र जो देव राजा, त्याच्या नामास धन्य ह्मणतात, स्तवितात, गौरव करितात, पवित्र मानितात, सन्मान देतात व राज्याधिकार देतात.आणि सर्व आपणावर देवाच्या †राज्याचें जोकड एक प्रत्येकापासून मान्य करून आणि स्वस्थ आत्म्याने, शुद्ध

° दावीदाचें ९२ वें गीत.

† मूळ ग्रंथांत देव या शब्दाकरितां आकाश असा शब्द आहे; आणि इत्रों ग्रंथांत असें पुष्कळ वेळ आढळतें.

ओठाने व पवित्र मधुरपणाने आपल्या घडणाऱ्यास पवित्र मानायास सर्व एकदांच भयाने उत्तर देवून त्रासाने म्हणतात कीं, "पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे." आणि ओफानिम व पवित्र हाय्योथ उंच होऊन मोठ्या स्वराने त्यांसमोर स्तवन करीत म्हणतात कीं, "त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो."

לאל ברוך सुवंदित देवासाठीं मधुर गायन करून राजा आणि जीवंत व निश्चल देव, याचें कीर्तन करून व स्तुति ऐकवून (ते दूत) असें म्हणतात कीं, थोर व पवित्र, पराक्रम करणारा, नवीन कृत्यें करणारा, युद्धांचा स्वामी, यथार्थता पेरणारा, तारण उगविणारा, आरोग्यता उत्पन्न करणारा, स्तुतीने भयंकर, आश्चर्य कर्मांचा धनी आणि प्रतिदिवशीं आपल्या दयेने उत्पत्तीचीं कृत्यें नवीन करणारा, तो एकटाच आहे. जसें म्हटलें आहे कीं, ज्याने मोठ्या ज्योति उत्पन्न केल्या, त्याची स्तुति करा; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे. हे परमेश्वरा, ज्योति घडणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אהבת עולם हे परमेश्वरा, आमच्या देवा, सर्वकालिक प्रीतीने त्वां आह्मावर प्रीति केली; हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या मोठ्या नामाकरितां व ज्या आमच्या पूर्वजानीं तुजवर भरंवसा ठेविला, त्यांकरितां त्वां अति मोठ्या दयेने आमची करुणा केली; आणि त्यानीं आपल्या पूर्ण मनाने तुझी इच्छा पूर्ण करावी, म्हणून जसे त्वां त्यांस जीवनाचे नियम शिकविले, तसी हे आमच्या बापा, दयाळू पित्या, आह्मावर कृपा कर; हे दयावंता, आतां आह्मावर कृपा कर, आणि तुझ्या शास्त्रीय विषयांच्या गोष्टी आम्ही आवडीने समजाव्या, लक्षांत घ्याव्या, ऐकाव्या, शिकाव्या, शिकवाव्या, सांभाळाव्या, पूर्ण कराव्या, आणि स्थापित कराव्या, म्हणून तूं आमच्या मनांत बुद्धि दे; आणि तुझ्या शास्त्राकडे आमचे डोळे प्रकाशित कर (उघड); आमचीं मनें तुझ्या आज्ञांकडे लागूं दे. आह्मी कधींच लज्जित होऊं नये, घाबरूं नये, व

गळून पडूं नये; यासाठीं तुझ्या नांवावर आह्मी प्रीति करावी व त्याचें भय धरावें, ह्मणून आमचीं मनें एकचित्त कर; कारण तुझ्या पवित्र, थोर व पराक्रमी नांवावर आह्मी भरंवसा ठेविला आहे. आह्मी तुझ्या तारणाविषयीं आनंद व हर्ष करूं. हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या दयेने व पुष्कळ कृपेने आह्मास सदांसर्वकाळ सोडूं नये. सेलाह. त्वरा करून पृथ्वीच्या चोहीं कोनांकडून आह्मावर आशीर्वाद व शांति येऊं दे; राष्ट्रांचें जोकड आमच्या मानेवरून मोडून टाक. आणि आह्मास आमच्या देशीं त्वकर सुखरूप ने; कारण तारण करणारा देव तूंच आहेस. त्वां आह्मास सर्व लोकांतून व सर्व भाषांच्या राष्ट्रांतून निवडून घेतलें; आणि आह्मी तुझें स्तवन करावें, तुझें एकत्व मानावें, आणि तुझ्या नांवाचें भय धरून त्याजवर प्रीति करावी; ह्मणून हे आमच्या राजा, प्रीतिनें त्वां आह्मास आपल्या थोर नामाजवळ नेलें. हे परमेश्वरा, आपले लोक इस्राएल यांस प्रीतीनें निवडून घेणाऱ्या, तूं धन्य आहेस.

קריאת שמע पृष्ठ ११.

אלהיכם אמת " परमेश्वर तुमचा देव सत्य आहे.

אמת ויציב ही गोष्ट सर्वकाळ आह्मास सत्य, खरी, स्थापित, सिद्ध, सरळ, विश्वसनीय, प्रिय, लाडकी, आवडती, मधुर, भयंकर, उत्कृष्ट, नियमित, स्वीकारणीय, चांगली व सुंदर अशी आहे. जगतांचा देव आमचा राजा, याकोबाचा खडकरूप आश्रय, आमच्या तारणाची ढाल, हें सत्य आहे; पिढीपिढीं तो निश्चल, त्याचें नांवहि निश्चल, त्याचें आसन स्थापित आहे, आणि त्याचें राज्य व सत्य सर्वकाळ राहातें. त्याने ज्या गोष्टी आमच्या पूर्वजांविषयीं, आह्माविषयीं, आमच्या लेंकरांविषयीं, आमच्या पिढीविषयीं, आणि आपला सेवक इस्राएल याच्या बीजाच्या पिढ्यांविषयीं केल्या आहेत त्या सदांसर्वकाळ जीवंत (सिद्ध) स्थापित, सत्य, प्रिय आहेत. पूर्वींच्या व मागल्या (लोकांविषयीं) जें त्याचें ह्मणणें आहे, तें चांगलें सत्य व खरेंपणा यांत स्थापित असून कधीं उलं-

घून न जाणारा असा करार आहे. परमेश्वर आमचा देव व आ-मच्या पूर्वजांचा देव; आमचा राजा व आमच्या पूर्वजांचा राजा; आह्मास खंडून घेणारा व आमच्या पूर्वजांस खंडून घेणारा; आह्मास घडणारा; आणि आमच्या तारणाची ढाल तूं आहेस; हेंहि सत्य आहे. आमचा सोडविणारा व मुक्त करणारा, हें सर्वकाळापासून तुझें नाम आहे, तुजवांचून आह्मास दुसरा कोणी देव नाहीं. सेलाह.

עֶזְרַת אֲבוֹתֵינוּ जो आमच्या पूर्वजांस सर्वकाळापासून सहाकारी, आणि जो त्यांस आणि त्यांच्या मागें पिढोपिढीं त्यांच्या लेंकरांस ढाल व तारक, तो तूंच; जगाच्या वर तुझें वस्तिस्थान आणि तुझा न्याय व तुझी यथार्थता पृथ्वीच्या सीमेपर्यंत आहे. जो पुरुष तुझ्या आज्ञा ऐकितो, आणि तुझें शास्त्र व तुझीं वचनें आपल्या मनांत ठेवितो, तो आशीर्वाद पावतो; हें सत्य आहे. जो आपल्या लोकांचा स्वामी आणि बापांचा व पुत्रांचा वाद (स्वतां) चालविणारा पराक्रमी राजा तो तूंच, हें सत्य आहे. जो पहिला व शेवटला तो तूंच; तुजवांचून आह्मास राजा, उद्धारक व तारक कोणीच नाहीं, हें सत्य आहे. हे परमेश्वरा! आमच्या देवा, त्वां आम्हास मिसरांतून सोडविलेंस; दासत्वाच्या घरांतून आम्हास खंडून काढलेंस; त्यांच्या सर्व ज्येष्ठ पुत्रांस मारून आपले ज्येष्ठ पुत्र इस्राएल यांस सोडविलेंस; त्यासाठीं सूफ समुद्र दुभागलास; गर्विष्ठांस त्यांत बुडवून आपल्या प्रियकरांस समुद्राच्या पार नेलेंस; शत्रूला पाण्यानें झांकिलें; त्यांतून एकहि उरला नाहीं; (असे चमत्कार करणारा) तो तूंच आहेस, हें सत्य आहे. यावरून प्रियकरांनीं देवाची स्तुति करून त्यास थोर मानिलें; आणि आवडत्यांनीं राजा, आणि जीवंत व निश्चल देव याचें कीर्त्तन व गायन केलें, स्तुति केली, सुवंदन केलें व उपकारस्तुति केली. उंच, थोर, मोठा, पराक्रमी, भयंकर, गर्विष्ठांस भूमीएवढें नीच करणारा, पडलेल्यांस आकाशाएवढें उंच करणारा, बंदिवानांस मोकळें करणारा, नम्रांस खंडून घेणारा, गरिबांस सहाय करणारा, आणि आपले लोक इस्राएल यांस काकुळतीच्या वेळेस

उत्तर देणारा(तूंच आहेस.) धन्य व सुवंदित जो थोर देव त्यांचा उद्धारक त्याची स्तुति असो.मौशे व इस्राएलाचे पुत्र यानी मोठ्याने तुला गाऊन सर्वांनी ह्मटलें कीं, हे परमेश्वरा, देवांमध्यें तुजसारिखा कोण? पवित्रतेने महान, स्तविण्याविषयीं भयमान, चमत्कारकर्त्ता तुजसारिखा कोण आहे! जे सोडविले गेले त्यानी समुद्रतीरीं गाऊन तुझ्या मोठ्या नामाची स्तुति केली, त्या सर्वांनी तुझी उपकारस्तुति करून व तुझें राज्य मान्य करून ह्मटलें कीं, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. आणखी असेंहि ह्मटलें आहे कीं, आमचा उद्धारणारा कोण? तर त्याचें नाम सैन्यांचा परमेश्वर, इस्राएलाचा पवित्र आहे. हे परमेश्वरा, इस्राएलांचा उद्धार करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אדני שפתי תפתח पृष्ठ १४.

पाहांटेच्या प्रार्थनेमध्यें (शाहारीथमध्यें) אדני שפתי पहिल्याने हळू बोलून पुनः मोठ्याने बोलल्याअगोदर हें पुढील गीत बोलण्याची चाल आहे.

שמעתי " हे परमेश्वरा, तुझी कीर्ति ऐकून मी भयभीत झालों आहें.

שמעתי " हे परमेश्वरा, तूं मला आपल्या रागाने कदाचित नाहींसें करशील, ह्मणून माझ्या झडतीच्या दिवसाविषयीं ऐकल्यामुळें मी कांपतों, आणि माझ्या न्यायाच्या दिवसामुळें मी भितों व थरथरतों, कारण देवाचा दिवस मोठा आहे. "

מי לא ייּרא " हे परमेश्वरा, न्यायाच्या भयंकर दिवसामुळें कोण भिणार नाहीं! कारण अग्नीसारिख्या स्वच्छ ठिकाणीं तुलाच मात्र मोठेपणा व पराक्रम शोभतो; परमेश्वराशीं स्नेहाने कोण वागेल! "

מלך יושב " हे परमेश्वरा, न्यायासनावर बसणाऱ्या राजा, तुझा सरळपणा कळविण्याकरितां, हे परमेश्वरा, सेराफीम गाद्यांवर भोंवतालें उभे आहेत, कां कीं नेम व न्याय जाणणाऱ्या

सर्व लोकांचा धर्म असा आहे कीं, परमेश्वर (राजा) सरळ आहे असें त्यानी दाखवावें. ”

מלך אדיר ” हे पराक्रमी राजा, मनुष्यांस नीच व उंच करणाऱ्या, ज्या पवित्राच्या वचनाने व जागणाऱ्याच्या * निवाड्याने खडकांचा चुराडा होतो आणि फुटतात, तें परमेश्वराच्या मुखांतून निघतें, त्याकडूनच होतें. ”

לפני חילו ” हे परमेश्वरा, तूं आपल्या सैन्यापुढें मोठ्याने ओरडतोस, मग बळवान मनुष्यांस (सत्वशीलांस) जीवनाचें औषध कसें सांपडतें ? तर बलवान मनुष्यें † नमल्या अगोदर ते उठून ईश्वराकडे फिरल्याने (त्यांस तें सापडतें). ”

לבי ” हे परमेश्वरा, तुझ्या बाणाच्या अग्नीसारिख्या ज्वाळेपासून मी पळतों, आणि उंच मानिलेल्या लोकांवरील तुझ्या भयामुळें मी शोकाने ओरडतों; ईश्वराच्या अति तीव्र दाहाच्या ठिकाणीं टकळ्या कसा चढून जाईल ! ”

ענה עני ” हे परमेश्वरा, तुजपुढें उभा राहिलेला गरीब, जो भिकाऱ्याप्रमाणें तुजपासून क्षमा मागतो, त्यास उत्तर दे; त्याचें मन तूं स्थिर करून आपला कान आजकडे लाव; आणि हे परमेश्वरा, तूं आपलें मुखतेज आह्मावर पडूं दे. ”

נחלי דמעותי ” हे परमेश्वरा, माझ्या अश्रुपातामुळें माझीं आंतडीं उकळतात, आणि परमेश्वर राजापुढें न्यायसभा बसली आहे, आणि त्यापुढें पुस्तकें उघडलीं आहेत, म्हणून माझ्या पापांमुळें माझीं गुर्दकमळें प्रदीप्त होतात. ”

ספרי חיים ” हे परमेश्वरा, जीवंतांचीं व मेलेल्यांचीं पुस्तकें तुजपुढें उघडीं आहेत; आमच्या पूर्वजांवरील तुझ्या दयेप्रमाणें आह्मी (तुजवर) भरंवसा ठेवितों, ह्मणून आमची प्रार्थना

---

* पवित्र व जागणारा याचे इब्रीशब्द अनेक वचनांत आहेत; ते दानिएल ४ अध्यायाच्या १४ व्या ओवींत सांपडतात. त्या वाक्यावर टीका करणाराने त्या उपमा ईश्वरास दिल्ह्या आहेत.

† शरीराचे वळकट अवयव.

शांतिकारक सुवासाप्रमाणें स्थाप, आणि हे परमेश्वरा, तूं आपलें (हस्त) कर्म (या दुःखाच्या) वर्षांत जीवंत राख. "

אתאנו להלות आह्मी तुजपुढें प्रार्थना करायास आलों आहों, कारण कीं, दया व सत्यता तुझ्या दृष्टीपुढें आहेत. आतां आह्मास लज्जित करूं नको, आतां आह्मास तुजसमोरून रिकामे परतवूं नको; आम्हास क्षमा कर आणि आम्हासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אתאנו לבקש हे भयंकरा, अघोर व संकट समयीं संरक्षण करणाऱ्या, आम्ही तुझ्याजवळून क्षमा मागायास आलों आहों; तूं आम्हास जीवंत राख, आम्हावर दया कर आणि तुझें नाम आम्हास ठेविलें जाऊं दे; आम्हास क्षमा कर आणि आम्हासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

कित्येक ठिकाणीं हेंहि बोलतात.

אבוא כעני मी तुझ्या दारीं दरिद्र्यासारिखा मागायास आलों आहें; आणि विनंती व काकळूत करून प्रार्थनेस आरंभ करितों; तर आतां आम्हा करितां तूं दयेचा दरवाजा उघड, आम्हास क्षमा कर, आणि आम्हासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אדני שפתי पुनः मोठ्याने बोलतेवेळीं מי כמוך पर्यंत झाल्यावर हें बोलतात.—

रिब्बी येहूदा हाल्लेवी याणे रचिलेलें.

ईश्वरी पवित्रतेचें वर्णन.

ובכן נקדישך מלך हे राजा ! याप्रमाणें आह्मी तुला पवित्र मानूं. दो. वे.

ליושב תהלות स्तवनामध्यें बसणारा आणि आकाशमंडळांवर स्वारी करणारा (देव) पवित्र व धन्य असो.

שש אפודי שש साहा पंख धारण करणारे* साहा गोष्टींचा† वीट मानणाऱ्या देवास पवित्र ह्मणतात; पृथ्वींतील मुख्य जन§ पृथ्वीच्या शिमा उत्पन्न करणाऱ्यास धन्य ह्मणतात; अग्नीमध्यें चमकणारे (दूत) त्यांस अग्नीपासून घडणाऱ्यास पवित्र म्हणतात; आणि अग्नि व पाणी यांकडून परीक्षित,§ जे प्रतिदिवशीं दोनवेळ त्याचें एकत्व मान्य करितात,§ ते त्यास पवित्र आणि धन्य ह्मणतात. ליושב

גלגלי טהרה शुद्ध गलगालिम दूत कीर्त्तनाच्या वाणीनें स्तवून त्यास धन्य ह्मणतात; पैक्यावांचून खंडून घेतलेले§ एकत्र होऊन पूर्ण मनाने त्यास धन्य ह्मणतात; एक्या पळांत त्वरेनें धावत जाणारे, आणि क्षणांत परत येणारे (दूत) त्यांस पवित्र ह्मणतात; त्याच्या नियमाचा शोध करणारे, आणि त्याजवांचून दुसरा कोणी (देव) नाहीं, असी साक्ष देणारे ‡ त्यास पवित्र व धन्य ह्मणतात. ליושב

המון אראלים देवांमध्यें जो महत्ववान, त्यास आरआलिम दूतांचीं सैन्यें पवित्र ह्मणतात, विश्वासांत जे समर्थ¶ त्यांचे पुत्र तुला नेहेमी गौरवण्याकरितां धन्य ह्मणतात, रोज सकाळीं नवे होणारे (दूत) तुझ्या नांवाला गौरवून पवित्र ह्मणतात, आणि राजांचे पुत्र इस्राएल नमन करून व गुडघे टेंकून तुला पवित्र आणि धन्य ह्मणतात. ליושב

זום כעין קלל ज्यांचें तेज निर्मळ आरस्यासारखें ते (दूत) स्तुतीच्या राजा पुढे पवित्र ह्मणतात, शुद्ध (पूर्वजांचे¶) बीज अत्यंत पराक्रमी (देवास) धन्य ह्मणतात, विंगळ चिरून केलेले दूतांचीं सैन्यें त्यांस पवित्र म्हणतात, बेड्यांतून मुक्त केलेले आणि ज्यांस (देवाने) आपल्या वतनाचा वांटा§ असें म्हटलें आहे, ते त्यास पवित्र व धन्य म्हणतात. ליושב

טבולים בנהר (अग्नीच्या) प्रवाहामध्यें अंघूळ करणारे दूत,

---

* सेराफीम दूत. † टीका८. ‡ इस्राएल.
¶ आब्राहाम, इसहाक व याकोब.

ज्यांचें स्वरूप निळ्या आकाशासारिखें आहे, ते त्यास पवित्र ह्मणतात; कराराच्या * खाचेंत गडदलेले (इस्राएलांचे) उरलेले शेष त्यास धन्य ह्मणतात, सुंदर पंखांचे (दूत) हर्षाने मनन करून गायन करीत त्यास पवित्र ह्मणतात; आणि पृथ्वींतील लोकांमध्यें विलक्षण, † आणि (सर्व) तरण्यांतून निवडलेली (तरणी‡) त्यास पवित्र व धन्य ह्मणते. ליושב

כבירי רומה उंचावरलि पराक्रमी (दूत) आकाशांत वस्ति करणारास पवित्र ह्मणतात; पूर्ण स्तुति करणारे §भयंकर कृत्यें करणारास धन्य म्हणतात; ज्यांस तो भयंकर आहे, ते दूत त्यास आदराने उत्तर देऊन पवित्र म्हणतात; आणि (इस्राएलाच्या) मंडळ्या त्याजकडे येऊन आपल्या वचनाकडून त्याची पवित्रता गाजविण्याकारितां पवित्र व धन्य म्हणतात. ליושב

ובכן ולך תעלה आणि याप्रमाणें तुझी पवित्रता वर्णिली जाईल, कारण तूं आमचा देव आहेस. दो. वे.

אלהים אל מי אמשילך हे देवा, मी तुला कोणाची उपमा देऊं! तुजसीं तुलना करण्यासारिखा तर कोणीच नाहीं. तुला कशासारिखा समजूं! सर्व (पदार्थ) तर तुझ्याच मोहेरेच्या प्रतिमा आहेत. तूं सर्व वहनांपेक्षां उंच आहेस, आणि कल्पना (पोहोंचत नाहीं) एवढा थोर आहेस. कोणाचीं वचनें तुला व्यापूं शकतील! आणि कोणाची जीभ तुझें पूर्ण वर्णन करूं शकेल! तुझा शोध लावणारें मन आणि तुला पाहणारा डोळा आहे काय? कोणाबरोबर त्वां मसलत केली, कीं त्यानें तुला समजाविलें; परंतु तुझ्यापूर्वीं निर्माण झालेला कोणी देव नव्हता. हीं तुझी सृष्टी तुजविषयीं साक्ष देते कीं, तुजवाचून कोणी नाहीं. सर्व (पदार्थांमध्यें) तुझें ज्ञान प्रगट आहे; आणि सर्वांत तुझ्या मोहोरेची खूण ओळखली जाते. पर्वतांचा जन्म झाल्यापूर्वीं, आणि आकाशाचे स्तंभ उभारल्या पूर्वीं; तूं दैवत्वाच्या आसनीं बैसलास तेव्हां डोहो व डोंगराहि नव्हते.

* सुंतेचा करार. † इ एकुलतें ‡ हें इस्राएलास लाक्षणिक नाम दिल्हें आहे

तूं सर्वांस व्यापितोस, परंतु सर्व मिळूनाहि तुला व्यापूं शकत नाहीं, त्वां सर्वांस भरून टाकिलें आहे; परंतु ते तुला ग्रासूं शकत नाहींत. तुझा शोध करितांना मनें स्तब्ध होतात, आणि तुझें वर्णन करितांना जिव्हा थकून जातात. ज्ञान्यांचे विचार थकित होतात; आणि चतुरांच्या कल्पना चकित होतात. तूं स्तविण्याविषयीं भयमान असा ह्मटलेला आहेस; आणि सर्व स्तुतींपेक्षां तूं पुष्कळ थोर मानिलेला आहेस. हे परम समर्थ (देवा), किती आश्चर्यकारक रीतीने तूं गुप्त आहेस! तरी त्वां आकाश व पृथ्वी भरली आहे. तुझें गुप्तपण अति खोल, कोणास सांपडेल ? अति दूर, कोणास दिसेल? तुझ्या कृत्यांचा व तुझ्या सत्तेचा मात्र शोध पवित्रांच्या मंडळीस लागतो; (जगांत) तुझी यथार्थता मात्र गाजविलेली आहे, आणि तुझें शास्त्र मात्र जाणविलेलें आहे. पश्चात्ताप करणारांस तूं फार जवळ आहेस; परंतु वांकडे वर्तणाऱ्यांपासून तूं फार दूर आहेस. शुद्ध आत्मे तुला पाहतात, त्यांस उजेडाची गरज लागत नाहीं. बुद्धिरूप कानाने ते तुझें ऐकतात; कारण (अशा गोष्टी ऐकण्याकरितां) त्यांचे मांससंबंधी कान बहिरे आहेत. पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे, (असें ह्मणून) सतत ते तुझी पवित्रता गाजवितात.

"צבאות" तुझ्या राज्याचें नाम सैन्याचा परमेश्वर असें आहे; आणि तुझ्या दैवत्वाचें नाम एकच देव असें आहे. तुझ्या राज्याचा विस्तार वर्णिला व उच्चारिला जात नाहीं; आणि तुझ्या दैवत्वांत तुजबरोबर कोणी जडूं शकत नाहीं. भयंकर पुढल्या अंगांस आणखी किती पुढलीं अंगें, आणि दिसत्या मागल्या अंगांस आणखी किती मागलीं अंगें आहेत?* साक्षीकरितां व खणेकरितां त्वां रथांचे झेंडे उभारिले आहेस; कीं ही गोष्ट सैन्याच्या परमेश्वराकडून आहे. सर्व तुझे दास तुजपुढें सेवा करणारे आहेत; ते तुझी इच्छा पूर्ण करण्याकरितां सामर्थ्याने बळकट आहेत. ते तुझ्या प्राणिमात्रांस अदृश्य आहेत, परंतु तुझ्या भविष्यवाद्यांच्या (ज्ञानचक्षुंस)

* हे निर्गम अ० ३३. श्लो० २३ या वाक्यावरून रचिलें आहे.

दृश्य आहेत. ते दूर पाठविले जातात व जवळ बोलाविले जातात; परंतु गमन केल्यावांचून (पुढें) धावतात व मागें येतात. त्यांचे मार्ग जसे पवित्र स्थानांत माझ्या देवाचे, माझ्या राजाचे मार्ग तसे, जसा सीनाय डोंगरावरील पवित्र स्थानांत, तसा परमेश्वर त्यामध्यें आहे. निश्चयें, ते तुझ्या हुकमावरून बोलतात, तुझ्याच इच्छेप्रमाणें ते कृत्यें करितात. यावरून त्यांचे शब्द ऐकणारे ह्मणतात कीं, तुझेंच तोंड त्यांसीं भाषण करितें.

ראש הממשלה पहिल्या संस्थानाचा अधिपति व त्याचीं सर्व सैन्यें व आकाशांतील सर्व हत्यारबंदी सैन्य, यांजवर त्याने सर्व काळ प्रकाश ठेविला आहे; यामुळें त्यांच्या राहण्यांत शांति असते. त्यांपासून ज्ञानाचा उगम निघतो; आणि त्यांजवळ जीवनाचा झरा सांपडतो. तेथें अंधार नाहीं व मृत्युछायाहि नाहीं; तेथें कांहींच उणें नाहीं व मृत्युहि नाहीं. आपणास त्यांच्या पवित्रतेकडून पवित्र करण्याकरितां; आणि दावीदाप्रमाणें "अहो परमेश्वराचे दूतानो, तुह्मी त्याला धन्य ह्मणा;"* असें ह्मणायास जो आपणास त्यांमध्यें सकाळीं व संध्याकाळीं मिसळतो तो धन्य.

הממשלה השנית दुसऱ्या संस्थानांत आकाशांतील सैन्य, आणि रथांचे हाय्योथ दूत ज्यांच्या सर्व अंगीं डोळे आहेत ते आहेत. उजव्याकडे व डाव्याकडे राहून ते धांवत जातात व परत येतात, ते सृष्टींत उंचस्थानीं उभे असतात. आणि ओफानिम दूत त्यांच्या समोर उभेराहून तुझ्या शेखीनास † नमन करण्याची उत्कंठतेने आवड धरितात. (त्यांच्या मागून) लक्षावधि सैन्यांच्या सैन्यांचे झेंडे (दिसतात,) त्यांतील सर्व ज्ञानाचीं व पराक्रमाचीं कृत्यें करणारे आहेत. त्यांच्या मागून सूर्य व चंद्र येतात, ते प्रत्येक आपल्या ठिकाणीं आकर्षिलेले असून प्रकाशतात. त्यांजशीं निरनिराळ्या संस्थानांस उजेड देण्यासाठीं नेमलेले तारेहि जडतात. त्यांस आकाशांतील सैन्यें व आकाशांवरील जलेंहि

* हें वाक्य व पुढील दोन भागाच्या शेवटलीं वाक्यें दावीदाने आपले गीतांत लिहिलीं आहेत. गीत १०३ अ.२०, २१, २२ ओं.

† साक्षात्कारास.

लगटून राहतात. त्यांतील प्रत्येक आपापल्या संस्थानाची सेवा करायास व आपापलीं कामें करायास पाहतात. त्यांस कांहींच अडखळा व अडचण पडत नाहीं; आणि त्यांत कोणीच कुटिल व वावगा नाहीं. ते एक प्रत्येकापासून परवानगी मागतात व एक प्रत्येकास परवानगी देतात. परमेश्वर जो अनंत देव, याच्या नांवानें स्तवन करण्यास ते एकदांच गजर करितात. आणि गाणाराही* आपल्या स्तोत्रांत हाक मारून ह्मणतो कीं, अहो परमेश्वराचे सर्व सैन्यानो! तुम्ही त्यास धन्य म्हणा.

הממשלה השלישית तिसरें संस्थान व त्याचें सैन्य पृथ्वी व तिजवरील सर्व (पदार्थ) असीं आहेत. हवेचा व अग्नीचा विस्तार व त्यांपासून उत्पन्न होणारे पदार्थ आणि समुद्र व त्यांत जे सर्व आहेत तेहीं. त्याच्या भांडारांतून अग्नि, गारावृष्टि व बर्फ निघतात, आणि वादळाचा वारा त्याचें वचन पूर्ण करितो. पाण्याचे झरे त्याच्या आज्ञेवरून फुटतात, आणि लेंबानोनांचे फांटे त्याच्या ज्ञानाकडून उघड होतात. हिरवळ बीज देण्यासाठीं, झाडें लावण्यासाठीं, आणि शेतांतील गवत पशूंस तृप्त करण्याकरितां उगवतात. समुद्रांतील मासे व त्यांतील मगर, आणि उडणाऱ्या पक्ष्यांच्या निरनिराळ्या जाति त्यानें वृद्धिंगत होऊं दिल्ह्या. पृथ्वी मेजासारिखी तयार झाल्यावर तिनें ग्रामपशु, वळवळणारे व वनपशु यांस उपजविलें. ते सर्व त्वां आपला अधिकारी मनुष्य, यांच्या हातीं सोपिले, त्वां आपल्या हाताच्या कामावर त्यांस प्रभुत्व दिल्हें. यासाठीं कीं त्याच्या कंबरेंतून राजे, याजकांचें राज्य व दूतांचें सैन्य निघणार. आपल्या पवित्र नामाची उपकारस्तुति करायास त्वां त्यास उत्पन्न केलें; आणि आपल्या स्तवनांत त्यांनी गौरव मानावा ह्मणून त्वां त्यांस जगांत बोलाविलें. त्यांमध्यें तूं पवित्र मानिलेला व सन्मानिलेला आहेस; आणि बाळ व तान्हे यांच्या तोंडांतून त्वां प्रशंसा साधिली आहे. तुझी सेवा करणारे व तुझा कारभार चालविण्याकरितां पाठविलेले, यांच्या तोंडाकडून तुझ्या

* दावीदानें.

राज्याचें नाम सर्वांपेक्षां अधिक उंचाविलें जावो. आणि मधुर गाणारानेही * आपल्या निर्मित्यास असें गायन केलें कीं, "अहो परमेश्वराचे सर्व उत्पन्न केलेले पदार्थहो ! तुह्मी त्यास धन्य ह्मणा."

" ברכו परमेश्वराला त्याच्या सर्व संस्थानांच्या ठिकाणीं तुह्मी धन्य ह्मणा; परमेश्वरासारिखा कोणी पवित्र नाहीं; कां कीं त्याच्या शिवाय कोणी नाहीं. येशूरून † जो मौल्यवान त्यास वावग्यांतून ‡ काढिलें, आणि आपला भविष्यवादी मोशे याच्या हातून त्यास समुद्रांतून काढून पार नेलें. त्याने आपलें गौरव आपल्या पवित्र पादासनावर उतरिलें, आणि आपल्या भविष्यवाद्यास उंच ढगांत चढविलें. भविष्यकथनाचें अमौल्य वतन (आत्मा) त्याने आपल्या ओळखणाऱ्यास दिल्हें, आणि आपला उदार आत्मा आपलीं (वचनें) ऐकणारावर ओतिला. त्याने त्यांस आपल्या भक्तीच्या नेमलेल्या रीतीप्रमाणें चालविलें, कीं त्यांनी पहिल्या संस्थानाची बरोबरी करावी. कारण जसे त्याचे सेवा करणारे दूत, तसे तेहि त्यास पवित्र मानून पवित्र उपकारस्तुति त्यापुढें आणून वाहातात, त्यापुढें त्यांसाठीं प्रायश्चित्त केलें जातें, तेव्हां ते प्रायश्चित्त पावतात; मग ते परमेश्वराची स्तुति गाजवितात. सेराफीम व आरआलिम यांसारिखे तेहि आपणास झांकून घेतात, आणि तारशीशिम व हाशमालिम § यांसारिखेहि ते आहेत. धांवत येऊन व त्वरा करून ते एकवट होतात, आणि तुजबरोबर चालायास ते धैर्य धरितात. भय धारण करून लज्जितहि होतात; यद्यपि तुह्मी सेवा करण्याकरितां ते धैर्य धरून एकवट होतात; त्वरा करितात आणि मुके राहात नाहींत. पवित्राच्या मंडळींत सन्मानिलेल्या देवास सन्मानितात, पवित्र मानितात आणि ती वेळ त्याची पवित्रता गाजवितात.

---

* दाविदाने.

† अनुवाद अ० ३२ ओ० १५ एथें व दुसऱ्या कित्येक जागीं येशूरून हें इस्राएलांस दिल्हें आहे.

‡ इस्राएलांचा पूर्वज आब्राहाम ह्यास मूर्तिपूजकांमधून निवडून घेतला.

§ ह्या दुताच्या जाति आहेत.

נקדישך ונעריצך जसी पवित्र सेराफीमांची मंडळी, जें तुझ्या भविष्यवाद्याच्या हाताकडून लिहिलें आहे कीं, ते एकमेकाला मोठ्याने बोलत ह्मणाले, " पवित्र पवित्र पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे; " याप्रमाणें तीन वेळ तुझी पवित्रता गाजविते, त्याप्रमाणे आह्मी तुला पवित्र मानूं आणि तुझें भय धरूं. त्यांच्या समोर जे असतात, ते स्तुति करून असें ह्मणतात कीं, त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. आणि तुझ्या पवित्र वचनांमध्यें असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे, तुह्मी परमेश्वराला स्तवा.

यानंतर אתה קדוש पासून אוא מחול לעונותינו एथपर्यंत वाचून त्यामागून संध्याकाळच्या प्रार्थनेंत וידוי ह्मणजे पापाविषयीं कबूल होणें याविषयीं जो भाग आहे तो वाचितात; परंतु त्यांतील רבונו של עולם बद्दल हें पुढील बोलतात.

रेब्बनु निसीम बाबेलच्या विद्यालयाचा मुख्य गुरु याने रचिलेलीं पापें कबूल होण्याची रीति.

רבונו של עולם हे जगदीशा ! सर्व गोष्टींच्या आधीं मला तुजकडे परतायास * तोंड, आणि डोकें उंच करायास धैर्य † नाहीं ; कां तर माझे अन्याय माझ्या डोक्यावर आले; ते ओझ्यासारिखे माझ्या शक्तीहून फार झाले आहेत; माझीं उल्लंघनें अगणित वाढलीं आहेत; आणि माझीं पापें अवर्णनीय झालीं आहेत. जीं पापें, जे अपराध व जीं उल्लंघनें म्या तुजविरुद्ध केलीं आहेत, त्यांविषयीं हे परमेश्वरा, माझ्या देवा व माझ्या पूर्वजांच्या देवा, तुजसमोर डोकें लववून, देहाचा बांधा लववून, नम्र आत्म्याने, अशक्तपणें, हृदय फोडून, नमन करितांना, गुढघे टेंकून, लवून आणि नमस्कार करून त्रासाने, धास्तीने, भयाने, कांपतांना, अपधाकून

* या इब्री शब्दाचा अर्थ उत्तर द्यावयास असाहि होतो.

† इ. कपाळ.

आणि दुःखाने कबूल होऊन, हे परमेश्वरा माझ्या देवा, मी ह्मणतों कीं, माझ्या वाईट कृत्यांच्या व माझ्या वांकड्या वाटांच्या व माझ्या नीच कर्मांच्या कांहींशा भागाचेंहि स्पष्टीकरण अशक्य आहे. आणि तीं उघड करून सांगण्यास व त्यांचा विस्तार करण्यास मजमध्यें शक्ति नाहीं; अथवा त्यांस संक्षिप्त रीतीनें सांगायासहि मला सामर्थ्य नाहीं. आणि मी त्यांविषयीं माफी, सुटका व क्षमा मागण्यासारखाहि नाहीं. मी काय? माझें जिणें काय? मी व्यर्थ व शून्य, माती व राख, जंतु व किडा आहें. माझ्या पापांमुळें मला लाज वाटते, आणि माझ्या अपराधांमुळें मी ओशाळा होतों आणि माझ्या उल्लंघनांमुळें मला मान खालीं घालावी लागती. आणि जर मी तीं सविस्तर अथवा संक्षिप्त रीतीनें किंवा स्पष्ट सांगायास लागलों * तर वेळ संपेल, परंतु तीं संपणार नाहींत. आणि तीं पुकरायास माझ्यानें तोंड उघडवत नाहीं; माझा दंड सोसण्यापेक्षां अधिक आहे; कारण माझीं उल्लंघनें अवर्णनीय झालीं आहेत. मला लज्जा वाटती व मी ओशाळा होतों, कारण जसा चोर (घर) फोडतांना सांपडतो तसा मी आहें.

רבונו של עולם हे जगदीशा, जर मी आपलीं पापें सविस्तर आणि स्पष्ट करून, किंवा संक्षिप्त रीतीनें सांगूं लागलों, तर वेळ संपेल; परंतु तीं संपणार नाहींत. त्यांतुन कोणत्यांसाठीं मी सत्तेनें मागूं? कोणत्यांविषयीं कबूल होऊं? आणि कोणत्यांविषयीं मी माफी, सुटका व क्षमा मागूं? सर्वांकरितां किंवा एकाद्याकरितां, गुप्त आहेत त्यांकरितां किंवा प्रगट आहेत त्यांकरितां, पहिल्यांकरितां किंवा मागल्यांकरितां, नव्यांकरितां किंवा जुन्यांकरितां, झांकलेल्यांकरितां किंवा उघड आहेत त्यांकरितां, ज्यांची आठवण आहे त्यांकरितां किंवा ज्यांचा विसर पडला आहे त्यांकरितां? मी स्वतां जाणत आहें कीं, मजमध्यें शास्त्र नाहीं, ईश्वरी आज्ञा सांभाळणेंहि नाहीं; ज्ञान नाहीं व बुद्धिहि नाहीं; यथार्थता

* इ. आलों.

नाहीं व योग्यताहि नाहीं, परोपकार नाहीं व अंतःकरणाचा सरळपणाहि नाहीं. निश्चयें, मी मूर्ख व कांहीं जाणत नाहीं; वेडा व कांहीं समजत नाहीं; घातक व विश्वासू नव्हें; दंडास पात्र व शुद्ध नव्हें; दुष्ट व यथार्थ नव्हें; वाईट व चांगला नव्हें; आणि कोणतेंहि चांगलें कृत्य मी केलें नाहीं.

אבל אשמתי בתורתך निश्चयें, तुझ्या शास्त्राविरुद्ध मी अतिक्रम केले आहेत, तुझ्या आज्ञेविरुद्ध विश्वासघात केला, तुझीं वचनेंहि धिःकारलीं आहेत. म्या चोरी केली आहे, लुटलें, चाहाडी व वाईट भाषणें केलीं, वाईट करविलें, अपराध केले, तुजशीं वांकडाहि वर्तलों, दुष्टाई केली, गर्व केला, शिंदळकी केली, जुलूम केला, लोभ केला, पाप केलें, चुका केल्या, खोटें रचिलें व वाईट योजनाहि केल्या, ठकविलें, भोंदलें, थट्टा केली, थट्टा करविली, भ्रष्ट झालों, तुझे भाषणावर बंडावा केला, तुझ्या आज्ञांचा धिक्कारहि केला, तुजविषयीं अपवाद केला, व्यभिचार केला, फांसांत पाडिलें, माझ्या तोंडच्या भाषणेंकरून पेंचांत पाडलें, तुझ्या मागूनहि वळलों आहें, कुटिलपणानें वर्तलों, दोष केले, उलंघनें केलीं, दुःख दिल्हें, आपली मान ताठर केली, तुझ्या निषेधाचा तिरस्कार केला, आपले मार्गहि नीच केले. दुराचार केले, नासलें, लबाडी केली, ओंगळ केलें, बहकलों, बहकविलें, आणि सर्वप्रकारचीं कुत्सित कर्में केलीं.

ואם אתה דן אותי आणि जर तूं माझ्या कर्मांप्रमाणें माझा न्याय करितोस, तर मला हायहाय, माझ्या जीवालाहि हायहाय. आणि जसें रुपें गाळून स्वच्छ करितात, तसा जर तूं मला शुद्ध करूं पाहतोस; तर मजमधून कांहींच उरणार नाहीं.

יהי רצון מלפניך हे परमेश्वरा, माझ्या देवा व माझ्या पूर्वजांच्या देवा, तूं प्रसन्न होऊन आपल्या सेवकास न्यायांत आणूं नको; कारण तुजपुढें कोणताहि प्राणी यथार्थ ठरूं शकत नाहीं. मी काय? माझें जिणें काय? जसें अग्निपुढें गवत, आणि भट्टीपुढें सुकीं लांकडें तसा, आणि हिणकस रुपें मुशींत गाळलें असतां, सर्व व्यर्थता होऊन कांहीं तत्व नसतें, तसा मी आहें.

בְּמָה אקדם פני हे परमेश्वरा, माझ्या देवा, तुझ्या दृष्टीपुढें वाईट करायास मी अनिवार व बावय्या मुलासारिखा, आणि आपल्या धन्याविरुद्ध बंडावा करणाऱ्या चाकरासारिखा, आणि आपल्या गुरूबरोबर वाद करणाऱ्या शिष्यासारिखा झालों असतां, मी तुजपुढें कसा येऊं ? अथवा तुजपासून काय समाधान मागूं ? जें तूं शुद्ध केलेंस, तें मी अशुद्ध मानिलें; जें तूं अशुद्ध केलेंस तें मी शुद्ध मानिलें; जें तूं मना केलेंस, तें मी चालू केलें; जें तूं चालू केलेंस, तें मी मना केलें; ज्यावर तूं प्रीति केलीस, त्याचा मी द्वेष केला; ज्याचा तूं द्वेष केलास, त्यावर मी प्रीति केली; जें तूं हलकें केलेंस, तें मी मोठें मानिलें; जें तूं मोठें केलेंस, तें मी हलकें मानिलें; जें तूं जवळ राखिलेंस, तें मी दूर केलें; आणि जें तूं दूर राखिलेंस, तें मी जवळ आणिलें; यद्यापि तुला राग आणावा असी माझी इच्छा नव्हती. आणि निर्लज्जपणें* मी तुजसमोर माफी, सुटका आणि क्षमा मागायास आलों आहें. मी धैर्य धरूनां† तुजकडे आलों आहें; आणि मी जाणतों कीं मी लज्जित होणार नाहीं, कारण मी तुजवर भरंवसा ठेविला आहे; आणि ह्मणतों कीं तूंच माझा देव आहेस. आणि तूं दयाळू व कृपाळू, मंदक्रोध व फार ममतेचा आणि पुष्कळ चांगलें करणारा आहेस, ह्मणून मी तुझ्या फार दयेवर भाव ठेविला आहे.

हें पुढील हाज्जानाने एकट्यानें बोलावें.

רבונו של עולם हे जगदीशा, तूं आपल्या मोठ्या व भयंकर नामाकरितां असें कर कीं, जे तुजवर आशा ठेवितात त्यांनी माझ्यामुळें लाजूं नये; आणि जे तुला शोधितात त्यांनी माझ्यामुळें ओशाळें होऊं नये, कारण स्वतःसाठींच मात्र नाहीं, परंतु जी पवित्र मंडळी तुजसमोर उभी आहे, तिजसाठीं-हि मी प्रार्थना करितों, कबूल होतों आणि काकुळती करितों.

---

* इ. धीट कपाळानें.

† इ. मी आपलें तोंड गारेसारिखें केलें आहे.

परंतु जर स्वतःसाठींच कबूल व्हावयास, प्रार्थना करायास, आणि काकुळती करायास मजमध्यें योग्यता, लायकी व पूर्णता नाहीं, तर दुसऱ्यासाठीं माझ्यानें कसी करवेल. तरी जे तुला शरण येतात, तुजपुढें कबूल होतात व आपलीं उलंघनें सोडून त्यांविषयीं पश्चात्ताप करितात, आणि त्यांत लपून राहत नाहींत; त्यांसाठीं राग सोडायाची रीति तुजमध्यें आहे, तुझा क्रोध मंद करण्याचा तुझा नियम आहे, आणि प्राणिमात्रांवर दया कारण्याची तुझी चाल आहे. कारण असें लिहिलें आहे कीं, जो आपलीं पातकें झांकितो तो कल्याण पावणार नाहीं, परंतु जो पाप कबूल होऊन तें सोडितो तो दया पविल.

רבונו של עולם हे जगदीशा, तुझ्या यथार्थ न्यायाची रीति मनुष्यांच्या * न्यायाच्या रीतीप्रमाणें नाहीं. कारण मनुष्यांची वहिवाट असी आहे कीं, जर कोणी आपल्या शेजाऱ्यास पैक्याविषयीं ठकवितो, तर त्यास न्यायांत आणावा; आणि जर तो नाकबूल जातो, तर तो त्या पैक्यापासून मुक्त होतो. जर तो कबूल होतो, तर त्यास तो परत देणें भाग पडतें. परंतु तुझा यथार्थ न्याय असा नाहीं; जर कोणी नाकबूल जातो, तर त्याला हायहाय व त्याच्या जीवालाहि हायहाय; आणि जर तो कबूल होतो, तर त्यावर तूं दया करून त्याचा जीव नरकाच्या दंडापासून सोडवितोस, आणि तुझ्या लोकांच्या पापांची क्षमा होऊन तुझ्या दयेचें सामर्थ्य आज आह्मास कळावें, ह्मणून तुजपुढें आह्मी कबूल होतों.

पुढें हाज्जान–מודים אנחנו לך हें बोलत असतां मंडळीनें हें बोलावें.

מודים דרבנן सदांसर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव, सर्व मांसमयांचा देव, आमचा व प्रारंभीं (प्र-

---

* इ. मांस व रक्तमयांच्या.

श्वीचा) घडणारा जो तूं, तुलाच आह्मी स्तवितों. त्वां आह्मास जीवंत राखिलें व आह्मास रक्षिलें, ह्मणून आह्मी तुझ्या मोठ्या व पवित्र नामास धन्य ह्मणतों व त्याचें स्तवन करितों. आणि आह्मी तुझे नियम पाळावे, तुझी इच्छा पूर्ण करावी, आणि पूर्ण मनानें तुझी सेवा करावी, ह्मणून (आह्मी विनंती करितों कीं) त्याचप्रमाणें आह्मास जीवंत राख, आह्मावर दया कर, आणि आपल्या मंदिरीं आमच्या पाडाव करून नेलेल्यांस एकवट कर; कीं यावरून, हे सुवंदित व धन्य देवा, आह्मी तुझी स्तुति करावी.

मग ויהללו ויברכו यामागून हें बोलावें.

אוא ברכנו בברכה हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, जो तिप्पट आशीर्वाद तुझा सेवक मोशे याच्या हातांकडून शास्त्रांत लिहिला आहे, आणि जो आहारोन व त्याचे पुत्र उच्चारीत असत कीं, "परमेश्वरानें तुला आशीर्वाद देऊन तुझें रक्षण करावें. परमेश्वरानें आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडून तुजवर कृपा करावी. परमेश्वरानें आपली दृष्टि तुजवर लावून तुझें कल्याण करावें. तसें त्यांनी माझें नाम इस्राएलाच्या संतानावर लावावें, ह्मणजे मी त्यास आशीर्वाद देईन;" तो आशीर्वाद तूं आह्मास दे.

שים שלום पृष्ठ २०.

ואתם הדבקים आणि जे तुह्मी तुमचा परमेश्वर देव याला लगटून राहिलां, ते तुह्मी सर्व आजपर्यंत जीवंत आहां, (असें आह्माविषयीं ह्मटलें आहे त्याप्रमाणें;) आज तूं आह्मास सदृढ कर, आज आह्मास आशीर्वाद दे, आज आह्मास मोठें कर, आज आमचा झेंडा उभार, आज आह्मास गौरवयुक्त कर, आज आह्मास चांगल्या मंडळीमध्यें मिळीव, आज आम्हास शुद्ध कर, आज आम्हास जीवदान दे, आज आम्हावर दया कर, आज आम्हास आमच्या पापापासून शुद्ध कर, आज आमचे मार्ग नीटाव,

आज आम्हास कीर्तीने मुगुटमंडित कर, आज आम्हास ज्ञानी कर, आज आम्हास सोडीव, आज आम्हास उंचाव, आज आमचें सहाय कर, आज आम्हास सुशोभित कर, आज जीवनाकरितां आम्हास दर्शन दे, आज आम्हास यथार्थ कर, आज आम्हास तुझी सेवा करण्याकरितां जवळ घे, आज आम्हावर दया कर, आज आमची प्रार्थना ऐक, (आज आम्हावर दया, कृपा व ममता कर,) आज आम्हास चांगल्या जीवनाकरितां लिही.

ובספר חיים आणि आम्ही व तुझे सर्व इस्राएल लोक हे चांगल्या जीवनाकरितां व कल्याणाकरितां, जीवनाच्या, आशीर्वादाच्या, कल्याणाच्या, चांगल्या अन्नसामग्रीच्या, तारणाच्या, समाधानाच्या व चांगल्या निवाड्याच्या पुस्तकांत तुजपुढें आठवण होऊन लिहिले जावोत.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त अशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אבינו מלכנו हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुजवांचून आह्मास कोणी राजा नाहीं.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या नामाकरितां आह्मावर उपकार कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर चांगल्या वर्षास आरंभ कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावरून सर्व कठोर व वाईट निवाडे रद्द कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या द्वेषणाऱ्यांचे विचार रद्द कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या शत्रूंच्या मसलती मोड.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या शत्रूस व आह्मावर बलात्कार करणारांस नाहींसे कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या कराराच्या लेंकरांवरून पटकी, तरवार, वाईट, दुष्काळ, पाडावपण, लुटणें, नाश आणि मरी नाहींसी कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या लोकांच्या रोगांसाठीं पूर्ण आरोग्यता पाठीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या वतनावरून मरी बंद कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हीं माती आहों अशी आठवण राख.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमचे सर्व अपराध क्षमा व माफ कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या न्यायाचा वाईट निवाडा फाडून टाक.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या पुष्कळ दयेनें आमच्या ऋणाचे रोखे खोडून टाक.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमचीं उलंघनें तुझ्या पुढून पुसून टाक व दूर कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मास नीतिमानांच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास यथार्थीच्या व सरळांच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मास क्षमेच्या, माफीच्या व प्रायश्चित्ताच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मास चांगल्या उपजीविनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास मुक्ततेच्या व तारणाच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या समोर आमची चांगली आठवण कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्माकरितां तारण लवकरच उगीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझे लोक इस्राएल यांचें शिंग उभार.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या अभिषिक्ताचें शिंगहि उभार.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, पूर्ण पश्चात्तापानें आह्मास फिरीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमची वाणी ऐक आणि आह्मावर दया व कृपा कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, जर आह्माकरितां नाहीं तर तूं आपणाकरितां तसें कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, दयेनें व प्रसन्नतेनें आमची प्रार्थना मान्य कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुजपुढून आम्हास रिकामें परतवूं नको.

קדיש לעילא पृष्ठ ९.

סליחות पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना.

למענך אלהי हे माझ्या देवा, जे लोक पाहांटेस उठून तुजपुढें विनंती करण्याकरितां तुला शोधितात, त्यांस तूं आपणाकरितां, प्रसन्न हो.

אדני הקשיבה हे प्रभू, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको.

हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां विखरण्याच्या व पाडावपणाच्या देशांत * विष व कडू दवणा यांनी धालेल्यांस समुद्राच्या खोलवटीं तून काढ, त्यांचे क्लेश व दुःखें पाहा, त्यांचें फितूर होणें मनावर धरूं नको, आणि पाहांटेची प्रार्थना करितांना त्यांची विनंती कान देऊन ऐक.

हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां त्यांचें चांगलें होण्याची खूण कर, खेद पावलेले जीव जे तारणमय पाण्याकरितां तान्हेले आहेत त्यांजवर दया कर, घालविलेले लोक जे, पृथ्वीच्या सर्व कोनीं विखरलेले आहेत, आणि अतिशय कष्टामुळें ज्यांचें कातडें काळें झालें आहे, त्यांस एकवट कर.

हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां आपल्या दयेला द्रव येऊं दे, आणि आकाशांतील आपल्या वसतिस्थानांतून जे तुझा राग, क्रोध व धिःकार वाहातात आणि तुझ्या त्रासामुळें ज्यांचें मन फार धडधडतें, त्या तुझ्या लोकांची वाणी ऐक.

हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां आपल्या दरिद्र्यांवर दया कर, त्यांचीं दुःखें पालटून हर्ष कर, आणि त्यांस आपल्या विचाराप्रमाणें चालीव, आपली आश्चर्यवंत दया त्यांस दाखीव, आणि मी विनंती करितों कीं, ज्यांस तूं उदरापासून पाहांटेच्या उदरापासूनहि संभाळलेंस † त्यांजवर दया व कृपा कर.

यापुढें संध्याकाळच्या प्रार्थनेंत लिहिल्याप्रमाणें पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना करावी.

קדיש תתקבל पृष्ठ ९८.

אתה הראת परमेश्वर तोच देव, त्याखेरीज दुसरा कोणी देव नाहीं, असें तुम्ही जाणावें म्हणून हें सर्व तुम्हास दाखवून दिल्हें आहे. हे प्रभु, देवांमध्यें तुझ्यासारिखा कोणी नाहीं, आणि तुझ्या कृत्यांसारिखें कांहीं काम नाहीं.

יהי ,, ,, आमचा देव परमेश्वर आमच्या वडिलांस जसा

* इ. घरांत. † इ. वाहिलेंस.

अनुकूळ होता, तसा आम्हास अनुकूळ व्हावा; त्याने आम्हास टाकूं नये, आम्हास सोडूंच नये. तूं आपल्या लोकांस तार, आणि आपल्या वतनाला आशीर्वाद दे; त्यांचा मेंढपाळ असा हो, आणि त्यांस सर्वकाळ वाहा. आणि कोश निघाला तेव्हां असें होत असे कीं, मोशे म्हणे, हे परमेश्वरा, ऊठ; म्हणजे तुझ्या शत्रूंची दाणादाण होवो, आणि तुझे द्वेषी तुझ्या पुढून पळोत. हे परमेश्वरा, तूं आपल्या सामर्थ्याच्या कोशासुद्धां आपल्या विसांव्यासाठीं ऊठ. तुझ्या याजकांनीं नीतिमत्व पांघरावें, आणि तुझ्या भक्तांनी हर्ष शब्द करावा. तूं आपला सेवक दावीद यामुळें, आपल्या अभिषिकाचें तोंड विन्मुख करूं नको.

ברוך המקום ज्या सुवंदित सर्वव्यापकाने * आपल्या इस्राएल लोकांस शास्त्र दिल्हें, तो धन्य. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य. तुह्मी माझ्या संगतीं परमेश्वराला थोर माना; आह्मी एकत्र त्याचें नाम उंचावूं.

" רוממו परमेश्वर आमचा देव याला तुह्मी उंच माना, आणि त्याच्या पायांच्या आसनाजवळ भजा; तो पवित्र आहे. परमेश्वर आमचा देव, याला तुह्मी उंच माना; आणि त्याच्या पवित्र डोंगरावर भजा; कां तर परमेश्वर आमचा देव पवित्र आहे. परमेश्वरासारिखा कोणी पवित्र नाहीं, तुझ्याशिवाय कोणी नाहीं, आमच्या देवासारिखा खडकरूप असा कोणी नाहीं. कां तर परमेश्वराखेरीज देव कोण आहे? आणि आमच्या देवावांचून कोण खडकरूप आश्रय आहे? मोशाने आज्ञा करून आह्मास शास्त्र दिलें; हेंच याकोबाच्या समुदायाचें वतन आहे. जे तें धरितात, त्यांला तें जीवनाचें झाड आहे, आणि जे बाळगतात, ते प्रत्येक धन्य आहेत. त्याचे मार्ग

---

* המקום या इब्री शब्दाचा मूळ अर्थ जागा असा होतो, परंतु हाखामांम लोकांच्या ग्रंथांत या शब्दाचा उपयोग सर्व व्यापक देव या अर्थानें पुष्कळ ठिकाणीं केलेला आढळतो.

आनंदाचे मार्ग, आणि त्याच्या सर्व वाटा कुशल आहेत. जे तुझ्या शास्त्रावर प्रीति करितात, त्यांचें फार कल्याण आहे; आणि त्यांस कांहीं अडखळा नाहीं. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देतो; परमेश्वर आपल्या लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देतो.

בריך שמיה जगताच्या स्वामीचें नाम धन्य असो. हे परमेश्वरा, तुझें राहण्याचें व वस्ती करण्याचें स्थानाहि धन्य असो; तुझी प्रसन्नता तुझे लोक इस्राएल यांबरोबर सर्वदा असो. आणि तुझ्या उजव्या हाताचें तारण तुझ्या लोकांस तुझ्या पवित्र मंदिरांत दाखीव, कीं त्वां आपल्या उत्तम उजेडाकडून आम्हास तिकडे पोहोंचवावें; आणि दयेनें आमची प्रार्थना मान्य करावी. आमचें आयुष्य चांगल्या प्रकारें वाढावें असी तुजपुढें प्रसन्नता होवो. आणि तुझा सेवक जो मी, मला तूं न्यायी लोकांमध्यें गणून मला, जें माझें असेल त्याला, आणि तुझे लोक इस्राएल यांचें जें असेल त्याला तूं सांभाळ. तूं सर्वांचें पोषण व पाळण करितोस; तूंच सर्वांवर अधिकार करितोस; तूं राजांवरहि अधिकार करितोस; राज्य हें तुझेंच आहे. पवित्र जो धन्य, त्याचा सेवक मी आहें; त्याच्या गौरवयुक्त शास्त्रापुढें नमन करितांना मी त्याच्या पुढें नमन करितों. मनुष्यावर मी भरंवसा ठेवीत नाहीं, आणि देवाच्या पुत्रांवरहि* मी आशा ठेवीत नाहीं, परंतु जो आकाशाचा देव, जो सत्य देव आहे, ज्याचें शास्त्र सत्य, ज्याचे भविष्यवादीहि सत्य, ज्याचीं चांगलीं व सत्कर्में पुष्कळ आहेत, त्याजवरच मी भरंवसा ठेवितों; आणि त्याच्या पवित्र नामाची मी स्तुति करितों. हे प्रभु! त्वां आपल्या शास्त्राकडे माझें मन लावावें; आमचें चांगलें व्हावें; आम्हास जीवन प्राप्त व्हावें; आणि आमचें कल्याण व्हावें. अशा माझ्या मनांतील व तुझे लोक सर्व इस्राएल यांच्या मनांतील इच्छा पूर्ण कर. तथास्तु.

---

* दुतांवर.

ישמחו השמים आकाशानीं संतोष करावा, पृथ्वीनेंहि हर्ष करावा, आणि परमेश्वर राज्य करितो असें राष्ट्रांमध्यें सांगितलें जावें. सियोन डोंगराने आनंद करावा; तुझ्या न्यायामुळें यहूदाच्या कन्यांनीं हर्षावें. राजांचा राजा, पवित्र जो धन्य राजा, याने जीं जगतें उत्पन्न केलीं आहेत; ह्मणजे हें जग व पुढील जग, यांमध्यें त्याच्या इच्छेप्रमाणें, त्याच्या भिणाऱ्यांच्या इच्छेप्रमाणें आणि त्याचे लोक इस्राएलाचें घराणें यांच्या इच्छेप्रमाणें, त्याचें नाम सर्वांपेक्षां मोठें, पवित्र, धन्य, उंच व थोर मानिलें जावो. तो आपलें राज्य आह्मावर लवकर प्रगट करून आह्मास दाखवो; आणि आमच्या निभावलेल्यांवर व त्याचे लोक इस्राएलाचें घराणें याच्या निभावलेल्या वर दयेंकरून ममतेंकरून व कृपेंकरून तो दया, करुणा व कृपा करो. आणि सर्व लोकहो, तुह्मी तथास्तु ह्मणा. जो दयाळ तो आमचें पाडावपण आणि त्याचे लोक इस्राएलाचें घराणें यांचें पाडावपण लवकर आमच्याच दिवसांत परतवो. आणि आह्मास दुःखांतून काढून सुखांत, आणि अंधारांतून काढून प्रकाशांत नेवो आणि सर्व लोकहो, तुम्ही तथास्तु म्हणा. कारण कीं मी परमेश्वराचें नाम गाजवीन; तुम्ही आमच्या देवाला थोर मानून द्या. देवाला पराक्रमाचा मान द्या, आणि शास्त्राला मान द्या.

शास्त्र उचलून दाखवितांना मंडळी हें ह्मणते.

וזאת התורה तर जें शास्त्र मोशाने इस्राएलाच्या संतानास सांगून ठेविलें तें हेंच. मोशाने आज्ञा करून आम्हास शास्त्र दिल्हें; हेंच याकोबाच्या समुदायाचें वतन आहे. כהן קרב וכהן हे आचार्या, ये, आणि आपलीं क्रिया कर्में कर. परमेश्वराचें नेमशास्त्र पूर्ण आहे, जिवाला ठिकाणीं आणितें; परमेश्वराचा प्रमाणनेम खरा आहे, भोळ्याला ज्ञानी करितो. परमेश्वराचीं बंधारणें नीट आहेत, हृदयाला आनंदवितात; परमेश्वराची आज्ञा निर्मळ आहे, डोळ्यांस उजेड करिती.

האל תמים דרכו देवाचा मार्ग नीट आहे,

परमेश्वराचें वचन पवित्र आहे, जे सर्व ह्याचा आश्रय धरितात त्यांस तो ढालरूप आहे.

ज्यास शास्त्र वाचायास बोलावितात तो शास्त्र वाचल्यापूर्वी हें बोलतो.

עִמָּכֶם " उठणारा.–परमेश्वर तुम्हाबरोबर असो.

" יְבָרֶכְךָ मंडळी.–परमेश्वर तुला आशीर्वाद देवो.

" בָּרְכוּ אֶת उठणारा.– सुवंदित परमेश्वराला तुम्ही धन्य म्हणा.

" בָּרוּךְ मंडळी. — सुवंदित परमेश्वर सदासर्वकाळ धन्य असो.

" בָּרוּךְ उठणारा. — सुवंदित परमेश्वर सदासर्वकाळ धन्य असो.

" בָּרוּךְ אַתָּה हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास सर्व लोकांतून निवडून घेऊन आपलें नेमशास्त्र आम्हास देणारा जो, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा, शास्त्र देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

शास्त्र वाचल्यानंतर उठणारा हें बोलतो.

" בָּרוּךְ אַתָּה हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास सत्य शास्त्र देणारा आणि आम्हामध्यें सर्वकाळचें जीवन लावून ठेवणारा जो, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा, शास्त्र देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

प्रायश्चित्ताच्या दिवशीं पाहांटेच्या प्रार्थनेंत लेवीय अध्याय १६ आणि या दिवसाच्या आठवणीकरितां गणना अ. २९ ओ. ७ पासून ११ पर्यंत, आणि हाफतारा * ह्मणजे भविष्यकथनांतील भाग यशाया अ. ५७. ओ. १४ पासून अ. ५८ शेवटपर्यंत वाचितात.

भविष्यकथनांतील भाग वाचल्यापूर्वी हें बोलतात.

" בָּרוּךְ אַתָּה हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, (आपणाकरितां) चांगले भविष्यवादी निवडून

* व. प्र. प्रा. टीका ७.

घेऊन त्यांनी ह्मटलेल्या सत्य गोष्टींस प्रसन्न असणारा जो, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, शास्त्र, आपला सेवक मोशे, आपले लोक इस्राएल, आणि सत्य व यथार्थ भविष्यवादी यांस निवडून घेणाऱ्या, तूं धन्य आहेस.

भविष्यकथनांतील भाग वाचल्यानंतर हें बोलतात.

" גואלנו " आमचा उद्धारणारा कोण ! तर त्याचें नाम सैन्याचा परमेश्वर, इस्राएलाचा पवित्र आहे.

" ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, सर्व जगतांच्या खडकरूप आश्रया, सर्व पिढ्यांत न्यायी असणाऱ्या, ज्याचे शब्द सत्य व न्यायी असा विश्वसनीय देव, ह्मणणारा व त्याप्रमाणें करणारा, बोलणारा व तें सिद्ध करणारा; सत्य जो, तूं धन्य आहेस. परमेश्वर आमचा देव जो विश्वसनीय तो तूंच; तुझीं वचनेंहि विश्वसनीय; तुझ्या वचनांतून एकहि शब्द माघारें रिकामा परतत नाहीं; कारण तूं विश्वसनीय व दयाळू देव राजा आहेस. हे परमेश्वरा, आपल्या सर्व वचनांत विश्वसनीय असणाऱ्या देवा, तूं धन्य आहेस.

רחם על ציון सियोनेवर तूं दया कर, कारण तें आमचें जिवनाचें घर; आणि लवकर आमच्या दिवसांत खिन्न झालेल्या जीवांस तूं तार. हे परमेश्वरा ! सियोनेस तिच्या लेंकरांत हर्षित करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

שמחנו יי אלהינו हे परमेश्वरा ! आमच्या देवा, तुझा सेवक येलीया भविष्यवाद्याचें आणि तुझा अभिषिक्त दावीद याच्या घराण्याच्या राज्याचें येणें होऊन आह्मास आनंदित व आमच्या मनांस हर्षित कर. त्याच्या आसनावर दुसऱ्यानें बसूं नये, आणि परक्यानें आणखी त्याच्या गौरवाचें वतन पावूं नये; कारण कीं, तूं त्याचा दिवा सदांसर्वकाळ विझविणार नाहींस, असी तूं त्याजवळ आपल्या पवित्र नामानें शपथ वाहिली आहेस,

हे परमेश्वरा ! दावीदाच्या ढालरूप आश्रया, तूं धन्य आहेस.

על התורה शास्त्र, भक्ति, भविष्यवादी (शा. अ— हा शाब्बाथ दिवस, व) हा प्रायश्चित्ताचा दिवस, हा अपराधाच्या क्षमेचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा दिवस, जो हे परमेश्वरा, आमच्या देवा, त्वां आह्मास (शा० अ० पवित्रतेकरितां, विश्रांतिकरितां व) क्षमा माफी व सुटका होण्याकरितां, आणि त्या दिवसीं आमच्या सर्व अपराधांची क्षमा होण्याकरितां दिल्हा आहे; त्यापेक्षां व सर्व गोष्टींपेक्षां आह्मी तुला अधिक मानितों आणि धन्य ह्मणतों. सर्व प्राण्याच्या तोंडाकडून नित्य व सर्वकाळ तुझें नाम सुवंदित असो. आणि हे आमच्या राजा, तुझीं वचनें सर्वकाळ सत्य व स्थापित आहेत. हे परमेश्वरा राजा, आमचे अपराध व आपले लोक इस्राएल यांचे अपराध माफ व क्षमा करणाऱ्या, आणि वर्षोवर्षीं आमचे अतिक्रम दूर करणाऱ्या, सर्व पृथ्वीच्या राजा, (शा. अ. शाब्बाथास व) इस्राएलास व प्रायश्चित्ताच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

राजास आशीर्वाद पृ. प्र. प्रा. पृष्ठ ९२.
मंडळीस आशीर्वाद पृ. प्र. प्रा. पृष्ठ ९३.

" יהי חסדך हे परमेश्वरा! जसी आह्मी तुजवर आशा ठेविली आहे, तसी तुझी दया आह्मावर होवो. जे तुझ्या घरात राहतात, ते धन्य; ते नेहमी तुझा उत्सव करितील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५.

शाब्बाथ असल्यास एथून बोलावें.

" ברוך परमेश्वराची स्तुति असो, कांतर जें जें त्याने सांगितलें, त्या सर्वांप्रमाणें आपल्या इस्राएल लोकांस विसांवा दिल्हा; त्याने आपला सेवक मोशे याकडून जें जें सांगितलें त्याच्या त्या सर्व चांगल्या वचनांतली एकाहि गोष्ट पडून गेली नाहीं.

इतर दिवस असल्यास एथून बोलावें.

יְהִי יי אֱלֹהֵינוּ आमचा देव परमेश्वर आमच्या वडिलांस जसा अनुकूल होता, तसा आह्मास अनुकूळ व्हावा; त्याने आह्मास टाकूं नये, आह्मास सोडूंच नये. ह्मणजे त्याच्या सर्व मार्गांत चालायास आणि त्याच्या आज्ञा व त्याच्या नेमणुकी व त्याचे न्याय, जे त्याने आमच्या वडिलांस आज्ञा करून लाविले, ते पाळायास त्याने आपल्याकडे आमचें अंतःकरण वळवावें. आणि ज्या शब्दांकडून म्या परमेश्वरापुढें विनंती केली, ते रात्रंदिवस आमचा देव परमेश्वर याच्या जवळ व्हावे; ह्मणजे त्याने आपल्या सेवकाचा न्याय व आपल्या इस्राएल लोकांचा न्याय दिवसादिवसाच्या प्रसंगाप्रमाणें करावा; यासाठीं कीं, पृथ्वीच्या सर्व लोकांनी जाणावें कीं, परमेश्वर तोच देव, त्यावांचून कोणी देव नाहीं. त्या शास्त्राच्या लेखाने तुझें तोंड न सोडावें; तर दिवस व रात्रीं त्वां त्याचें मनन करावें; यासाठीं कीं त्यांत जें लिहिलेलें त्या सर्वांप्रमाणें त्वां सांभाळून चालावें; कारण कीं तशाने तूं आपला मार्ग सफल करिशील, आणि तेव्हां सुज्ञपणाने वागसील. म्या तुला आज्ञा दिल्ही कीं नाहीं? तूं धीर धरून धीट हो; घाबरूं नको, आणि भिऊं नको; कारण कीं जेथें कोठें तूं जासील, तेथें तेथें तुझा देव परमेश्वर तुला अनुकूळ होईल.

हें पुढील वाक्य हाज्जान उंच स्वराने दो. वे. बोलतो.

יִמְלֹךְ יי לְעוֹלָם परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढीपिढीं आहे. तुह्मी परमेश्वराला स्तवा. दो. वे.

शास्त्र ठेवायास नेतांना २९ वें गीत बोलतात.

שְׂאוּ שְׁעָרִים अहो दरवाजे, तुह्मी आपले शिरोभाग ऊंच करा; सर्वकाळाचीं दारें हो, तुह्मी उंचविलीं जा; मग गौरवाचा राजा आंत जाईल, हा गौरवाचा राजा कोण? बळवान व पराक्रमी परमेश्वर, युद्धांत पराक्रमी परमेश्वर तो. अहो दरवाजे, आपले शिरोभाग उंच करा; सर्वकाळचीं दारेंहो, तुम्हीं उंच व्हा; मग गौरवाचा राजा आंत जाईल. जो गौरवाचा

राजा हा कोण ? सैन्याचा परमेश्वर, तो गौरवाचा राजा आहे. सेलाह. तर तूं हें जाण कीं परमेश्वर जो तुझा देव तोच देव; तो विश्वसनीय देव; जे त्यावर प्रीति करितात, व त्याच्या आज्ञा पाळितात, त्यांजवळ तो हजाराव्या पिढीपर्यंत करार पाळून त्यांवर दया करितो. कारण कीं तुमचा देव परमेश्वर कृपाळू देव आहे; तो तुम्हास सोडणार नाहीं, आणि तुम्हाला नाहींसे करणार नाहीं; आणि त्याने तुमच्या पूर्वजांसीं जो करार शपथ वाहून केला त्याला तो विसरणार नाहीं. कां कीं, परमेश्वर म्हणतो कीं, याकोबासाठीं हर्षाने गायन करा, आणि राष्ट्रांतल्या मुख्यांमध्यें गजर करा; वदा आणि ह्मणा, हे परमेश्वरा, तूं आपल्या लोकांस इस्राएलाच्या शेषास तार.

हेखालाच्या दरवाजापुढें हें बोलतात.

" יהללו את שם " (सर्व पदार्थ) यानी परमेश्वराच्या नांवाला स्तवावें; कारण कीं केवळ त्याचेंच नांव उंच मानायाचें; त्याचें गौरव पृथ्वीवरतीं व आकाशावरतीं आहे. आणि तो आपल्या लोकांचें शिंग उभारितो; त्याचे सर्व भक्त, त्याच्या जवळचे लोक इस्राएलसंतानें यानी स्तवन करावें.तुह्मी परमेश्वराला स्तवा.वर आकाशांत आणि खालीं पृथ्वीवर परमेश्वर तोच देव; परमेश्वर तोच देव; दुसरा नाहीं. हे प्रभु, देवांमध्यें तुझ्यासारिखा कोणी नाहीं. आणि तुझ्या कृत्यांसारिखें कांहीं काम नाहीं.

हेखालांत शास्त्र ठेवतांना हें बोलतात.

שובה למעונך (हे देवा,) तूं आपले वसतिस्थानाकडे फीर, आणि तुझ्या इष्टमंदिरांत राहणें कर; कारण कीं सर्व तोंडें व सर्व जिभा तुझें गौरव करितील, आणि तुझ्या राज्याचें महत्वाहि करितील. आणि तो उतरतेवेळेस तो ह्मणे, हे परमेश्वरा, इस्राएलाच्या हजारांच्या अयुतांकडे फीर. हे परमेश्वरा ! आह्माला तुजकडे फिरिव, ह्मणजे आह्मी फिरूं, पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

תם ונשלם שבח לאל בורא עולם

पृथ्वी उत्पन्नकर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

भाग पहिला.

टीका.

टीका १.

ईश्वराने मोश्यास सीनाय पर्वतावर दिल्हेलें उत्तर आणि कळविलेलें शुभवर्तमान.

मोशे सीनाय पर्वतावर शास्त्र आणायास गेला होता, तेव्हां त्यास फार दिवस झाल्यावरून इस्राएल लोकांनी ओतीव वासरूं केलें. हें ईश्वराने मोशेला तो पर्वतावर असतांच सांगितलें; आणि या पापाकरितां त्यांचा समूळ नाश करणार असें दर्शविलें. हें पाहून मोश्याने त्यांसाठीं प्रार्थना करून क्षमा मागितली व ती ईश्वराने मान्य केली. निर्गम अ० ३२. यापूर्वी मोशे इथरोच्या घरीं असतां जेव्हां तो होरेब डोंगरावर शेरडें राखीत होता, तेव्हां ईश्वराने त्यास दर्शन देऊन इस्राएलांच्या मुक्ततेचें शुभवर्तमान कळवून त्यास इस्राएलांस सोडवायास जाण्याविषयीं आज्ञा केली. होरेब व सीनाय हे एकच. होरेब हें त्या सर्व पर्वतांचें नाव असून सीनाय हा त्याचा एक शिखर आहे. हें निर्गम अ० ३. ओ० १२ यावरून उघड दिसून येतें.

टीका २.

अपांक्त करण्याचे प्रकार.

अपांक्त करण्याचे दोन प्रकार आहेत; एक— נִדּוּי व दुसरा חֵרֶם यांतील पहिला प्रकार कांहींसा हलका आहे. ज्यास हें शासन होतें त्याने आपली बायको व मुलें यांशिवाय दुसऱ्या कोणाजवळहि जाऊं नये. इतरांजवळ जाण्याचें प्रयोजन असल्यास

त्याने चार हातांच्या अंतरावर राहावें. त्यास आमंत्रण होत नाहीं, आणि ज्या कामाकरितां दाहा मनुष्यें असावीं, त्यांमध्यें तो त्यांबरोबर गणला जात नाहीं. परंतु त्यास शास्त्र वाचायास व ऐकायास, मजुरी करण्यास व मजुरीस लावायास मोकळीक असते. परंतु दुसऱ्या प्रकारचें शासन ज्यास होतें, त्यास पहिल्या प्रकाराचेंहि शासन भोगावें लागून, मजुरी करण्यास, करविण्यास आणि शास्त्र ऐकण्यास मोकळीक नसती. त्यास शास्त्राचा विसर पडूं नये म्हणून स्वतां त्यास मात्र शास्त्र वाचण्याची मोकळीक असते. न्यायसभेनें जर त्याबरोबर भाषण करण्याचाहि मनाई केली असेल, तर तेंहीं करूं नये. मनाई नसल्यास अगत्य पडेल तेवढेंच मात्र त्याबरोबर बोलावें. आणि जसी त्याची वहिवाट बंद होऊन धर्मसंबंधी क्रिया कर्में करण्यास त्यास मनाई असते, त्याप्रमाणें त्याच्या कुटुंबासहि मनाई असते.

या दोन प्रकारांशिवाय שמתא म्हणून आणखी एक प्रकार आहे. कित्येक म्हणतात कीं हा प्रकार मागील दोहोंपेक्षां कठीण असून ज्यास हें शासन करायाचें त्याजवर शास्त्रांतील सर्व श्राप वाचून शोफार वाजवून ही गोष्ट सर्वांस कळविली जाते. परंतु अलिकडे असें शासन कोणास होत नाहीं; म्हणून कोणी असें म्हणतात कीं חרם आणि שמתא हें एकच. याविषयींचे सर्व नियम शुलहानआरूख या ग्रंथाच्या योरेदेआ या भागांत सांपडतात.

टीका ३.

कोनाम, कोनाह व कोनास.

हे कालदी शब्द आहेत. तेथें स्पष्ट सांगितलेले नवस व शपथी यांशिवाय दुसरे कोणत्याहि प्रकारचे नवस व शपथी असल्यास त्याहि रद्द व्हाव्या, असें दर्शविण्याकरितां उच्चारांत कांहींसा भेद ठेवून या शब्दांचा तेथें उपयोग केला आहे. गेमारा. नेदारीम. अ० १. आणि हारामबाम हालाखोथ नेदारीम अ० १.

टीका ४.

चढतें व उतरतें अर्पण.

चढतें व उतरतें अर्पण, ह्मणजे शक्तीप्रमाणें वाहाण्याचें अर्पण. जसें अविचाराने वाहिलेल्या शपथेकरितां धनवानाने एक मेंढी अथवा शेळी, गरीबाने दोन पारवे, आणि अतिगरीबाने एका मापाचा दाहावा भाग याजकाकडे वाहाण्यासाठीं न्यावा. लेवीय. अ० ५.

टीका ५.

न्यायसभेचे देहांत दंड.

न्यायसभेच्या देहांत दंडाचे चार प्रकार आहेत; ह्मणजे धोंडमार, जाळणें, छेदणें व श्वास बंद करून मारणें. याविषयीं हाराम-वाम याने असें लिहिलें आहे कीं, पहिले तिन्ही प्रकार शास्त्रांत सांगितलेले आहेत. धोंडमार याविषयीं अनुवाद अ० १३ ओ० १०; जाळणें याविषयीं लेवीय अ० २० ओ० १४; आणि छेदणें याविषयीं लेवीय अ० २० ओ० १६ एथें सांगितलें आहे. परंतु श्वास बंद करून मारणें याविषयीं स्पष्ट कोठेंच दर्शविलेलें नाहीं, ह्मणून जी देहांतशिक्षा मोहोगमांत लिहिली आहे, ती श्वास बंद करून मारण्याची शिक्षा असें समजावें. हारामवामाच्या सानहेद्रीम पुस्तकाचा अ० १४ व १५.

टीका ६.

आरीएल व हारएल.

आरीएल ह्मणजे देवाचा सिंह आणि हारएल ह्मणजे देवाचा डोंगर. हीं दोन नांवें यहेजकेल अ० ४३ ओ० १५ एथें वेदीच्या अर्थानें योजिलीं आहेत. परंतु आरीएल हें नांव यशाया अ० २९ ओ० १२ एथें येरूशालेमेस दिल्हें आहे.

टीका ७.

इस्त्राएली धर्माचीं मूळतत्त्वें.

ईश्वराचें एकत्व हें इस्त्राएली धर्माचें मुख्यत्वेंकरून मूळतत्व आहे; आणि तें "हे इस्त्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे;" या वाक्यांत दर्शविलें आहे. यास्तव जे आपणास इस्त्राएल म्हणवितात त्यांनीं हें वाक्य सकाळीं व संध्याकाळीं अगत्य ह्मटलें पाहिजे. लहान बाळ बोलूं लागतांच पहिल्याने त्यास हेंच वाक्य शिकवावें. आणि अंतकाळींहि हेंच वाक्य ह्मणतात.

याशिवाय सुमारें सातशें वर्षांमागें हारामबाम यानें आणखी तेरा मूळतत्वें ठरविलीं आहेत, तीं सर्व इस्त्राएलांनीं मान्य करून प्रतिदिवशीं त्यांचें ध्यान केलें पाहिजे. तीं तेरा मूळतत्वें येणेंप्रमाणें ;—

१. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम; असा जो ईश्वर, तोच सर्व पदार्थांचा उत्पन्नकर्ता व नियंता, आणि सर्व उत्पत्ति त्यानेच केली, तोच करितो, आणि तोच करील.

२. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम, असा जो ईश्वर, तो एकच; आणि कोणत्याहि प्रकारचें एकत्व त्याच्या एकत्वासारिखें नसून तो एकच आमचा देव होता, आहे व असेल.

३. मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम, असा जो ईश्वर, तो निराकार आहे, आणि ज्या विकारांस पदार्थ पात्र आहेत, त्यांस तो पात्र नसून त्यास कशाचीहि प्रतिमा नाहीं.

४. मी पूर्ण विश्वासाने मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम, असा जो ईश्वर, तोच आद्यंताचा आहे.

५. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम, असा जो ईश्वर, त्याची मात्र प्रार्थना करणें योग्य आहे; त्यावांचून दुसऱ्याची प्रार्थना करणें योग्य नाहीं.

६. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, शास्त्रांतील भविष्य-भाष्यांचीं सर्व वचनें सत्य आहेत.

७. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, आमचा गुरु मोशे (त्याजवर शांति असो) याचें भविष्यकथन सत्य आहे; आणि त्याच्या पूर्वी झालेल्या आणि मागाहून झालेल्या सर्व ज्ञान्यांचा तो गुरु होता.

८. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, आमचा गुरु मोशे (त्याजवर शांति असो) यास जें दिल्हेलें शास्त्र, तेंच हल्लीं आह्माजवळ आहे.

९. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, हें शास्त्र कधींच पालटणार नाहीं; आणि धन्य ज्याचें नाम, असा जो ईश्वर, तो दुसरें कधींच देणार नाहीं.

१०. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम, असा जो ईश्वर, तो मनुष्यपुत्रांचीं सर्व कृत्यें व विचार जाणतो, जसें ह्मटलें आहे कीं, "तो त्यांचें हृदय एकसारिखें घडितो; त्यांचीं सर्व कामें ध्यानांत आणितो."

११. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम असा जो ईश्वर, तो आपल्या आज्ञा पाळणारांस प्रतिफळ देतो, आणि आपल्या आज्ञा भंग करणारांस शासन करितो.

१२. मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, माशीयाह येईल; आणि जरी त्याच्या येण्यास एवढा विलंब झाला, तरी त्याच्या येण्याची मी प्रतिदिवशीं वाट पाहीन.

१३. मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, सदांसर्वकाळ धन्य व थोर ज्याचें नाम, असा जो ईश्वर, त्याची जेव्हां इच्छा होईल तेव्हां मेलेल्यांची पुनरुत्थिति होईल.

टीका ८.

ईश्वराने वीट मानलेल्या साहा गोष्टी.

ज्या साहा गोष्टींचा ईश्वर वीट मानितो, त्या नीति अ० ६, ओ० १६ एथें लिहिल्या आहेत; त्या येणेंप्रमाणें ; गर्वदृष्टि, लबाड बोलणारी जीभ, निर्दोष रक्त पाडणारे हात, दुष्ट संकल्प योजणारें हृदय, दुष्ट कर्माकडे त्वरित धावणारे पाय, खोटें रचणारा असा लबाड साक्षी; परंतु त्याच वाक्यांत लिहिल्याप्रमाणें सात गोष्टी धरिल्या, तर भावांमध्यें तंटे उठविणारा हाहि त्यांमध्यें गणला जातो.

शालोम दानिएलजी भास्तेकर. १
आब्राहाम सकोबा पेनकर. १
योसेफ आब्राहाम पेनकर. १
बिनयामीन आब्राहाम पेनकर. १
शालोम येलोजी चेऊलकर. १
बनाजी दावीदजी शापुरकर मेस्त्री. १
आहारोन शेमोएलजी दीवेकर. १
येहेजकेल बिनयामीन पेनकर. १
शिमशोन शेमोएलजी दिवेकर. १
रऊबेन बिनयामीनजी पेनकर. १
दावीद आहारोनजी गडकर. १
शालोम योसेफजी पेनकर. १
आब्राहाम शीलेमानजी उमर्डेकर दाक्तर पेनशनर. १
हासकेल इसूबजी तळकर व त्यांचे मुलगे. २
आबाहाम दानिएलजी सातामकर. १
आहारोन इसहाकजी भास्तेकर दाक्तर. १
येहेजकेल याकोबजी भोरपकर. १
शेमोएल येहेजकेलजी नौगांवकर. १
हासाजी शेमोएलजी कुरूलकर. १
दावीद शीलेमानजी बोरघरकर. १
शालोम शीलेमानजी बोरघरकर. १
बिनयामीन शेमोएल सासुनकर. १
शीलेमान दानिएल भास्तेकर. १
योसेफ आबाजी तळकर. १
येलीएझेर योसेफ सानकर. १
दावीद याकोबजी चरीकर. १
शीलेमान दानिएलजी पेझारकर मेस्त्री. १
शालोमजी इसाजी सोगांवकर. १
हाईम शेमोएल भास्तेकर. १

शेमोएल शालोमजी आष्टमकर. १
याकोब शलेमानजी वासकर. १
मोशे शलेमानजी वासकर. १
येलीयाहु शलेमानजी वासकर. १
येहेजकेल दावीद दीवेकर. १
सतकेल शेमोएलजी चरीकर सुभेदार. १
शेमोएल येलोजी तलकर हावलदार. १
शेमोएल रऊबेन पुगांवकर. १
रेऊबेन शेमोएल पुगांवकर. १
हाईम शिमशोन दीवेकर. १
हाईम बंदुजी गडकर. १
इसहाक आब्राहाम इवलेकर हावलदार. १
रऊबेन आहारोनजी थलकर. १
याकोब शेमोएल दीवेकर. १
आहारोन याकोबजी आवासकर. १
शालोम बाळाजी पेझारकर. १
शिमशोनजी आब्राहामजी आधरनेकर मेस्त्री. १
आब्राहाम बापुजी तळगांवकर मेस्त्री. १
मोशे रऊबेनजी पुगांवकर. १
शलेमान राहामीम तलकर. १
राहामीम शलेमान तलकर. १
हानोख शलेमान तलकर. १
लीयाबाई बाथ शलेमान राहामीन तलकर. १
आब्राहाम राहामीम मलेकर. १
येलीयाहु शेमोएल नौगांवकर. १
येहुदा येलीयाहु नौगांवकर. १
इसहाक शालोमजी नौगांवकर १
आब्राहाम दानिएल कुरूलकर १
शालोम आब्राहाम चीचोलकर १

शलेमान आबाजी चरीकर १
याकोब शेमोएल शीरकोलकर १
मुसाजी दानिएलजी केहीमकर १
येहेजकेल दावीद ढोकरकर १
आहारोन इसहाक नौगांवकर १
शालोमजी सामाजी कासुकर सुभेदार पेनशनर १
बिनयामीन शलेमानजी कासुकर दाक्तर १
शालोम अब्राहाम मोशे हिब्बा......... .... १
शालोम बाबाजी म्हशीलकर १
योएल शेमोएल म्हशीलकर १
आब्राहाम शेमोएलजी नौगांवकर १
रऊबेन योसेफ गडकर १
शेमोएल राहामीम भोनकर १
सकोजी गौरोजी उमर्डेकर १
दावीद मोशे नौगांवकर.. १
हिल्लेल शालोमजी नौगांवकर.................... .... १
शालोमजी नेथानएल दिवेकर पेनशनर १
आहारोन मोशे नागांवकर हावलदार................................ १
हाईम येहेजकेलजी म्हेडेकर.................... .... १
शिमशोनजी सामाजी आकशीकर १
आब्राहाम शेलोमो नौगांवकर १

ठाणें.

मुसाजी बाळाजी उमर्डेकर सुभेदार मेजर बाहादर कमान्डान्ट. १
आब्राहाम मुसाजी उमर्डेकर माजी फौजदार १
हिलेल मुसाजी उमर्डेकर इन्स्पेक्टर बडोदा रेलवे १
मीखाएल हिलेल उमर्डेकर.. १
शिमशोनजी येलोजी डांडुलकर सुभेदार पेनशनर............ १
शलेमान शिमशोनजी डांडुलकर १

नेरल.

रऊबेन येहेजकेलजी शिरकोलकर १

चीनेर.

येलोजी सामाजी फनसापुरकर १

पनवेल.

शेमोएल आब्राहामजी तरणखोपकर पंतोजी..................... १
आब्राहाम शेमोएलजी भोरपकर.................................. १
आब्राहाम दावीदजी चरीकर १
शेमोएल शालोमजी चीचोलकर १
बिनयामीन शालोमजी चीचोलकर. १
रऊबेन आब्राहामजी नौगांवकर.................................. १
दावीद येहेजकेल भास्तेकर.................................... १
शेमोएल आलोजी शापुरकर काजी................................ १
शालोम इसहाक पिंगले.. १
आहारोन भाऊजी कोलाटकर.................................... १
शेमोएल शालोमजी नौगांवकर.................................. १
बिनयामीन दावीदजी कोलाटकर................................ .... १
याकोब शेमोएलजी वांसकर दाक्तर. १

पोयनाड.

शालोम सकोजी गडकर.. १

वर्सोली.

येलोजी नथुजी शापुरकर.. १

आलीबाग.

शालोम शीलेमानजी पेझारकर दाक्तर............................. १

आंबेपुर.

शीलिमान दानिएलजी तलकर पंतोजी........ १
हाईम आबाजी चरीकर....... .... १

आगलाची वाडी.

येलीया ऊर्फ बाबाजी तानाजी ढोकरकर......................... १

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

भाग पहिला.

वर्गणीदारांचीं नांवें.

मुंबई.

हासकेलजी आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम.………… २
शीलेमानजी आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम. ……… १
इसहाक शीलेमानजी दीवेकर कमोदान मुकादम. ………… १
आहारोन आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम ………… २
एस्तेरबाई दीवेकरां कमोदाना मुकादमा.…………………… १
सिप्पोराबाई बाथ आहारोन आब्राहामजी दीवेकर कमोदान
मुकादम.……………………………………………………… १
दावीद हाईम दीवेकर कमोदान मुकादम. ……………………… १
एस्तेरबाई दीवेकरां कमोदाना मुकादमा. ……………………… १
योसेफ इसहाक दीवेकर कमोदान मुकादम. ………………… १
आहारोन दानिएलजी तळकर.……………………………… ५
शेमोएल येलीया वरोलकर गब्बाय.……………………………… १
दावीद शेमोएल वरोलकर. ……………………………………… १
शालोम शेमोएलजी नौगांवकर. ……………………………… १
शिमओन बिनयामीनजी वांकुळकर. ………………………… १
मोशे येलीयाहु गालसुलकर. ………………………………… १
येलीया योसेफ राजपुरकर. हाज्जान. ………………………… १
रऊबेन येलीया राजपुरकर.…………………………………… १
मोशे येलीया राजपुरकर.……………………………………… १
शेमोएल मोशे किलेकर. ……………………………………… १
राहेलबाई किलेकरां. ………………………………………… १
शेमोएल शिमशोनजी किलेकर टेलेग्राफ सिगनालर. ……… १

मोशे बिनयामीनजी पेझारकर मेस्त्री.	१
शेमोएल येहेजकेलजी पेझारकर ड्राफ्समन.	१
येहेजकेल येटुजी आवासकर.	१
मिर्यामबाई आवासकरां.	१
योसेफ आहारोनजी खुलाबकर.	१
हाईम इसाजी गालसुलकर.	२
दानिएल योसेफजी तलकर दाकर पेनशनर.	१
मोशे दानिएलजी तलकर.	१
सिमहाबाई तलकरां.	१
आबाजी बालाजी आवासकर.	१
सिमहाबाई गालसुलकरां.	१
योसेफ बिनयामीनजी गालसुलकर.	१
योसेफ शिमशोनजी सानकर.	१
हाईम आब्राहामजी मलेकर.	२
बिनयामीन शालोमजी वालवटकर.	१
येलीया शालोमजी वालवटकर.	१
शालोम बिनयामीनजी सानकर.	१
शिमशोन मोशे दीवेकर.	१
याकोब फकीरजी शापुरकर.	१
रऊबेन आब्राहामजी कोरलेकर.	१
शालोम शेमोएलजी कुरूलकर दाकर चोगले.	१
शेमोएल शालोमजी कुरूलकर.	१
आब्राहाम येलीएझेर भोरपकर.	१
शॅलेमान हासकेलजी नौगांवकर.	१
मोशे येहेजकेलजी खंडालकर.	१
रऊबेन आब्राहाम भिंजेकर.	१
बिनयामीन बाबा खानावकर.	१
शालोम बनाजी आवासकर.	१
आब्राहाम झेबूलुन दांडेकर.	१

रेवदंडा.

शेमोएल योसेफ राजपुरकर पंतोजी.................................. १
दावीद बाबाजी दांडेकर १

आष्टमी.

शेमोएल बाबाजी आष्टमकर म्हेतर.................................. १
बंदुजी येलोजी आष्टमकर म्हेतर................................... १
हाईम आबाजी आष्टकर म्हेतर....................................... १
आहारोन शीलेमानजी आष्टमकर पंतोजी........................ १
हाईम बंदुजी चीचोलकर.. १

(हावसान) बोरलय.

शालोमजी शीलेमानजी दांडेकर..................................... १
मुसाजी आब्राहामजी आधरनेकर................................... १

नादगांव.

बंदु बनाजी चेऊलकर.. १

मुरूड.

बिनयामीन योसेफ राजपुरकर काजी.............................. १

कारवार.

इसहाक शालोमजी पोलीस दाक्तर.................................. १
शालोम शीलेमानजी आपटेकर ड्राफ्समान......................... १
दानिएल बिनयामीनजी कांदलेकर दाक्तर........................ १
मुसाजी शीलेमानजी नागांवकर मेस्त्री.............................. १

पुणें.

याकोब राहामीम तलकर दाक्तर...................................... २
मोशे याकोब तलकर.. १
बिनयामीन याकोब तलकर.. १
योसेफ याकोब तलकर १
शिमशोन याकोब तलकर.. १
येहेजकेल मोशे नागांवकर दाक्तर.................................. १

लेवीयेनाथान बेन येहेजकेल नागांवकर.......... .... १
दानिएलजी तानाजी कोलाटकर जमादार १
येलीएझेर दानिएलजी कोलाटकर ड्राफ्समान.... .... १

अहमदनगर.

बापुजी आब्राहामजी वरघरकर सुभेदार नेटीव कमांडान्ट.... १

सातारा.

हाईम येहेजकेल ह्मशीलकर डाक्तर १
बंदुजी इसाजी भोनकर जमादार १
बंदुजी याकोबजी किलेकर जमादार. १

नासीक.

हाईम शीलेमानजी चीचोलकर ड्राफ्समान. २

भोसावळ.

रऊबेन शीलेमानजी नागांवकर मेस्त्री. १
आब्राहाम रऊबेनजी नागांवकर. १

जबलपूर.

शालोमजी दानिएलजी कासुकर मेस्त्री. १

सुरत

योसेफ शीलेमानजी कुरूलकर टेलेग्राफ सिगनलर. १
येहेजकेल शालेमजी दीवेकर. १

किईम.

शालोम बिनयामीनजी वांसकर स्टेशन मास्तर.... .... १

अहमदाबाद.

आब्राहामजी बिनयामीनजी येरलकर. डाक्तर. १

द्वारका.

येहेजकेलजी येलोजी सानकर डाक्तर. १

हैद्राबाद.

शिमशोन दावीदजी झेंडेकर डाक्तर. ४

रऊबेन येलीया दुदकर. १
सतकेलजी रामाजी गडकर मेस्त्री. १
हासकेल शलेमानजी वरसोलकर दाकर. १
येलीया शेमोएल शरिकोलकर दाकर. १
योसेफ रऊबेन दुदकर. १
बिनयामीन रऊबेन दुदकर. १
येलीया रऊबेन दुदकर. १
मोशे रऊबेन दुदकर. १
बाथशेबा बाथ रऊबेन दुदकर. १

हाळा.

दानिएलजी सकोजी भोरपकर दाकर. १
बिनयामीन दानिएलजी भोरपकर. १
याकोब दानिएलजी भोरपकर. १

उमरकोट.

शालोमजी मोशे सातामकर सबओवरसीयर. १
आब्राहामजी दावीदजी झेडेकर रैटर. १

शीकारपूर.

आहारोनजी दावादजी झेडेकर दाकर. १

आदन.

दीनएल आब्राहामजी आधरनेकर मस्त्री. १

बलसार.

रऊबेन इसहाक नीगडेकर.. १

रेजीमेंट ३.

हाइमजी बापुजी वढांवकर नाईक १
आब्राहामजी इसाजी भास्तेकर लान्स नाईक. १
सतकेलजी याकोबजी किलेकर लान्स नाईक पे आर्डरली १

रेजीमेंट ४.

दानिएल राहामीम तलकर सुभेदार. २
हासकेलजी दानिएलजी तलकर जमादार.................... १
याकोबजी दानिएलजी पालकर हावलदार. १
मुसाजी बालाजी तलकर ब्युगल मेजर. १
सतकेल याकोबजी नौगांवकर नाईक. १
रऊबेन हाईमजी उमर्डेकर ब्युगलर. १
आब्राहाम हाईमजी आष्टीवकर.................................. १
हासकेलजी शालोमजी इंदापूरकर................................ १
शमोएल शालोमजी इंदापुरकर.................................. १

रेजीमेंट ६.

याकोबजी शालोमजी किलेकर नाईक बेंडमास्तर............ १
दानिएलजी शालोमजी किलेकर वींगरैटर....................... १

रेजीमेंट १०.

शेमोएल मोशे नागांवकर सुभेदार................................ १
याकोब योसेफजी मेंद्रीकर जमादार................................ १
येलीएझेर येलीया वांसकर दाकर.................................. १
शेमोएलजी दानिएलजी खरवीलकर दाकर........................ १
शेमोएल याकोबजी खरवीलकर हवलदार.......................... १
शालेम मोशे नागांवकर द्रील नाईक............................ १

रेजीमेंट १२.

यहेजकेल बापुजी मलेकर सुभेदार मेजर बाहादर............ १
मुसाजी दानिएलजी कोलेटकर सुभेदार............................ १
मुसाजी बापुजी मलेकर सुभेदार.................................. १
रऊबेन बापुजी मलेकर जमादार आजीटन........................ १
शीलेमानजी शालोमजी गरपकर हावलदार........................ १

शलेमानजी सतकेलजी कोगबानकर कलर हावलदार
पे आर्डरली १
येहेजकेल इसहाकजी पुगांवकर दाकर.................... १
योसेफ दानिएलजी कोरलेकर दाकर १
बनाजी शलेमानजी भास्तेकर हावलदार पे आर्डरली १
बिनयामीन सादीक भास्तेकर स्कुलमास्तर नाईक.... .... १
जेखारएल शलेमानजी कांदलेकर नाईक पे आर्डरली......... १
आब्राहामजी दानिएलजी थलकर नाईक पे आर्डरली. १
याकोबजी भावजी तलकर नाईक हास्पिटल आर्डरली......... १
शालोमजी सकोजी पेणकर ड्रीलनाईक........................ १
शलेमानजी एरलकर लान्स नाईक.......................... १
दानिएल बिनयामीनजी केहीमकर फैफर.................... १
रऊबेनजी शलेमानजी भास्तेकर............................ १
शालोमजी शलेमानजी खांबकर............................ १
हाईमजी शेमोएलजी चरीकर.................................. १
दानिएलजी सकोजी कांदलेकर............................. १

रेजीमेंट १५.

शालोमजी मुसाजी पेणकर सुभेदार. १
शिमशोनजी याकोबजी नौगांवकर नाईक पे आर्डरली......... १
शालोमजी शलेमानजी दीघोरकर दाकर...................... १

रेजीमेंट १६.

आहारोनजी शेमोएलजी आष्टमकर सुभेदार मेजर १
योसेफ दानिएलजी खरवीलकर सुभेदार........................ १
दावीद शेमोएलजी आष्टमकर नाईक. १

रेजीमेंट १९.

शेलोमो येलीया वाकुलकर सुभेदार. १

याकोब दावीदजी बोरगांवकर सुभेदार. १
शालोम येलीया वाकुलकर जमादार. १
रऊबेन येहेजकेल ह्मशीलकर जमादार. १
शिमशोन दानिएल मजगांवकर जमादार. १
आब्राहाम इसहाक मोरबेकर हावलदार पे आर्डरली. १
आब्राहाम शेमोएल दीवेकर हावलदार पे आर्डरली. १
आब्राहाम शिमशोन भोरपकर रैटर. १
रऊबेन इसहाक केहीमकर. १

रेजीमेंट २३.

हाईम शेमोएलजी पेझारकर सुभेदार. १
रऊबेन शालोमजी पेनकर दाकर. १
हासकेल हाईमजी तलकर स्कुल मास्तर. १
बंदुजी शेमोएलजी पेझारकर नाईक. १
शेमोएल शालोमजी पेझारकर. १
योसेफ दावीदजी पेझारकर. १

रेजीमेंट २८.

शीलेमानजी दानिएलजी घोसालकर सुभेदार मेजर बाहादर १
दाविदजी शीलेमानजी घोसालकर. १
बनेमजी शालोमजी नागांवकर हावलदार मेजर १

रेजीमेंट २६.

रऊबेन इसहाकजी नौगावकर..................... १

रेजीमेंट २९.

शुकूर इसहाकजी नौगांवकर..................... १

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
३	२८	यायांत	न्यायांत
६	११	हाशमानीम	हाशमोनीम
१३	२९	तं	तूं
३२	२९	टीका ५	टीका ६
७२	२४	बांधले गेलेले	बांधला गेलेले
८७	१७	गौवण्याकारितां	गौरवण्याकरितां
८८	२८	दवैत्वाच्या	दैवत्वाच्या
८९	२८	अदश्य	अदृश्य
९२	२४	ती वेळ	तीन वेळ
९४	३	सष्टीकरण	स्पष्टीकरण

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीनें छापविलेलीं पुस्तकें.

	रु.	आ.	पै.
प्रायश्चित्ताच्या दिवशीं पापाविषयीं कबूल होणें.	,,	१	३
पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना	,,	८	,,
इस्राएलांचा लग्नविधि	,,	३	,,
वर्षप्रतिपदेची प्रार्थना	१	,,	,,
नवसांची सुटका आणि समुद्रतिरीं करावयाची प्रार्थना	,,	४	,,
आनतिओखोस राजाचा इतिहास अथवा हान्नुक्याच्या सणाची स्थापना	,,	२	,,
इब्री पहिलें पुस्तक	,,	४	,,
प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना, भाग पहिला	१	४	,,

,, ,, भाग दुसरा तयार होत आहे.